# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. ०५/०६/२००४

आज दि. ०५/०६/२००४ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सुचना क्र. ०१ दि. २६/०५/२००४ रोजीच्या विषय पत्रिकेवर विचार विनीमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सय्यद मुझ्झफर हुसेन | महापौर |
| २) | श्री. मॉरस रॉड्रीक्स | सभापती |
| ३) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सभागृह नेता |
| ४) | श्री. परशुराम दामोदर पाटील | विरोधी पक्षनेता |
| ५) | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | सदस्या |
| ६) | श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज | गटनेता |
| ७) | श्री. पाटील चिंतामण कमलाकर | सदस्य |
| ८) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ९) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| १०) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| ११) | श्रीम. ज्युडी थॉमस डिसोझा | सदस्या |
| १२) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १३) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १४) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १५) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १६) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १७) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १८) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १९) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| २०) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| २१) | श्री. मदन उदितनारायण सिंग | सदस्य |
| २२) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| २३) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २४) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २५) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २६) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| २७) | श्री. हंसुकुमार पांडे | सदस्य |
| २८) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २९) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| ३०) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| ३१) | श्रीम. सावळे निर्मला बाबुराव | सदस्या |
| ३२) | श्री. माळी रविंद्र भिमदेव | गटनेता |
| ३३) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३४) | श्रीम. ज्योत्स्ना जालिंदर हसनाळे उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३५) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३६) | श्रीम. पाटील अनिता जयवंत | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ३७) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ३८) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३९) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |
| ४०) | श्री. पटेल आसिफ गुलाम | सदस्य |
| ४१) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ४२) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सदस्या |
| ४३) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | गटनेता |
| ४४) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ४५) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४६) | श्रीम. सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४७) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| ४८) | श्री. पाटील रोहीदास आत्माराम | सदस्य |
| ४९) | श्री. कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ५०) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ५१) | श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस | सदस्या |
| ५२) | श्री. जोजफ जॉन घोन्सालवीस | सदस्य |
| ५३) | श्री. जेम्स इजिदोर कोलासो | सदस्य |
| ५४) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ५५) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ५६) | श्री. शहा शशिकांत रतिलाल | सदस्य |
| ५७) | श्रीम. शहा रिटा सुभाष | सदस्या |
| ५८) | श्री. ध्रुवकिशोर पाटील | सदस्य |
| ५९) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ६०) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ६१) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ६२) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ६३) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ६४) | श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ | गटनेता |
| ६५) | श्री. पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ६६) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ६७) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ६८) | श्री. म्हात्रे तुळशिदास दत्तू | सदस्य |
| ६९) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ७०) | श्रीम. रक्षा एस. शाह | सदस्या |
| ७१) | श्री. मिलन गोंविंदराव पाटील | सदस्य |
| ७२) | श्री. जैन रमेश धरमचंद्र | सदस्य |
| ७३) | श्री. ठाकुर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |
| ७४) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ७५) | श्री. संजय नारायण पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ७६) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ७७) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## अनुपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| २) | श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा | सदस्य |
| ३) | श्रीम. भामरे उर्मिला कोमल | सदस्या |
| ४) | श्री. महेंद्रसिंग चौहाण | सदस्य |

## रजेचे अर्ज आलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. मेंडोसा मायरा गिल्बर्ट | महापौर |
| २) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ३) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्य |

वरील प्रमाणे महासभेकरीता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा. महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यांस सांगितले. त्यानुसार वंदेमातरम् या राष्ट्रगीतानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**मा. महापौर :-**

नमस्कार, मा. आयुक्त, विरोधी पक्षनेते, सभापती, उपआयुक्त व सर्व उपस्थित सदस्य, मनपा अधिकारी व पत्रकार बंधु आपले सर्वांचे स्वागत. सचिव साहेबांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

**प्र. सचिव :-**

मागील प्रश्न क्र. १५ सन्मा. सदस्य प्रकाश दुबोले यांनी विचारलेला प्रश्न आहे.

**चंद्रकांत वैती :-**

सभा सुरु करण्यापुर्वी एक अभिनंदनाचा ठराव मांडु इच्छितो की, नुकत्याच पार पडलेल्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये भारताच्या १४ व्या लोकसभेचे पंतप्रधान म्हणुन काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते डॉ. मनमोहन सिंगसाहेबांची पंतप्रधानपदी निवड झालेली आहे. त्यासोबत संपुर्ण भारतभरातुन निवडणुका पार पडल्यानंतर जेवढे खासदार निवडुन आले इन्क्ल्युडिंग आपल्या परिसरातील खासदार प्रकाश परांजपे साहेब या सर्वांच्या अभिनंदनाचा ठराव मी मांडत आहे.

**मोहन पाटील :-**

अनुमोदन देण्यापुर्वी मा. डॉ. मनमोहन सिंग पंतप्रधान, मा. शरदचंद्र पवार कृषिमंत्री, खासदार प्रकाश परांजपे व महाराष्ट्रातील इतर सात मंत्री व महाराष्ट्रातील खासदार जे निवडुन आले. त्यांनी जो अभिनंदनाचा ठराव मांडलेला आहे. त्या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. :-**

भारताच्या नेत्या व कॉग्रेसच्या अध्यक्षा मा. श्रीम. सोनिया गांधी यांनी मा. डॉ. मनमोहन सिंग यांना भारताचे १४ व्या लोकसभेचे पंतप्रधान पदावर तसेच महाराष्ट्रातील जे खासदार म्हणून निवडून आले ते म्हणजे, मा. श्री. शरदचंद्रजी पवार यांना कृषीमंत्री म्हणून पद बहाल केले आणि १० ठाणे लोकसभा मतदार संघातून निवडून आलेले खासदार मा. श्री. प्रकाश परांजपे आणि महारार्ष्टातील इतर जे सात मंत्री व खासदार चांगल्या मताधिक्याने निवडून आल्याबद्दल या सर्वांचे ही मा. सर्वसधारण सभा (महासभा) अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्री. रोहिदास पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**लिओ कोलासो :-**

मा. पिठासीन अध्यक्षसाहेब, आपण ऐकता असे समजुन मी बोलतो. प्रश्नोत्तरापुर्वी सन्मा. सदस्य चंद्रकांतजी वैती आणि सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब यांनी आता अभिनंदनाचे जे ठराव मांडले. ते निश्चितच स्तुत्य आहे आणि टाईमली आहेत. पण मी सभागृहच्या मुद्दाम निदर्शनास आणुन देत आहे की , हा एक औचित्याचाच मुद्दा आहे की, मा. महापौर मॅडम मायरा मेन्डोसा या परदेशवारीमध्ये आहेत. त्यांनी खरोखरच एक चांगली लांब अशी परदेशवारीमध्ये त्या सामील असुन येण्याच्या मार्गावर आहेत. पण तत्पुर्वी आपण सन्मा. पीठासीन अधिकारी म्हणुन या सभागृहाचे कामकाज ऑफिशिएट करीत आहात. त्याबद्दल सभागृहाच्या वतीने आपल्याला आम्ही कामकाजात संपुर्ण सहकार्य देऊ असे व्यक्त करतो आणि आपल्या कामकाजाबद्दल हार्दिक अभिनंदन करतो.

**रोहिदास पाटील :-**

कामकाजाच्या पद्धतीनुसार सत्ताधारी पक्षाने असा ठराव मांडुन त्याला अनुमोदन देणे औचित्याचा एक वेगळा विषय होऊन जाईल. आमचे असे मत आहे की, सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांनी हा ठराव मांडलेला आहे. विरोधी पक्षाच्या वतीने, आमच्या वतीनेही अनुमोदक, सुचक येईल. त्यामध्ये आमचे नाव येणे आवश्यक आहे. याची दखल घ्यावी. सन्मा. सदस्य मोहन पाटील यांचे अनुमोदक, सुचक नाव होऊ शकत नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांची सुचना मान्य आहे.

**प्र. सचिव :-**

सन्मा. सदस्य प्रकाश शंकर दुबोले यांचा प्रश्न आहे.

**प्रकाश दुबोले :-**

माझा असा प्रश्न होता की, बाबुराव घंगाळे शिक्षण समितीने जो महापालिकेत खाते क्रमांक इ/५७-५१ बाबत फसवणुक केलेली आहे. खोटे पेपर सादर करुन कर आकारणी केली. या संदर्भात मी प्रश्न विचारला होता. त्या अनुषंगाने १६ जानेवारीला नगरपालिकेने गुन्हा नोंदणी करण्याचे पत्र मिरा रोड पोलिस स्टेशनला दिलेले आहे. परंतु, तो गुन्हा नोंद झाला की नाही? आणि १२ फेब्रुवारीचे पी.एस.आय. चे पत्र आहे की तपास चालु आहे. जर रेकॉर्डवर त्यांनी गुन्हा केलेला आहे. आपली फसवणुक केलेली आहे. आपण हा रेकॉर्ड सादर केल्यानंतर तपास कोणत्या प्रकारचा चालु आहे. त्याबद्दल आपल्याला काही डिटेल माहिती आहे का?

**मा. उपआयुक्त (शिवमुर्ती नाईक सो.) :-**

मा. महापौरसाहेब, यामध्ये कै. बाबुराव घंगाळे एज्युकेशन ट्रस्टने २००१-०२ पावती क्रमांक ४४/२९४ रुपये १५५६/- १६/०३/२००० ला भरलेले आहेत. ही प्रॉपर्टी अशोक के. शेट्टी, अनंत को.ऑ.हा.सो. शांतीनगर सेक्टर, मिरा रोड या पावतीनुसार ड्युप्लिकेट कॉम्प्युटरचे बिल देऊन स्वतःच्या नावावर पैसे भरले. म्हणुन आम्ही सर्व कागदपत्रे मिरा रोड पोलिस स्टेशनला दिलेली आहेत आणि त्यांची चौकशी पूर्ण झाल्यानंतर तो गुन्हा दाखल शासन म्हणुन करणार आहेत. त्याची चौकशी त्यांनी सुरु केलेली आहे. चौकशीनंतर आम्हाला कळविणार आहेत की आम्ही गुन्हा दाखल करायला माणुस पाठवु आणि आम्ही गुन्हा दाखल करुन घेऊ. सगळी कागदपत्रे दिलेली आहेत. जी फसवणुक केली ती.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, १२ फेब्रुवारीला पी.एस.आय. कोळी यांनी आपल्याला पत्र दिलेले आहे. चौकशी चालु आहे. आता जुन महिना आला.

**मा. उपआयुक्त (शिवमुर्ती नाईक सो.) :-**

परवाच आम्ही आयुक्त आणि मी सभा घेतली होती. दुसऱ्या कामासाठी घुले साहेब आले होते. त्यांच्याबरोबर चर्चा केली. तुम्ही चौकशी लवकर पूर्ण करा आणि गुन्हा दाखल करुन घ्या असे साहेबांनी सांगितलेले आहे. त्याप्रमाणे लवकर चौकशी पूर्ण करुन घेतो आणि गुन्हा दाखल करायला पत्र देतो म्हणुन सांगितलेले आहे. चौकशी झाल्यानंतर कारवाई होईल.

**प्रकाश दुबोले :-**

त्या अनुषंगाने दुसरा प्रश्न होता. शिक्षण समिती महानगरपालिकेकडुन कमी दराने वीज पुरवठा व्हावा म्हणुन एक पत्र शिक्षण मंडळाकडुन मागवुन घेतले. मागे मला सांगितले होते. त्या प्रकारे आणि त्या पत्राचा दुरुपयोग करुन त्यांनी त्या अनधिकृत बिल्डिंगला कनेक्शन नव्हते आणि त्यांनी खोट्या पत्रावर विद्युत पुरवठा करुन घेतला तर त्या अनुषंगाने काय कारवाई झाली? ते उत्तर दिले की शिफारस रद्द केली.

**मा. उपआयुक्त (शिवमुर्ती नाईक सो.) :-**

नाहरकत दाखला रद्द केलेला आहे. बी.एस.ई.एस. ला आम्ही कळवु रद्द केलेले असल्यामुळे ते कनेक्शन कट करा. आणि ८६ हजार रुपये त्यांना दंड केलेले आहे.

**प्रकाश दुबोले :-**

कनेक्शन कट झाले का?

**मा. उपआयुक्त (शिवमुर्ती नाईक सो.) :-**

कनेक्शन कट करण्याविषयी आम्ही सांगितले आहे. एन.ओ.सी. दिल्यानंतर कनेक्शन देतात. कनेक्शन दिल्यानंतर ते फ्रॉड एन.ओ.सी. आहे. हे त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी दंड केले. दंड

केल्यानंतर कनेक्शन कट करण्याची कायदेशीर बाबी तपासुन बघुन ते करणार आहेत आणि वेळोवेळी त्यांना सांगितलेले आहे. दोन दिवसात काय करणार आहेत? ते विचारुन घेऊ.

**प्रकाश दुबोले :-**

आपण पाठपुरावा करुन कनेक्शन कट होणार ना. नाहीतर त्यांनी दंड आकारुन घेतले.

**मा. उपआयुक्त (शिवमुर्ती नाईक सो.) :-**

कट करण्यासाठीच कळविलेले आहे. एन.ओ.सी. बोगस असल्यामुळे दंड वसुल केला. ८६ हजार रुपये त्यांना दंड केलेला आहे. आता कट करण्याविषयी कळविणार आहोत. म्हणजे का केले नाही? विचारुन करणार आहोत.

**प्रकाश दुबोले :-**

दंड घेतला म्हणुन कायदेशीर आहे याची आपल्याला काळजी घेतली पाहिजे.

**मा. उपआयुक्त (शिवमुर्ती नाईक सो.) :-**

असे होणार नाही.

**प्र. सचिव :-**

दुसरा प्रश्न सन्मा. सदस्य रतन कृष्णा पाटील यांचा आहे.

**रतन पाटील :-**

मा. पीठासीन अधिकारी यांच्या परवानगीने बोलतो? माझा प्रश्न आहे. भाईंदर (पश्चिम) तोलनाका ते उत्तन पर्यंतचा हा रस्ता मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये हस्तांतरीत करण्यासंदर्भात. आपण मला उत्तर दिलेले आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ८ ते तोल नाका छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासुन जो सुरु होणारा छत्रपती शिवाजी महामार्ग भाईंदर (पश्चिम) कडील तोल नाक्यापर्यंत येऊन १२० फुटाचा जो महामार्ग आज तयार होत आहे तो तोल नाक्यापर्यंत झालेला आहे आणि तोल नाक्यापासुन याच्यापुढील जो रस्ता आहे. जो आजपर्यंत सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे यांच्या अखत्यारीत आहे. माझी अशी मागणी आहे. मिरा भाईंदरमधील बरेचसे रस्ते ग्रामपंचायत नगरपालिका नगरपालिकेची महानगरपालिका झाली. बरेचसे रस्ते आणि बऱ्याचश्या काही जिल्हापरिषदेच्या, शासनाच्या ज्या प्रॉपर्टी होत्या. त्या आज महापालिकेत हस्तांतरित होत आहेत आणि हा एकमेव रस्ता अजून महापालिकेत हस्तांतरीत झाला नाही. माझी प्रशासनाला विनंती आहे. हा रस्ता आपल्या मिरा भाईंदरच्या मोठ्या रस्त्याला जोडलेला असून हा अरुंद रस्ता आहे. दुसरे म्हणजे एक ते दोन-तीन असे छोटे मोठे अपघात होतच असतात. त्याचबरोबर त्या रस्त्यावर मुर्धा खाडी येथे अरुंद असा पुल आहे. तसाच मोर्वा खाडी येथे अरुंद असा पुल असे या रस्त्यावर दोन अरुंद पुल आहेत. माझी प्रशासनाला विनंती आहे की, हा रस्ता मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये हस्तांतरित करण्यासाठी ठराव करुन सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठवावा. अशी मी या प्रशासनाला विनंती करतो. त्याचबरोबर मला उत्तर दिलेले आहे. मा. महापौर या संदर्भात मा. कार्यकारी अभियंता ठाणे सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे जा.क्र. ठाविप्रक्षा/१/७७०४, दिनांक १०/१२/२००२ अन्वये सदर रस्ता महापालिकेकडे ताब्यात घेण्यासाठी आवश्यक ठराव होऊन त्या ठरावाची मागणी केलेली आहे. परंतु, अद्याप ठराव मंजुर झालेला नाही. याबाबत आवश्यक प्रक्रिया सुरु आहे. ठराव आपल्याकडे संमत झालेला आहे का?

**मा. आयुक्त :-**

या रस्त्याच्या संदर्भात वेळोवेळी इतरही सन्मा. सदस्यांनी हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. सद्यस्थितीमध्ये स्टेडियमपासुन पुढचा रस्ता हा आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न आहे. या संदर्भात शहर अभियंत्यांना याचे रुंदीकरणाचे आणि मजबुतीकरणाचे एस्टिमेट किती होईल याचा अंदाज करायला सांगितलेला होता. तर तो मला वाटते १२ कोटीच्या आसपास त्याचा खर्च अपेक्षित आहे. प्रश्न असा आहे की, पी.डब्ल्यु.डी. च्या अंदाजपत्रकामध्ये, महाराष्ट्र शासनाच्या अंदाजपत्रकामध्ये त्या रस्त्याच्या रुंदिकरणासाठी आणि मजबुतीकरणासाठी जवळजवळ अडीच कोटी रुपयाची रक्कम राखुन ठेवलेली होती आणि त्याला अनुसरुन त्यांनी काही मजबुतीकरणाच्या टप्प्याला त्यांनी सुरुवातही केलेली होती. आता सदयस्थितीमध्ये तो रस्ता साधारण २० ते २५ फुट आहे आणि आपण जर करायचे म्हटले तर साधारणः १२ कोटी रुपये आजच्या परिस्थितीमध्ये आपल्याला खर्च करावा लागेल. अशी अपेक्षा होती की, पी.डब्ल्यु.डी नेच त्याचे मजबुतीकरण आणि रुंदीकरण करावे आणि त्यानंतर पुढची व्यवस्था बघण्यासाठी तो आपण आपल्या ताब्यात घ्यावा. परंतु, सभागृहाचा जर असा कल असेल की, आपण रस्ता रुंदीकरण करावे. मजबुतीकरण करावे. तर माझी आपल्याला विनंती राहिल की, अशा प्रकारचा गोषवारा पुढच्या महासभेमध्ये आम्ही सविस्तर सादर करु. आणि त्याला आपली मंजुरी घेऊन तो महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आम्ही सादर करु.

**परशुराम पाटील :-**

आयुक्त साहेब, आता जे आपण उत्तर दिले. ते यापुढेही पी.डब्ल्यू.डी.ने पत्रव्यवहार केला होता की, भाईंदर पोलिस स्टेशनपासुन उत्तनपर्यंत हा रस्ता नगरपालिकेच्या ताब्यात द्यावा. तर त्यांनी तसे आम्हाला उत्तर दिलेले आहे की, आम्ही देण्यास तयार आहोत. आता मी माझे पत्रव्यवहार आणतो. तो आपल्याकडे देत आहे.

**मा. आयुक्त :-**

आम्ही त्याचे उत्तर दिलेले आहे.

**परशुराम पाटील :-**

साहेब, आपण घ्यायला हरकत नाही.

**मा. आयुक्त :-**

त्यांच्या बजेटमध्ये त्यांनी तरतुद केलेली आहे. ती तरतुद जर त्या प्रस्तावावर खर्च झाली तर आपला तेवढा पैसा वाचेल. हा हेतु त्याच्यामध्ये आहे. अडीच कोटी रुपयांची तरतुद केलेली आहे. जसजसे बजेट त्यांच्याकडे उपलब्ध होईल तसतसे त्याचे काम ते घेत आहेत. अशा अनेक रस्त्यातुन तो ताब्यात घेऊन आपल्याला करायचा असेल तर मी आपल्याला सांगितले की, असा ठराव करण्यासाठी गोषवारा पुढच्या महासभेमध्ये मी सादर करीन.

**परशुराम पाटील :-**

सहा महिन्यापुर्वी मी उत्तर दिले होते. आता आपले सगळे चांगले रस्त् झाले. आता हा रस्ता आपण घेतो ही तर आपल्या नगरपालिकेची शान आहे. म्हणुन आपण ठराव पद्धतीने त्यांच्याकडुन करुन घ्या. आपल्या ताब्यात घ्या. आणि त्याला सुरुवात करा. रुंदिकरण वगैरे.

**मिलन पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो. आता जो रस्ता सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील यांनी जो सांगितला तर त्याच्यामध्ये बॉप्टीस्ट चौक ते डोंगरी पासुन गोराईपर्यंत आपली जी हद्द आहे. तर त्याचा त्याच्यात समाविष्ट दिसत नाही तर आता ज्या सद्य परिस्थितीमध्ये जो १५ फुटाचा रस्ता आहे. त्याच्यामध्ये पी.डब्ल्यु.डी. ने जवळ जवळ चार फुटाची चर मारलेली आहे आणि ती तशीच्या तशी उभी असुन इतके अपघात तिथे होतात की १० फुटामध्ये टँकर आणि गाडी ह्या पास होत नाही आणि वारंवार त्या गाड्या खाली होऊन गाड्याचे फार नुकसान होते. तरी मा. आयुक्त साहेबांनी ताबडतोब याच्यात लक्ष घालुन पी.डब्ल्यु.डी. ला तो रोड कमीत कमी पावसाळ्यापुर्वी रिपेरिंग करायला सांगावे. अशी मी मा. आयुक्तांना विनंती करतो आणि आपण पत्र देऊन तो रोड रिपेरिंग करण्यात यावा अशी नम्र विनंती आहे.

**प्र. सचिव :-**

पुढचा प्रश्न श्रीम. लिला गुरुनाथ पाटील यांचा आहे.

**लिला पाटील :-**

सन्मा. पिठासीन अधिकारी यांच्या परवानगीने बोलते की, माझा उपप्रश्न (क) आहे. टेंडरच्या अटीशर्तीप्रमाणे किती ब्रास माती निघाली आणि ती कुठे टाकण्यात आली? महापालिकेच्या हद्दीत किंवा इतर अन्य ठिकाणी त्याची माहिती देण्यात यावी.

**शरदचंद्र वैरागडे :-**

हे काम टेंडरच्या अटीशर्तीप्रमाणे चालु आहे.

**लिला पाटील :-**

त्याचा उपप्रश्न आहे की त्याची नुकसान भरपाई संबंधिताकडुन करणार का? किती ब्रास माती निघाली आणि ती कोठे टाकण्यात आली.

**शरदचंद्र वैरागडे :-**

ह्या कामामध्ये जी काही माती काढण्यात आली किंवा जी काही गरज होती माती काढण्याची ती तिथुन माती काढुन आपल्या शिवार गार्डनमध्ये लेव्हलिंग करण्यात आलेली आहे.

**लिला पाटील :-**

किती ब्रास काढली आणि कोठे ती टाकण्यात आली.

**रोहित सुवर्णा :-**

क्वान्टीटी एकुण किती

**शरदचंद्र वैरागडे :-**

क्वान्टीटी किती ते आता याच्यामध्ये फायनल मेजरमेंट होतील त्यानंतर ते कळेल तर आता आपल्याकडे एकुण असा फिगर नाही आहे.

**रोहित सुवर्णा :-**

एकुण किती ब्रास माती काढली व कोठे कोठे टाकण्यात आली त्याची माहिती पाहिजे.

**शरदचंद्र वैरागडे :-**

ती वेगळी माहिती आपल्याला देण्यांत येईल. जर ती तुम्हाला पाहिजे असल्यास ती देण्यांत येईल.

**मिलन म्हात्रे :-**

ही माहिती द्यायला आपल्याला सभागृहात अडचण काय आहे. हा प्रश्न तीन चार महिन्यापासुन आपल्याकडे पेंडींग आहे याची माहिती तुमच्या फाईलमध्ये रेडी पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

हा प्रश्न विचारला गेलेला नाही मी आपल्या माहितीसाठी सांगतो हा आता विचारला गेलेला प्रश्न आहे.

**मिलन म्हात्रे :-**

अहो टेंडरच्या अटीशर्तीमध्ये आलेच ते.

**मा. आयुक्त :-**

टेंडरच्या अटीशर्तीमध्ये ज्या बाबी आहेत त्याच्यामध्ये कुठली माती कुठे टाकली त्याचे डिटेल्स दिलेले नसतात आणि प्रत्यक्षात कुठे टाकलेली आहे त्याचे डिटेल्स आम्ही तुम्हाला देऊ.

**मिलन म्हात्रे :-**

याबाबतची चर्चा मागच्या वेळेला झाली. गटनेत्यांच्या मिटींगमध्ये ह्या चर्चा झाल्या. हा विषय चार महिन्या अगोदर आला होता.

**मा. आयुक्त :-**

आता मॅडम जो प्रश्न विचारत आहेत तो ह्या प्रश्नाचा भाग नाही आहे. आता जो तुम्ही मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याची माहिती आम्ही तुम्हाला देऊ.

**मिलन म्हात्रे :-**

आपले म्हणणे असे आहे की टेंडरच्या अटीशर्तीमध्ये मातीची विल्हेवाट का लावायची हा विषय नाही आहे का?

**मा. आयुक्त :-**

तो विषय नाही असे नाही. त्याचा क्वान्टीटीबद्दलचा उल्लेख नक्की आहे.

**रोहित सुवर्णा :-**

साहेब, मग त्याची माहिती द्या ना.

**मा. आयुक्त :-**

माहिती देतो ना.

**रोहित सुवर्णा :-**

टर्म आणि कन्डीशनमध्ये सगळी माहिती आहे. पण आपण सभागृहामध्ये माहिती देत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

इव्हन आमच्या नगरसेवकांवर एवढा अन्याय झाला आहे की, ते जे ॲग्रीमेन्ट तयार केले गेले. त्या ॲग्रीमेन्टची कॉपी जवळजवळ वर्षभराने मिळाली. सगळ्या खर्चाच्या मंजुऱ्या आमच्याकडुन घ्यायच्या. कामाची पद्धती, कामाची वेळ, ड्रॉइंग वगैरे सर्व आमच्याकडुन मंजुरी घ्यायची आणि नंतर माहिती द्यायची नाही. ॲग्रीमेन्टची कॉपीच द्यायची नाही.

**मा. आयुक्त :-**

माहिती द्यायची नाही असा उद्देशच नाही. माहिती सगळी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही इकडे यायच्या अगोदरपासुन हा कार्यक्रम चालु आहे. कितीतरी वेळा हा विषय सभेवर आला आणि आयुक्तसाहेब दुसरी गोष्ट आणि सगळ्यात गंभीर बाब महापौर साहेब आणि आयुक्त साहेब ही एक अशी गंभीर बाब आहे की त्यांनी जो आपला इकडे आपला सी. सी. चा जो रेडिमॅक्स प्लॅन्ट लावलेला आहे. आपल्या कुठल्या अधिकाऱ्याचे लक्ष आहे का? मी दोन दिवस तिकडे रात्रभर राहिलेलो आहे. आपल्या एरियातुन रेडिमॅक्सचे संपुर्ण त्याचे जे टँकर बसले. त्याचे जे गोल

टाईपचे जे टँकर आहेत. हे सगळे भरुन बोरिवलीच्या साईडला रात्री जातात. आपल्या एरियामध्ये जो प्लॅन्ट आपल्या विभागाकरिता बसविलेला आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेजी हा प्रश्न सन्मा. सदस्या लिला गुरुनाथ पाटील यांचा आहे. विचारलेल्या प्रश्नावर त्यांना उत्तर मिळालेले आहे. आपला प्रश्न असेल तर त्याला उत्तर मिळेल. त्यांनी जो प्रश्न विचारला आहे. त्याला उत्तर मिळालेले आहे. कमिशनर साहेबांनी सांगितले माती जिथुन काढली, कुठे टाकली त्याची तपशीलवार माहिती त्या संबंधित नगरसेवकांना लेखी स्वरुपात त्यांनी कळवावी अशी मी त्यांना सुचना करतो आणि पुढच्या प्रश्नाला सुरुवात करा.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही जे विचारले त्याचे काय?

**मा. महापौर :-**

आपण जर वेगळा प्रश्न विचारला असता तर चांगले झाले असते.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यामध्ये तोच प्रश्न मी उभा राहुन विचारतो आहे. आपली परवानगी घेऊन उभा राहिलो आहे.

**मा. महापौर :-**

परवानगी घेतली आणि बोलायला सुरुवात केली. आपण जर असे सांगितले की, मी प्रत्येकाला परवानगीशिवाय बोलु देणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न तो नाही. मला या सभागृहाचा वेळ घ्यायचा नाही आहे. रात्री आपल्या त्या प्लॅन्टवर मटेरियल भरुन मुंबईच्या साईडला जाते. तो प्रकार काय? तो तुम्ही जरा बघा. आणि त्याची चौकशी करा.

**मा. महापौर :-**

कमिशनर साहेब, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी जी सुचना मांडली आहे. ती अतिशय गंभीर आहे. याची नोंद आपण घेतली पाहिजे की, माल मुंबईला जातो ही गंभीर बाब आहे. याची शहानिशा करा.

**मा. आयुक्त :-**

मी आपल्याला सबमिशन देऊ इच्छितो काशीमीरा रोडचा जो पोर्शन आहे. तो आता वाईन्ड अप करण्याच्या स्थितीत आहे आणि त्याच एजन्सीची कामे मुंबई शहरामध्येदेखील चालु आहेत. हा खुप मोठा प्लॅन, खुप मोठी कॅपॅसिटी आहे. तो आपल्या परिसरात त्यांनी आपले काम होईपर्यंत लावायला आपण त्यांना परवानगी दिलेली आहे. त्यांनी आम्हाला अशी विनंती केली की, एवढा मोठा प्लॅन या ठिकाणी आम्ही लावलेला आहे. परंतु, आमचे येथील काम कमी होत आलेले आहे. त्यामुळे आम्हाला मटेरियल बाहेर घेऊन जायला परवानगी दया. त्याला लेखी परवानगी दिलेली आहे. आपण त्या मटेरियलचे पैसे आपल्या खर्चातुन देत आहोत. असा जर आपला काही समज असेल तर त्याचा खुलासा आम्ही नक्की करु इच्छितो. तसे काही नाही. ही जी क्वान्टिटी आहे. ती तिकडची क्वान्टीटी आहे. आपल्या रस्त्यावर जी क्वान्टिटी वापरली जाते. तिचेच फक्त मेजरमेन्ट आपल्याकडे राहिल.

**रोहिदास पाटील :-**

पीठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीने बोलु इच्छितो.

**मा. महापौर :-**

असे जर प्रत्येकाने बोलायला सुरुवात केली तर सन्मा. सदस्य रोहिदास पाटील कसे आहे? ज्यांचा प्रश्न आहे त्याला उत्तर मिळाले. सगळे सन्मा. सदस्य बोलायला लागले.

**रोहिदास पाटील :-**

ज्यांनी प्रश्न विचारला त्यांनीच विचारावे हे मला मान्य आहे आणि हेही मला मान्य आहे की जेव्हा सभागृहाला माहिती देतो. त्याचा अर्थ सर्व सभासदांना पटत आहे. मान्य होते किंवा त्याच्यातील सगळ्यांच्या कानावर गोष्ट गेलेली आहे असा अर्थ निघतो. यातील जे एक उत्तर दिलेले आहे की, विस्थापितांना त्यांना त्यांची सोय केलेली आहे. सभागृहाच्या मी लक्षात आणु इच्छितो आपल्या लक्षात आणु इच्छितो की, एका दलित महिलेचे झुणका भाकर केन्द्र आपण तोडले आणि त्याचे विस्थापन झालेले नव्हते. त्यांना विस्थापित केलेले नाही. एका विधवा महिलेचे झुणका भाकर केन्द्र तोडले. आपण जे उत्तर दिलेले आहे. मग ते अपुऱ्या माहितीवर आहे की विचाराधीन आहे तुमची अशी समज

ज्यावेळी सभागृहात माहिती देतो. त्यावेळी आमची अशी धारणा आहे आम्ही या गोष्टीशी सहमत आहोत.

**मा. महापौर :-**

पुढचा प्रश्न.

**लिला पाटील :-**

जी कुठे माती टाकली गेलेली आहे ती नुकसान भरपाई संबंधितांकडून करण्यांत येईल का? माझा उपप्रश्न आहे. सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब विचारतील.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर त्यांचा उपप्रश्न आहे. माझी सभागृहाला विनंती आहे. अर्धा तासाचा आपला काय प्रश्न आहे? ज्याचा प्रश्न आहे त्यांनी जर विचारले उपप्रश्न त्याच्यात विचारला. त्यांची काय सुचना असली तर निश्चितपणे विचार करुन नोंद करु.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, माझी एक सुचना आहे की, त्यांनी प्रश्न मांडला होता. तो त्यांना बरोबर कधी मांडायचा समजले नाही. त्यामुळे मी उभा राहिलेलो. मी परवानगीने बोलतो.

**मा. महापौर :-**

कृपा करुन त्यांना बोलु दया.

**लिला पाटील :-**

तुम्ही आता जी माती टाकलेली आहे. ती माती ठेकेदाराने उचलली ती कुठे नेली? आणि ती संबंधित याची भरपाई करुन घेणार का? वसुल करुन घेणार का?

**मा. महापौर :-**

कमिशनर साहेबांनी आपल्याला सांगितले आहे त्याची तपशीलवार माहिती ते आपल्याला लेखी स्वरुपात देतील.

**लिला पाटील :-**

याच्यात दुसरा उपप्रश्न आहे. काही काही ठिकाणी गटाराची रुंदी कमी आहे. ह्या खर्चातुन वजा करणार ?

**शरदचंद्र वैरागडे :-**

त्याचे पैसे कमी करणार. त्याची रुंदी जिथे जिथे कमी केली त्याच्याप्रमाणे त्याला पेमेन्ट आहे.

**लिला पाटील :-**

दुसरा उपप्रश्न रस्त्यासाठी जो दगड वापरण्यात आला आहे तो निकृष्ट दर्जाचा आहे. त्याच्या तपासणीचे रिपोर्ट आले आहेत का?

**दिपक खांबित :-**

आपण जे व्हि.जि.टी.आय.कडुन प्रत्येक साईडवरुन प्रत्येक वेळेला दगड तपासुनच वापरतो. व्हिजिटीआयचे सर्टिफिकेट आहे.

**लिला पाटील :-**

त्याचे रिपोर्ट मला मिळेल का?

**दिपक खांबित :-**

हो, मिळेल.

**मा. महापौर :-**

पुढचा प्रश्न.

**लिला पाटील :-**

तिसरा उपप्रश्न आर.एम.सी. चे प्रमाण योग्य आहे का? आणि ते असल्यास सक्षम प्राधीकाऱ्याकडुन तपासणी करुन घेतलेले आहे का?

**दिपक खांबित :-**

हो, तपासणी केलेली आहे.

**लिला पाटील :-**

व्हायब्रोगेटर त्यावर वापरले जाते का?

**दिपक खांबित :-**

हो, वापरले जाते.

**लिला पाटील :-**

चौथा प्रश्न ठेकेदाराने मुदती मध्ये काम केले आहे का? नसल्यास त्यांच्याकडुन किती दंडात्मक वसुली करणार?

**दिपक खांबित :-**

ठेकेदाराने १५ फेब्रुवारी २००४ पर्यंत मुदत होती. त्याच्यानंतर जेव्हा प्रत्येकी ५०००/- रु. आपण दंड कपात करतो आतापर्यंत ५ लाख १० हजार रुपये आपण कापलेले आहेत. प्रत्येकी ५०००/- रु. आपण दंड वसुल करतो. १६ फेब्रुवारी २००४ पासुन वसुली सुरु आहे.

**लीला पाटील :-**

ड चा उपप्रश्न बघा. ज्यांना पुर्वीच्या धारकांना दिलेल्या क्षेत्राएवढे आहे की जास्त आहे. ज्यांना अतिक्रमणामध्ये तुटलेले आहेत. ज्याची घरे तुटलेली आहेत किंवा शेड तुटले आहेत. रस्ता रुंदीकरणामध्ये त्यांना त्यांच्या क्षेत्राएवढेच दिले की जास्त दिलेले आहे.

**मा. महापौर :-**

क्षेत्र तेवढेच दिले की जास्त क्षेत्र दिले असे विचारले आहे.

**दिपक खांबित :-**

तेवढ्याच क्षेत्राच्या दुरुस्तीच्या परवानग्या दिलेल्या आहेत.

**लिला पाटील :-**

धन्यवाद.

**परशुराम पाटील :-**

माझा प्रश्न नाही. मला थोडक्यात बोलायचे आहे. हे जे माईक आम्हाला हातात उचलावे लागतात. बसुन बोलले तर चालेल काय? माईकची उंची वाढवुन घ्यावी.

**प्र. सचिव :-**

प्रश्न १८ वा सन्मा. सदस्या सुरेखा गायकवाड यांचा प्रश्न आहे.

**मा. महापौर :-**

उत्तर दिलेले आहे.

**सुरेखा गायकवाड :-**

पीठासीन अधिकारी यांच्या परवानगीने बोलू इच्छिते. साहेब, मिरा भाईंदर रोडवरील गटाराचे काम हे फार कासवाच्या गतीने चालु आहे आणि दुकानापेक्षा आपल्या गटाराची उंची चार फुट जास्त आहे. तर माझी आपणाला, सभागृहाला आणि अधिकाऱ्यांनासुद्धा विनंती आहे की, जर गटाराची उंची आहे ती कमी करुन द्यावी. कारण दुकानदारांची ही मागणी आहे. कारण दुकानदार उंची वाढल्यामुळे फार अडचणीत आलेले आहेत.

**दिपक खांबित :-**

तुमच्याबरोबर पाहणी केली त्याप्रमाणे आपण प्रत्यक्ष जागेवर पण निर्देश दिलेले आहेत. उंची कमी करण्याबाबत सांगितलेले आहे.

**सुरेखा गायकवाड :-**

साहेब, काही ठिकाणी जिथे बिअर बार, व्हाईट हाऊस वगैरे आहेत. त्या ठिकाणी आपण उंची कमी केलेली आहे. बिअर बार जिथे जिथे आहेत. तिथे आपण उंची कमी केली आणि बाकीच्या दुकानदार समोरचे जे गटार आहेत. त्या गटाराची उंची आपण कमी केलेली नाही. तर असा भेदभाव का?

**दिपक खांबित :-**

तुमच्याबरोबर प्रत्यक्ष पाहणी करु आणि साईटवर असे काय असेल तर निर्णय घेऊ.

**सुरेखा गायकवाड :-**

साहेब, असे व्हायला नको की, आपण जे दुकानदार आहेत, त्यांच्याकडे दुर्लक्ष करता आणि बिअर बारवाले आहेत, त्यांची आपण मनधरणी किंवा त्यांच्याशी काहीतरी साटेलोटे करता, असे होता कामा नये.

**प्र. सचिव :-**

पुढचा प्रश्न सन्मा. सदस्य केशव घरत यांचा आहे.

**केशव घरत :-**

अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांना जो ओव्हरटाईम बंद केलेला आहे. आता महापालिका सुरु झाल्यानंतर सुद्धा सुरु करण्यात आलेला आहे की नाही. याच्यात दिलेले आहे की ओव्हरटाईम बंद केलेला आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

राज्य शासनाने ज्या नगरपालिकांना, महानगरपालिकांना एम.सी.एस.आर. म्हणजेच महाराष्ट्र सिव्हिल सर्व्हिस रुल लागु केला आहे. सिव्हिल सर्व्हिस रुल्सनुसार सर्व कर्मचाऱ्यांना ओव्हरटाईम शासनाने बंद केला आहे. ३६ कर्मचारी कामावर आहेत. आणि अग्निशामक विभागामध्ये कामावर आहेत. त्यांना पर्यायी म्हणुन बदली रजा देण्यात येत आहे.

**केशव घरत :-**

साहेब, यामध्ये लिहिलेले आहे की, कामगार अपुरे असल्या कारणाने त्यांना बदली रजासुद्धा देण्यांत येत आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

आता जिथे पुरेसे कामगार उपलब्ध झाले आहेत. तिथे एकुण ३६ कामगार आपण उपलब्ध करुन दिले आहेत. आणि आता त्यांना बदली रजा मिळत आहे. त्याच्यामुळे तो प्रश्न उद्‌भवत नाही.

**केशव घरत :-**

साहेब, दुसरा प्रश्न होता. आदेशाची पुर्तता केल्यामुळे हा उपविधी तयार झालेला आहे का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सर्व उपविधी तयार करण्याचे काम महापालिकेकडुन सुरु आहे आणि लवकरात लवकर सर्व उपविधी तयार करुन आपल्या महासभेच्या पटलावर सादर करणार आहोत.

**केशव घरत :-**

साहेब, तिसरा प्रश्न घोडबंदर किल्ल्या संदर्भात आहे. साहेब, सदरचा किल्ला हा महापालिकेच्या ताब्यात नाही. सदर बाब ही धोरणात्मक असल्याकारणाने हस्तांतराबाबत महापालिकेने निर्णय घेणे आवश्यक आहे. महापालिकेच्या ताब्यात आल्यानंतर अनुदानाकरीता प्रयत्न करण्यांत येतील. आपण पुरातत्व खात्याशी काही पत्रव्यवहार केला आहे का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सदरचा किल्ला हा आर्कालॉजी डिपार्टमेन्टच्या ताब्यात आहे. आणि माझ्या माहितीप्रमाणे आर्कालॉजी डिपार्टमेन्ट कधीही आपली मालमत्ता कोणाला हस्तांतरीत करीत नसते. हा ऐतिहासिक किल्ला असल्यामुळे त्याचे जतन करण्याची जबाबदारी आर्कालॉजी डिपार्टमेन्टचीच आहे.

**केशव घरत :-**

नाही. पुरातत्व खात्याचे असे म्हणणे आहे की, ते त्यांची मालकी कोणा दुसऱ्याला देत नाहीत. बरोबर आहे ना. परंतु मग अशी ऐतिहासिक वास्तु आपल्या महापालिकेच्या हद्दीत आहेत. त्या वास्तुचे कोणी जतन करायचे? आपण आपल्याकडे जरी हस्तांतरीत केले नाही तरीसुद्धा आपण तिकडे काहीतरी सुविधा डागडुजी किंवा एखादे गार्डन वगैरे बनविले. असे काही आपल्या महापालिकेला करता येणार नाही का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

किल्ल्याच्या परिसरामध्ये आर्कालॉजी डिपार्टमेन्टच्या नियमानुसार कोणतीही दुरुस्ती किंवा इतर खर्च आपल्याला अनुज्ञेय नाही. तथापि, किल्ल्याच्या बाजुला जी जागा किल्ल्याच्या ऐतिहासिक परिक्षेत्रात येत नसेल अशा जागेमध्ये त्याचा विचार निश्चितपणे करता येईल.

**केशव घरत :-**

साहेब, पुरातत्व खात्याशी आपल्या महापालिकेने पत्रव्यवहार केला आहे का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

आर्कालॉजी डिपार्टमेन्टशी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. आणि पत्रव्यवहारामध्ये त्यांनी स्पष्टपणे कळविले आहे की, हा किल्ला आपल्या ताब्यात देता येणार नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील यांचा प्रश्न आहे. मी सर्व विरोधी पक्षाच्या लोकांना खाली बसवतो. माझी विनंती आहे कृपा करुन त्यांचा प्रश्न आहे ते विचारतील त्यांना उत्तर देण्यांत यावे.

**केशव घरत :-**

साहेब, पत्रव्यवहार केला आहे का?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य केशव घरत मला असे वाटते की, तुम्हाला प्रश्नाचे उत्तर मिळालेले आहे. तुमच्यावतीने मी कमिशनर साहेबांना अशी सुचना करतो की, आर्कालॉजी डिपार्टमेन्टला ते हस्तांतरण करुन घेण्यासाठी पत्र लिहु नका. तर फक्त ब्युटीफिकेशनसाठी पत्र लिहा की, आम्हाला आमच्या शहरात हा ऐतिहासिक किल्ला आहे. त्याचे ब्युटीफिकेशन होणे गरजेचे आहे आणि फक्त ब्युटीफिकेशनसाठी महानगरपालिकेला परवानगी द्यावी. असे त्यांनी पत्र लिहावे आणि परवानगी घ्यावी. अशी मी तुमच्यावतीने त्यांना सुचना करतो. पुढचा प्रश्न सुरु करा.

**प्र. सचिव :-**

पुढचा प्रश्न सन्मा. सदस्या सुधा गोयंका यांचा आहे.

**सुधा गोयंका :-**

पीठासीन अधिकारी के इजाजत से बोलने इच्छित हुँ। माझा प्रश्न लिगल आणि इललिगल नळ कनेक्शनबाबत होता. आपण इथे लिहिलेले आहे ३१९ अनधिकृत नळ जोडणी अजुन दंडात्मक रक्कम वसुल करणे बाकी आहे. त्याच्यावर आता काय कारवाई केलेली आहे?

**एस. के. दशोरे :-**

दंडात्मक रक्कम वसुल करणे चालु आहे. पूर्वी १९६१ होते. आता १९९८ आपण वसुल केलेले आहे.

**सुधा गोयंका :-**

अजुन किती केले?

**एस. के. दशोरे :-**

१९६१ होते ते आता १९९८ झालेले आहे.

**सुधा गोयंका :-**

जे उरलेले आहेत. त्याच्यावर आता काय कारवाई केली.

**एस. के. दशोरे :-**

त्याची पण कारवाई चालु आहे. आणि लवकरांत लवकर ते करण्यांत येईल.

**सुधा गोयंका :-**

म्हणजे किती वेळ आहे? वर्षभर

**एस. के. दशोरे :-**

दोन महिन्यात कारवाई होईल.

**सुधा गोयंका :-**

पुढे एक प्रश्न होता. २५७ जणांचा फॉर्म विहित नमुन्यात सादर केलेले नाहीत. त्यापैकी भाईंदर (पूर्व) येथील इतके आहेत आणि इतके आहेत त्याच्यावर काय कारवाई केली?

**एस. के. दशोरे :-**

टोटल १७०१ जोडणीधारकांकडुन दंडात्मक ९ कोटी ५० लाख रुपये वसुल केलेली आहे.

**सुधा गोयंका :-**

ते तर आपण लिहिलेले आहे. बजेटमध्ये तरतुद दिली होती. तीन कोटीची दिलेली आहे आणि त्याच्या फक्त दोन कोटीचे तर एक कोटीचा हिशेब काय आहे?

**एस. के. दशोरे :-**

मागच्या बजेटला एक कोटीची तरतुद होती. आपण या वर्षी दीड कोटी वसुल केलेली आहे.

**रोहित सुवर्णा :-**

पावणे दोन कोटी. तुम्ही एका मिटिंगला एक बोलता आणि आज एक बोलता.

**मोहन पाटील :-**

साहेब, तुम्ही त्यांना बोलू द्या.

**सुधा गोयंका :-**

ते फक्त माहिती देत आहेत. फक्त अमाउन्ट सांगतात.

**मा. महापौर :-**

ज्यांचा प्रश्न आहे. त्यांनी कृपा करुन माहिती स्वतःकडे ठेवावी. आणि पुढच्या सदस्यांना माझी विनंती आहे.

**सुधा गोयंका :-**

पावणे दोन कोटीची आपण तरतुद दिलेली आहे.

**एस. के. दशोरे :-**

एक कोटीची तरतुद केलेली होती. आपण दीड कोटी बजेटमध्ये वसुल केलेली आहे.

**सुधा गोयंका :-**

मग उरलेली किती राहिली?

**एस. के. दशोरे :-**

म्हणजे आपण जास्तच केलेली आहे. अजुन जे कनेक्शन आहे. त्याच्यामध्ये आपण जे गावठाण विभागात होते. त्याच्यामध्ये असे लिहिले आहे की, टप्प्या टप्प्याने म्हणजेच चार टप्प्याने पेमेन्ट घ्यायचे ती कारवाई चालु आहे.

**सुधा गोयंका :-**

माझे म्हणणे आहे किती लोकांनी फॉर्म भरलेच नाही. म्हणजे आपण पण लिहिता. त्यांच्यावर काय कार्यवाही म्हणजे ज्यांनी इललिगल कनेक्शन घेतलेले आहेत आणि त्यांनी फॉर्म पण भरला नाही आणि त्यांनी आमच्याकडे इललिगल कनेक्शन आहेत असे सांगितले पण नाही. आपल्याला माहिती पडल्यावर त्याच्यावर काय दंडात्मक कारवाई आहे.

**एस. के. दशोरे :-**

त्याचा सर्वे चालु आहे.

**सुधा गोयंका :-**

त्याच्यावर एक्ट्रा दंडात्मक रक्कम वसुल करणार का?

**एस. के. दशोरे :-**

त्यांच्याकडुन घेणार आहे. सर्वे चालु आहे.

**सुधा गोयंका :-**

सर्वे चालु आहे. आपले म्हणणे बरोबर आहे. त्यांनी सांगितले की, आमच्याकडे इललिगल कनेक्शन आहे. त्यांच्यावर आपण दंडात्मक करतो. पण ज्यांनी सांगितलेच नाही. त्यांच्यावर डबल आहे काय? हे माझे विचारणे आहे.

**एस. के. दशोरे :-**

हे सर्व चालू आहे. सर्वे झाल्यानंतर

**सुधा गोयंका :-**

म्हणजे डबल त्यांच्यावर पण दंडात्मक कारवाई करणार का?

**एस. के. दशोरे :-**

हो करणार. नक्की करणार.

**सुधा गोयंका :-**

आता आपण दोन महिन्याची वेळ सांगितली आहे. दोन महिन्यानंतर नक्की.

**मा. महापौर :-**

प्रश्नोत्तराच्या तास संपला.

**प्र. सचिव :-**

प्रकरण क्र. १ सुरु करण्यापुर्वी तीन रजेचे अर्ज आलेले आहेत. सन्मा. महापौर मेंडोसा मायरा गिल्बर्ट, सन्मा. सदस्य आत्माराम बाळाराम गावंड आणि सन्मा. सदस्या मुक्ता रांजणकर यांचे रजेचे अर्ज आलेले आहेत.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १ चे वाचन केले.)

**अशोक पाटील :-**

मा. पीठासीन अधिकारी साहेब, विषयाला सुरुवात करण्याअगोदर या शहराच्या गरीब वस्तीशी निगडीत संबंधित अशी माझी लक्षवेधी सुचना मांडलेली आहे. कृपया त्याचा जरा खुलासा करा. या शहराच्या दलित वस्तीशी निगडित अशी एक लक्षवेधी सुचना मी आपल्याकडे दिलेली आहे. कृपया त्याचा खुलासा केला तर बरे होईल.

**मा. महापौर :-**

तुमच्या लक्षवेधी सुचनेबद्दल कमिशनर साहेबांना सुचना देतो की, याच्यावर योग्य ती कारवाई आपल्याशी चर्चा करुन त्याच्यावर योग्य निर्णय लवकरात लवकर घेण्यांत यावा.

**जयंत पाटील :-**

लक्षवेधी सुचना काय आहे? ती तरी आपल्या सभागृहाला कळु द्या. सभागृहात कोणाला माहिती नाही. लक्षवेधी सुचना काय आहे? ती गांभीर्याची आहे की गांभीर्याची नाही आहे. ते पीठासीन अधिकाऱ्यांनी ती सुचना आम्हाला कळली पाहिजे.

**मा. महापौर :-**

लक्षवेधी सुचना ज्या सदस्याची होती. त्याला उत्तर मिळालेले आहे.

**जयंत पाटील :-**

लक्षवेधी सुचना सभागृहात मांडलेली आहे. त्यामुळे सर्व नगरसेवकांना ही लक्षवेधी सुचना कळली पाहिजे.

**मा. महापौर :-**

सर्व नगरसेवकांना माहिती असेल की, लक्षवेधी सुचना घ्यायची कि नाही हा पिठासिन अधिकाऱ्यांचा अधिकार आहे.

**जयंत पाटील :-**

सभागृहाचे मत विचारा लक्षवेधी सुचना माहिती आहे का?

**मा. महापौर :-**

पीठासीन अधिकाऱ्याचा अधिकार असतो. तो फेटाळुन लावायचा की ठेवायचा. पाटील साहेब, असे आहे की, स्विकारले तर ते सभागृहात येईल आणि त्याच्यावर चर्चा होईल.

**जयंत पाटील :-**

त्या संबंधी काय नियम आहेत ते वाचुन दाखवा. लक्षवेधी सुचना फेटाळण्याबाबत काय नियम आहेत? ते सभागृहाला माहिती नको का? शहराच्या गांभीर्याशी काही निगडीत आहे का? कशासंबंधी आहे. आम्हाला ते कळण्याचा अधिकार आहे. तुम्ही नंतर फेटाळा. तुम्ही फेटाळण्याचा अधिकार तुम्हाला आहे. आम्हाला कळण्याचा अधिकार आहे. लक्षवेधी सुचना काय?

**मा. महापौर :-**

लक्षवेधी सुचना जर चर्चेला घेतली मगच ते सभागृहाच्यासमोर आणली जाते.

**जयंत पाटील :-**

अहो, पण सुचना काय ती तरी माहिती करुन द्या.

**मा. महापौर :-**

स्वीकारली तर ती चर्चेला येते. म्हणुन ते तसे होत नाही.

**प्रभात पाटील :-**

२०/०२/२००४ च्या इतिवृत्तांतामध्ये पान नं. ४१ मध्ये मी असे म्हटलेले आहे. सध्या मिरा भाईंदर शहरामध्ये सोन्याचे दिवस चालु आहेत. माझे वाक्य आठवत असेल तर मी असे म्हटले होते की, सध्या मिरा भाईंदर शहरामध्ये शरदाचे चांदणे आणि सोनियाचे दिवस चालु आहेत आणि हे सगळे असेच अटल राहणार आहे असे माझे शब्द होते आणि आता सध्या ती वस्तुस्थिती आहे. जसे आहेत. तशीच वस्तुस्थिती झाल्यामुळे माझे शब्द पूर्ण जसेच्या तसे आले पाहिजेत.

**मा. महापौर :-**

करेक्शन करण्यांत यावे.

**प्रभात पाटील :-**

वसंतही फुलणार आहे. माझे तीन शब्द होते. शरदाचं चांदण, सोन्याचे दिवस आणि हे सगळे अटल राहणार आहे. असे माझे शब्द होते.

**शशिकांत भोईर :-**

२५/२/२००४ च्या इतिवृत्तांतामध्ये पान क्र. १८ वर माझे संभाषण आहे. पण त्यांच्यावर लगेच कारवाई करणार का? नाही. करीत नाही असे लिहिलेले आहे. आपण त्याला असे लिहिलेले आहे. त्याला आले आहे. त्याच्यावर पाहिजे. आणि त्यांनी फोन करुन असे लिहिलेले आहे. तुम्ही करुन असे पाहिजे. पान क्र. २२ वर सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांचे संभाषण आहे. उपकाराचे लिहिलेले आहे. पान क्र. २५ वर माझे त्यामध्ये संभाषण आहे. दीडशे घड्याळे पाहिजे होती. तिथे गाऱ्हाणे लिहिलेले आहे. शेवटुन चौथ्यामध्ये दीडशे घड्याळे पाहिजे.

**प्र. सचिव :-**

इतिवृत्तान्त मंजुर आहे.

**चंद्रकांत वैती :-**

दिनांक २०/२/२००४ व २५/०२/२००४ रोजीचे मा. महासभाच्या इतिवृत्तांतामध्ये सन्मा. सदस्यांनी ज्या दुरुस्त्या सुचविल्या त्या दुरुस्त्यासंह इतिवृत्तांत कायम करण्यांत यावे असा मी ठराव मांडत आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

या ठरावास मी अनुमोदन देत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अध्यक्ष महाशय, विषयपत्रिका सुरु करण्यापुर्वी मी सांगतो स्थायी समितीने जकात ठेके का जो मंजुर किया था।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी तो विषय नाही आहे. आपण विषयांतर करु नका. माझी आपल्याला विनंती आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा विषय नाही आहे. आज महापालिकेत स्थायी समितीमध्ये ठराव झालेला आहे. ठरावाप्रमाणे दुसरा ठेकेदार कोर्टात गेलेला आहे. शहरामध्ये उलटसुलट चर्चा आहे. आम्ही स्थायी समितीमध्ये नव्हतो आणि स्थायी समितीमध्ये हा ठराव झालेला आहे. महासभेत आम्ही ८५ नगरसेवक बसतो. तर लोक आम्हाला विचारतात काय चाललेले आहे. म्हणुन तो जकातचा विषय कोर्टामध्ये चाललेला आहे. ती माहिती इकडे महासभेला दिली पाहिजे. असे आमचे म्हणणे आहे. कारण लोक आम्हाला विचारतात. कृपया प्रश्न फक्त स्थायी समितीमध्ये झालेला आहे. महासभेत झालेला नाही आहे. निवडणुकीची आचारसंहिता म्हणुन आपण हे सर्व केलेले आहे.

**मा. महापौर :-**

या संदर्भात जर आपल्याला एवढी गंभीरता होती तर आपल्याला महापौरांकडे किंवा आयुक्तांकडे तसे पत्र देऊन तो विषय सभेमध्ये घेण्यासाठी विनंती करायला पाहिजे होती.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जेव्हा एखादया नगरसेवकाला या शहराबद्दल आपुलकी असते. तुम्ही तशी लक्षवेधी फेटाळता. प्रश्न आमचा तुम्ही घेणार की नाही आताही तुम्ही सांगा. चर्चेला आम्ही बसतोय. आम्हाला हे म्हणायचे आहे की, जकात हा विषय कोर्टामध्ये चालु आहे. याची माहिती सभागृहाला दिली पाहिजे. हा विषय ज्वलंत विषय आहे. काही साधा विषय नाही आहे. मग तुम्ही सांगा नाही देत, ठिक आहे.

**प्रकरण क्र. १ :-**

दि. २०/०२/२००४ व दि. २५/०२/२००४ रोजीचे मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ३ :-**

दि. २०/०२/२००४ व दि. २५/०२/२००४ रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्री. हॅरल बोर्जीस.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**मा. महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी विषय क्र. २ चे वाचन केले.)

**चंद्रकांत वैती :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील कर्मचारी श्री. रिपीन पोशा पाटील यास महाराष्ट्र नागरी सेवा शर्ती नियम १९८१ मधील तरतुदीचा भंग केल्याबद्दल गैरशिस्त व बेजबाबदार वागणुकीबद्दल ठराव क्र. मिभा/मनपा/आस्थापना५८२/४३३०/०३/०४ दिनांक ६/८/२००३ रोजी कारणे दाखवा नोटिस बजावण्यात आली होती. या नोटीसलादेखील उत्तर टाळाटाळ केल्याने व सदर कर्मचारी यांचा पूर्वइतिहास तपासला असता त्यास वारंवार कार्यालयाची पूर्व परवानगी न घेता गैरहजर राहण्याची सवय दिसुन येते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम ५६ नुसार सदर कर्मचाऱ्यास जावक क्रमांक मिभा/मनपा/आस्था/१४११/८५९२/०३-०४, दि. १६/१२/०३ च्या आदेशाचे उल्लंघन केलेले आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६-१(ब) अन्वये निलंबन सहा महिन्याच्या

मुदतीत कायम करण्याची तरतुद आहे. उक्त कलमान्वये मा. महासभेने सहा महिन्याच्या मुदतीत निलंबन कायम केले नाहीतर तर हे निलंबन संपुष्टात येईल. अशीही तरतुद आहे. निलंबित कर्मवारी श्री. रिपीन पोशा पाटील यांचे दिनांक १६/१२/०३ चे निलंबन आदेश कायम करण्यास मा. महासभेने मंजुरी दयावी. असा मी ठराव मांडत आहे.

**रविंद्र माळी :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

महापौर महोदय, या संपुर्ण विषय क्रमांक २ मध्ये महाराष्ट्र नागरी सेवा शर्ती नियम १९८१ मधील तरतुदीचा भंग केल्याबद्दल गैरशिस्त आणि बेजबाबदार वागणुकीबद्दल आपण त्यांना जे पत्र पाठविले आहे. ६/०८/२००३ ने कारणे दाखवा नोटिस दिलेली आहे. सदर निलंबनाचा विषय आहे. कर्मचाऱ्यांनी काही चुका केल्या असतील आम्ही हे म्हणत नाही. त्यांनी नसतील केल्या. पण जसे तुम्ही खालच्या ठिकाणी महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (अ)(ब) अन्वये निलंबन सहा महिन्याच्या मुदतीत कायम करण्याची तरतुद आहे. अशा ज्या काही तुम्ही खाली तरतुदी कलमासहित स्पष्ट दिलेल्या आहेत. आज हा कायदा माझ्याकडे आहे. पण वरच्या दोन ह्याच्यामध्ये कुठच्या तरतुदीनुसार तुम्ही कारवाई करता हे कुठेही लिहिलेले नाही. ह्याच्यामध्ये अनेक तरतुदी आहेत. ह्याच्यापैकी तुम्ही नेमकी कुठल्या कायद्यानुसार किंवा कुठल्या नियमानुसार किंवा कुठल्या पोटकलमानुसार कुठली तरतुद केली आहे. याचा तुम्ही कुठेही उल्लेख दिलेला नाही. हा उल्लेख या सभागृहामध्ये तुम्ही क्लिअर करा. आणि मग हा विषय पुढे चालु ठेवा. आम्ही कसा काय निर्णय घेणार? माझ्याकडे नियम कायदयाचे पुस्तक आहे. पण मी आज शोधु शकत नाही. की, ह्याच्यात कुठला सेक्शन तुम्ही लावलेला आहे. हा सेक्शन जरा लावायला सांगा. कुठल्या सेक्शननुसार ते. आम्हाला सांगा कुठचा सेक्शन आहे तो. हा जो महाराष्ट्र सर्व्हिस रुलचे जो १९८१ चा कायदा आहे. याच्यातील आपण कुठल्या नियमानुसार अगदी पॉइन्टवाइस सांगा. कर्मचाऱ्यावर आपण कारवाई आणि एक त्याला बेशिस्तीबद्दल आपण त्याला शास्ती करणार आहोत. ही शास्ती करित असताना आपल्याला असलेल्या पावर्समध्ये आपण करता त्या पावर्स आपण आम्हाला सांगा. नुसते वेग असे लिहुन चालणार नाही. कारण हे प्रकरण पुढे पुन्हा अपिलात जाणार त्याच्यामध्ये पुढे तुमचा निर्णय टिकला पाहिजे. आयुक्तमहोदय, आपला निर्णय शेवटपर्यंत टिकावा अशी आमची इच्छा आहे. तर जरा मेहेरबानी करुन क्लेरिफिकेशन द्यावे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य मिलनजी म्हात्रे आपण विचारल्याप्रमाणे आपल्या प्रश्नाचे उत्तर मा. आयुक्तसाहेबांच्या संमतीने देत आहोत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम ५६ १ (ब) नुसार संबंधित कर्मचारी रिपीन पोशा पाटील सातत्याने नोकरीवर गैरहजर राहत असल्यामुळे तो जेव्हापासुन नोकरीला लागला तेव्हापासुन त्याचा रेकॉर्ड तपासला असता गैरहजर राहणे ही त्याची प्रवृत्ती असल्यामुळे त्याला आयुक्तसाहेबांनी निलंबित केले आणि त्या निलंबनाला मंजुरीसाठी हा प्रस्ताव आपल्या सभागृहाच्या पटलावर आलेला आहे. सातत्याने जर आपण रिपीन पाटील यांची सेवा बघितली तर ९० साली तो २५ दिवस विना परवाना गैरहजर होता. त्याच्यानंतर ९३ साली १९ महिने सातत्याने गैरहजर होता. त्याच्यानंतर १८८ दिवस गैरहजर होता. ९४ मध्ये परत तो तीन महिने गैरहजर होता आणि हे सर्व रेकॉर्ड बघितले असता आतासुद्धा तो गेल्या ५/७/०३ पासुन गैरहजर आहे. कार्यालयाला कोणत्याही तऱ्हेची परवानगी न दिल्यामुळे त्याला महाराष्ट्र नागरी सेवा नियम याच्या कलम ४८ (२) नुसार जो कर्मचारी चार दिवसापेक्षा अधिक काळ सातत्याने गैरहजर राहतो. कार्यालयाला पूर्व परवानगी न देता गैरहजर राहतो. अशा कर्मचाऱ्याला निलंबित करण्याचे प्रयोजन शिस्त भंगाची कारवाई करण्याचे प्रयोजन अधिनियमात आहे. त्यानुसार ही कारवाई प्रस्तावित केली आहे. आणि त्याच्या निलंबनास मंजुरीसाठी प्रस्ताव सभागृहाच्या पटलावर येत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण कारवाई करण्याच्या अगोदर आपण जो अधिनियम दिला आहे. त्याच्या सेक्शन १०३, १०४, १२०, १२५, १२९ नुसार आपण सर्व चौकश्या केलेल्या आहेत का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

चौकशी अधिकारी नियुक्त करण्यात आलेले आहेत. चौकशी अधिकाऱ्यांमार्फत चौकशीसुद्धा पूर्ण होत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे त्याचा अर्थ असा आहे. चौकशी पूर्ण न होता त्याला आपण निलंबित करतो आहे. आपल्या म्हणण्यानुसार असे सिद्ध होत आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

प्रत्येक कर्मचाऱ्याला चौकशीच्या पूर्वी निलंबित करण्याचे अधिकार आयुक्तसाहेबांना आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

परंतु, आपण त्यांचे गोपनीय अहवाल तयार केले का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

हो. केलेले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

त्याचें काय आपण शासनाला कळविले आहे का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

हो. कळविले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कारण हे आमच्या या विषयावर कुठेही काहीही लिहिलेले नाही.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

हा फक्त विषय असा आहे की, जे आयुक्त साहेबांनी निलंबन केले. ते कायम करण्याकरीता सहा महिन्याच्या आत सभागृहाच्या पटलावर ठेवुन ते कायम करण्याचे अधिकार महासभेस असल्यामुळे हा विषय सभागृहापुढे आणलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणुनच आम्ही ही चर्चा करतो आहे. नुसते कायम बोलुन अर्थ नाही. आपला कायम टिकले पाहिजे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सर्व तरतुदींचा अवलंब करुन कारवाई सुरु आहे.

**मा. महापौर :-**

आपण विचारलेल्या प्रश्नाला उत्तर मिळालेले आहे.

**प्रकरण क्र. २ :-**

निलंबित लिपीक कर्मचारी श्री. रिपीन पोशा पाटील यांचे निलंबन कायम करणे बाबत.

**ठराव क्र. ४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील लिपीक कर्मचारी श्री. रिपीन पोशा पाटील यास महाराष्ट्र नागरी सेवा शर्ती नियम १९८१ मधील तरतुदीचा भंग केल्याबद्दल गैरशिस्त व बेजबाबदार वागणुकी बद्दल जा.क्र. मिभा/मनपा/आस्था/५८२/४३३०/०३-०४, दि. ६/८/०३ ने कारणे दाखवा नोटीस बजाविणेत आली होती. त्या नोटीस उत्तर देणेचे टाळाटाळ केल्याने व सदर कर्मचारी यांचा पूर्व इतिहास तपासला असतां त्यास वारंवार कार्यालयाची पूर्व परवानगी न घेता गैरहजर राहण्याची सवय दिसुन येते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ नुसार सदर कर्मचाऱ्यांस जा.क्र. मिभा/मनपा/आस्था/१४११/८५९२/०३-०४, दि. १६/१२/०३ ने आदेशाचे दिनांका पासून निलंबित केले आहे व सध्या या प्रकरणी विभागीय चौकशी सुरु आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६, १(ब) अन्वये निलंबन सहा महिन्याचे मुदतीत कायम करण्याची तरतुद आहे. उक्त कलमान्वये मा. महासभेने सहा महिनेचे मुदतीत निलंबन कायम केले नाही, तर हे निलंबन संपुष्टात येईल, अशीही तरतुद आहे. निलंबीत कर्मचारी श्री. रिपीन पोशा पाटील यांचे दि. १६/१२/०३ चे निलंबन आदेश कायम करण्यास मा. महासभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्री. रविंद्र माळी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३ चे वाचन केले.)

**परशुराम पाटील :-**

मा. पिठासिन अधिकारी साहेब, बालवाडीला जे आता आपण आहार पुरवठा करणार आहात. तर यांच्यापुर्वी गेल्या वर्षी किती खर्च झाला? याचा तपशिल जरा दाखवा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

गतवर्षी १५ लाख ४५ हजार हा एकूण यासाठी खर्च आलेला आहे आणि अर्थसंकल्पात तरतुद होती. त्याच्या आतच हा खर्च झालेला आहे.

**रक्षा शाह :-**

मा. पिठासीन अधिकाऱ्यांच्या आदेशाने बोलू इच्छिते. साहेब, याच्यामध्ये आपण १५ लाखाची तरतुद केलेली आहे. महानगरपालिकेच्या बालवाड्या २५ ते २७ आहेत. त्यात २७०० मुले आहेत. एका मुलाला इकडे तुम्ही आहार लिहिलेला आहे. १०० ग्रॅम फुटाणे, १०० ग्रॅम गुळ-शेंगदाणे आहे, बिस्कीटे आहेत, अंडी आहेत. हा सगळा आहार मिळून अर्धा किलोपर्यंत ते पोहोचणार आहे. एका मुलाला अर्धा किलो अन्न जर एका वेळी दिले तर पूर्ण दिवसाचे आहे की, आठवड्यातून एक वेळा आहे आणि तुम्ही जी चौकशी केली आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्या रक्षा शाह, हे जे आपण प्रति विद्यार्थ्यांमागे प्रमाणानुसार मागविलेले आहे. सर्व एकाच दिवशी सर्व विद्यार्थ्यांना देण्यांत येणार नसून आहाराप्रमाणे जो तपशिल दिला आहे त्या तपशिलाप्रमाणे सर्व आहाराची जे आपण आहार मागविलेले आहे त्यानुसार प्रति दिवशी असा आहार विद्यार्थ्यांना उपलब्ध केला जाईल.

**रक्षा शाह :-**

म्हणजे रोज वेगवेगळा आहार देणार का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

हो, रोज वेगवेगळा आहार देणार.

**रक्षा शाह :-**

यामध्ये लिहिलेले आहे की, गेल्या वेळी जो आहार दिला त्यात प्रकृती सुधारणा झालेली आहे. तर आपण कुठल्या डॉक्टरकडून त्यांची तपासणी करुन घेतलेली आहे का? प्रकृती सुधारणा झालेली आहे असे लिहिलेले आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

आपल्या आरोग्य केंद्रामध्ये तपासणी करण्यांत आलेली आहे आणि सातत्याने आरोग्य केंद्रामध्ये आपण असे शिबिर पण अनेक ठिकाणी घेतलेले आहे.

**रतन पाटील :-**

मा. उपमहापौरांच्या परवानगीने बोलतो, महानगरपालिकेच्या हद्दीत असणाऱ्या एकंदरीत २५ बालवाड्यांना सकस आहार पुरविण्यासाठी आलेला ठराव या ठरावाला मंजुरी देण्यासाठी मा. पिठासिन अधिकाऱ्यांना विंनती आहे की, ही जी टिपणी दिलेली आहे ती पूर्णतः अपूर्ण आहे. गेल्या वर्षी किती खर्च झाला आणि गेल्या वर्षी किती विद्यार्थी या बालवाड्यांमध्ये शिक्षण घेत होते? तीसुद्धा पूर्ण त्रुटी ह्याच्यामध्ये कमी आहे. ह्याच्यामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शैक्षणिक २००४-०५ या शैक्षणिक वर्षासाठी ही निविदा आपण मागवित आहोत. माझा प्रश्न समजावून घ्या. २००४ एकंदरीत शाळेला विद्यार्थ्यांचे किती दिवस आणि विद्यार्थ्यांवर किती खर्च केला जातो? हे मला सांगा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य रतनजी पाटील आपल्या एकूण २५ बालवाड्या आहेत आणि त्यामध्ये १७०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

**रतन पाटील :-**

त्यामध्ये १७०० विद्यार्थी रोज हजर असतील की गैरहजर असतील.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

हो, असतात. त्याप्रमाणे त्याचे बिल अनुपस्थीतीप्रमाणे दिले जाते. प्रति विद्यार्थ्यांमागे तीन रुपये अडतीस पैसे आपण खर्च करीत आहोत आणि आपण जी बिले देतो ती उपस्थितीप्रमाणे देतो.

**रतन पाटील :-**

शालेय कामकाजाचे बालवाड्यांचे दिवस किती?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

शालेय कामकाजाचे दिवस राज्य शासनाच्या प्राथमिक शिक्षण विभागाने ठरवून दिले आहेत. जे शैक्षणिक सत्र राहते त्यानुसार जे अनुज्ञेय आहे आणि सुट्टीचे दिवस वगळून सुट्टीच्या कोणत्याही दिवसाचे बिल अदा केले जात नाही.

**रतन पाटील :-**

किती दिवस? आपणाला माहिती आहे का? शाळेचे कामकाज किती दिवस असते? वर्ग किती दिवस असतात? आणि सुट्ट्या किती?

**मोहन पाटील :-**

माहिती द्या आणि आपला जो प्रशासकीय आणि आर्थिक मंजुरीचा विषय आणलेला आहे. आवश्यक ती माहिती द्यावी आणि आवश्यक ती माहिती सभागृहाला द्यावी.

**रतन पाटील :-**

आपण हे करु नका. ते उत्तर द्यायला सक्षम आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आर्थिक मंजुरीसह मंजुरी असते प्रत्येक गोष्टी तुम्ही असे सांगू नका.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य एकूण २४० दिवस शैक्षणिक सत्राचे पकडले जातात.

**रतन पाटील :-**

२१० ते २२० दिवस पकडले जातात. २४० नाही आहेत. ३६५ दिवसामध्ये २४० दिवस पकडले जातात.

**ए. के. संन्याशिव :-**

३६५ दिवसामध्ये २२० ते २४० दिवस भरले पाहिजेत. त्याच्यामध्ये ८० दिवस सुट्टी असते, बाकीचे रविवार.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अध्यक्ष महाशय, शिक्षण अधिकाऱ्यांनी जरा हे सांगावे. २५ बालवाड्यांमध्ये आपण कधी गेला आहात का?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी कसे आहे, जो विषय आहे त्या विषयाच्या अनुषंगाने जर आपण बोललात तर योग्य राहील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, या विषयामध्ये नगरपालिकेच्या वेळी १७०० विद्यार्थी आणि २५ बालवाड्या. महापालिकेचे वेळेस १७०० विद्यार्थी २५ बालवाड्या. म्हणजे बालवाड्यांचा विद्यार्थी पुढे जातच नाही. तो १७ च्या आकड्यावर अडकतो काय? म्हणून मी विचारतो आहे. तुम्ही बालवाड्यात भ्रमण केले आहे का? एकंदर बालवाड्यांची शिक्षण पद्धती घेतली का? फक्त मागची प्रोसिडींग बघून १७०० देऊन टाकतात.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी आपणांला माहिती असेल की, जेव्हा नगरपालिकेने शाळा आपण ताब्यात घेतल्या त्यावेळी ज्या त्यांच्या शाळा अस्तित्वात होत्या तिथे बालवाड्यासुद्धा होत्या, अंगणवाड्या ज्या होत्या.

**ओमप्रकाशजी अग्रवाल :-**

मी सांगतो फक्त त्या बालवाड्यांमध्ये ते गेले असतील तर १७०० चा आकडा १६५५ किंवा १७०० च्या पार झाला असता. पण मागच्या प्रोसीडींगमधून बघून फक्त आर्थिक व प्रशासकीय मंजुरी घेतात. ते बालवाड्यात भ्रमण करीत नाहीत आणि इकडे आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देतांना त्यांनी खरोखर काय आकडा आहे तो सांगितला पाहिजे आणि बालवाड्यासकट त्यांनी दिले पाहिजे. या बालवाडीमध्ये २५ वगैरे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

दरवर्षी पटसंख्या वाढत असते. बालवाड्यांच्या संख्यांची वाढ झालेली नाही. बालवाड्या ज्या आहेत त्या दुर्बल घटकाच्या भागातच आपण पाहतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पटसंख्या १७०० आहे. तीन प्रोसिडींगमध्ये बघा ती १७०० च्या वर गेलेली नाही. बालवाड्या वाढल्या नाहीत ते मला पण माहिती आहे. मी सांगतो बालवाड्या वाढल्या नाहीत.

**मा. आयुक्त :-**

१७०० जो आहे तो एक ॲव्हरेज फिगर आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, आपण अधिकाऱ्यांची बाजू घेऊ नका. एकतर बालवाड्यांची संख्या देतांना त्यांनी किमान १७ बालवाड्या आहेत. अंदाज १७ याच्यामध्ये एवढी मुले, एवढ्या मुली आहेत. प्रत्येक वेळी अंदाज घेऊन तुम्ही आर्थिक व प्रशासकीय मंजुरी घेतात. हे बरोबर नाही. त्यांच्याकडे फिगर आहे. बालवाड्या आपल्या क्षेत्रामध्ये आहेत.

**मा. आयुक्त :-**

बालवाड्यांची जी फिगर आहे ती बरोबर आहे. विद्यार्थ्यांची संख्या आपण ॲव्हरेज १७०० पकडलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, ॲव्हरेज काय पकडता?

**मा. आयुक्त :-**

याच्यात जास्त कमी होऊ शकेल.

**मोहन पाटील :-**

साहेब, अजून ॲडमिशन होण्याची बाकी आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, बघा मी काय सांगतो. अजूनही तुम्हांला सांगतो, तुम्ही पण शिक्षणाधिकाऱ्यांचे त्यांचे हितचिंतक असाल. मला माहिती नाही. असे तुम्ही हितचिंतक राहणार अधिकारी वर्ग तुम्हांला अभयदान देईल.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी, आपण मांडलेला प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. माझी प्रशासनाला सुचना राहील की, सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांना मागच्या वर्षीची तपशिलवार माहिती लेखी स्वरुपात आपण त्यांना कळवावी आणि या वर्षाची सुद्धा ज्यावेळी तुमच्याकडे ॲडमिशन्स होतील त्याची माहिती त्यांना कळवावी.

**हॅरल बोर्जीस :-**

विषय क्र. ३, महानगरपालिका बालवाडी शाळेत विद्यार्थ्यांसाठी सन २००४-०५ या सालासाठी सकस आहार पुरवठा करण्याकामी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळण्याबाबत. महानगरपालिकेच्या एकूण २५ बालवाड्या सुरु आहेत. सदर बालवाड्यांमध्ये १७०० मुले व मुली शिक्षण घेतात. सदरची मुले झोपडपट्टी व आर्थिक दृष्ट्या कमकुवत वर्गाची असतात. त्यामुळे बालवाडीतील मुला-मुलींना सकस आहार देणे गरजेचे आहे. बालवाड्यांमधील मुलांना आठवड्याचे सहा दिवस रजा वगळता मोड आलेले कडधान्ये, उसळी, मसाल्यामध्ये तयार केलेली, शेंगदाणे व गुळ, फुटाणे, उकडलेली अंडी, नाचणीयुक्त सोयायुक्त बिस्कीट, केळी इत्यादी प्रकारचा आहार द्यावयाचा आहे. सन २००४-०५ पर्यंन्त सकस आहाराबाबत निविदा मागविण्यात याव्या व येणाऱ्या रुपये १५ लाख अंदाजित खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे असा ठराव मी मांडत आहे.

**मिलन पाटील :-**

या ठरावाच्या बाजूने नाही. परंतु, माझी एक अशी सुचना आहे की, हा आहार जो आपण देतो हा आहार देतांना आपल्या बालवाडीची वेळ फार कमी असते. दोन, अडीच, तीन तासाची लहान मुलांची वेळ असते. हा आहार देताना जे आहार देणारे कॉन्ट्रॅक्टर आहेत ते कमीत कमी दोन तास त्याच्यातच घालवतात. तर त्यांनी पॅकिंग केलेले पण बाहेरुन त्यामध्ये काय आहे? ते दिसले पाहिजे. अशा स्वरुपाच्या प्लॅस्टीकच्या पिशव्यांमध्ये त्यांनी आणून अमुक जो विद्यार्थी असेल त्याला ताबडतोब पंधरा वीस मिनीटे किंवा अर्ध्या तासामध्ये तेवढे आटोपले पाहिजे. त्याच्यानंतर मुलांची वेळ ठेवली पाहिजे की, किती वेळामध्ये त्या मुलांनी खाल्ले पाहिजे. आपण सकस आहार देतो. मुले पिशव्या घेऊन घरी जातात. त्याच्यानंतरची जी काही जबाबदारी असते. या बालवाड्या चालविणाऱ्या ज्या शिक्षिका असतात त्यांची जबाबदारी आहे का? तेवढे विद्यार्थी जे सकाळी आलेले असतात. तेवढेच विद्यार्थी शाळा सुटेपर्यंत राहिले पाहिजेत. नाही तर अर्धे विद्यार्थी खाऊ मिळाल्यानंतर ताबडतोब घरी

जातात. हा जो आपण खर्च करतो त्यामागे त्या विद्यार्थ्यांचे शिक्षणसुद्धा झाले पाहिजे आणि त्या शिक्षणाच्या दृष्टीकोनातून सुदृढ झाले पाहिजे. आहाराच्या दृष्टीकोनातून पण सुदृढ झाले पाहिजे ही माझी एक सुचना आहे. ही आपण त्यांना वेळोवेळी सुचना देऊ. दुसरी माझी एक अशी विनंती आहे की, आज आपली महासभा चालू असताना पत्रकारांनी आपल्यावर बहिष्कार टाकलेला आहे.

**मा. महापौर :-**

ह्या विषयामध्ये तो विषय घेऊ नका.

**मिलन पाटील :-**

पण त्याबाबत आयुक्तांनी दिलेले आहे का? काय ठरविले आहे का? साहेब, ही गंभीर बाब आहे. पत्रकार नसतांना आपली सभा चालली या सभेच्या ह्याला प्रसिद्धी मिळणार कशी? पत्रकार का आपल्या सभेला नाही आहेत त्याचे उत्तर कमीत कमी काय लेखी दिले असेल तर ते का रागावले? जनरल सभा आहे. जनरल वृत्तांत बाहेर गेल्यानंतर लोकांना काय समजणार. त्यांनी तुमच्याकडे लेखी दिले असेल की, ते तुमच्यावर का रागावले आहेत?

**केशव घरत :-**

पिठासिन अधिकारी, यांच्या परवानीने बोलतो. आता इथे अंगणवाडीच्या मुलांसाठी जी आहाराची चर्चा सुरु आहे. परंतु माझा असा विषय आहे. आपल्या महापालिकेच्या ज्या प्राथमिक शाळा आहेत.

**मा. महापौर :-**

अंगणवाडीच्या संदर्भात फक्त बोला. प्राथमिक शाळेच्या बाबतीत बोलू नका.

**केशव घरत :-**

जो सकस आहार दिला जातो. ही खिचडी शिजविण्यासाठी जे कॅटरर्स लोकांना परंतु खेडेगावातील चेना, घोडबंदर येथील काही शाळा आहेत. या शाळांतील खिचडी शिजविण्यासाठी आम्ही गावातील ज्या विधवा आहेत त्या महिलांना सांगितलेले आहे. आज त्या महिलांना जवळजवळ ऑक्टोबरपर्यंन्तचे खिचडी शिजविण्याचे पैसे मिळालेले आहेत. ऑक्टोबर ते आज सहा महिने एप्रिलपर्यंन्तचे झाले. हा जो मोबदला त्यांना मिळायला पाहिजे तो मिळालेला नाही. हा महाराष्ट्र शासनाकडून पण मिळाला नाही आणि आपण आपल्या महापालिकेमार्फत जे ५० पैसे जास्त देऊ केले होते. ५० पैसे महाराष्ट्र शासनाचे, ५० पैसे महापालिकेचे. परंतु आपल्या महापालिकेने आजपर्यंन्त एकही पैसा त्यांना दिलेला नाही आणि आता जर ७ तारखेला शाळा सुरु होतात. याच्यापुढे जर त्यांनी खिचडी शिजविली नाही. मग हा प्रकार कोण करेल? खिचडी शिजवून देण्याचे काम कोणी करायचे?

**मा. आयुक्त :-**

या सभागृहाने शासन जे ५० पैसे खिचडी शिजविण्यासाठी देते त्याच्यामध्ये आपले आणखी ५० पैसे त्याच्यामध्ये सामील करुन एक रुपया त्यावर खर्च करावा असे ठरविलेले होते. परंतु, त्यानंतर आचारसंहितेचा काळ सुरु झाला आणि टेंडर फायनलाईजची प्रक्रिया होऊ शकली नाही. आता जे शैक्षणिक क्षेत्र सुरु होते. त्यासाठी आम्ही टेन्डरची प्रक्रिया सुरु केलेली आहे. एक रुपया दराने जे केटरर्स विद्यार्थ्यांना उत्तम रितीने शिजवून ही खिचडी खाऊ घालतील. त्यांच्यासाठी आपण ही निविदा कॉल करतो आहे. आपला दुसरा जो मुद्दा होता की, ते ५० पैसेदेखील काही संस्थांना मिळालेले नाही आहेत. मला वाटते, मागच्या आठवड्यातच मी त्या बिलावर सह्या केलेल्या आहेत. गव्हर्नमेंटकडून फन्डस् यायला थोडासा विलंब झालेला होता. ते पैसे त्यांना लवकरच देण्याची व्यवस्था आम्ही करीत आहोत किंवा त्यांचे पेमेन्ट झालेले असावे.

**रोहिदास पाटील :-**

बालवाडीला सकस आहार देण्यासाठी आपली चर्चा चाललेली आहे. मी या सभागृहाचे, पिठासीन अधिकाऱ्यांचे लक्ष वेधू इच्छितो आहे. प्रशासन एक बाजूने ठराव आणते त्याला आपण मंजुरी देत असतो. सभागृहातील सर्व सदस्यांचा त्याच्याकडे बघण्याचा एक प्रामाणिक दृष्टीकोन असतो. हे या शहरासाठी होते. या विद्यार्थ्यांसाठी होते. मी या सभागृहात सांगू इच्छितो की, जी बालवाड्यांची संख्या दिली, आता संख्येमध्ये पटसंख्या अधिकारी सांगू शकले नाहीत. १७ बालवाड्या आहेत. त्यातील बंदरवाडीची बालवाडी कुठे बसेल? याची काही व्यवस्था कोणाला माहिती आहे का? या सभागृहात मी माहिती देऊ इच्छितो की, अधिकाऱ्यांचे कामकाज या ठराविक एका समितीचे कामकाज काय चालले आहे? जेव्हा शासनाचा दृष्टीकोन, या महापालिकेचा दृष्टीकोन सर्वसामान्य गरिब नागरिकाला ही महापालिका शाळा देऊ इच्छिते, शिक्षण देऊ इच्छिते किंवा त्याचा उद्धार करु इच्छिते. मी प्रशासनाच्या विरुद्ध बोलतो आहे म्हणून प्रशासनाने आधी ऐकायचे आहे आणि सदस्यांनी समजावून

घ्यायचे आहे. आयुक्त साहेब, तुम्हीच जर ऐकणार नाही तर मग मी कोणाला सांगणार? मी एवढे बोललो त्यातील तुम्हांला काहीच समजले नाही. त्याच्याकडून घेत होते. ते अजून देऊ शकणार नाहीत. जसे ते पटसंख्या सांगू शकले नाहीत. तशीच बंदरवाडीची बालवाडी कुठे बसणार याचेही उत्तर देऊ शकणार नाहीत आणि त्यातील तेच खरे आहे की, यांच्याकडून जबरदस्तीने बांधकाम खात्याचे अधिकारी, शाळेच्या एका शिक्षणाधिकारीकडे जबदरस्तीने मागतात की, तुमची एन.ओ.सी. द्या. कशा पद्धतीने तिथे प्रभाग कार्यालय सुरु झाले. मला निवेदन करु द्या. जेव्हा त्या ठिकाणी जागा म्हणजेच अंगणवाडी, बालवाडी आणि मराठी शाळेसाठी दहा खोल्यांचे वर्ग हवे आहेत, त्या ठिकाणी आता सात वर्ग आहेत. तीन वर्ग कुठे भरवणार? त्यावेळी आम्ही सात नगरसेवकांनी तुम्हांला दिले की, हा कोणताही प्रतिष्ठेचा विषय नाही आहे. बंदरवाडीच्या शाळेमध्ये तुम्ही प्रभाग कार्यालय सुरु करु नका. आयुक्तांच्या सुपिक डोक्यातून असे आणले की, स्थायी समितीचा ठराव करा आणि स्थायी समितीचे सभापती आज नाही आहेत. त्यांनी सांगितले, मी सांगतो आहे. मी वस्तुस्थिती सांगत आहे. आम्हाला प्रशासनाची याबाबतीत गंभीर दखल घेण्याची पाळी आलेली आहे. आम्ही सभागृहात बोलत नाही याचा अर्थ तुम्ही असे समजू नका की, सगळे काही चाललेले आहे की, जेव्हा आम्ही सात नगरसेवकांनी पत्र दिले, स्थायी समितीमध्ये ते पत्र ठेवण्यांत आले नाही. काय हेतू होता? लक्षात आले नाही. साहेब, आम्ही आपल्या निदर्शनास आणले की, हे चुकीचे चाललेले आहे. तरीसुद्धा नंतर पुर्तता करण्यासाठी तुम्ही शिक्षणअधिकाऱ्यांचे पत्र घेतले आणि आता जिथे तुम्ही प्रभाग कार्यालय सुरु केले. तीन वर्ग बंद केले. आता त्या ठिकाणी दहा वर्ग आवश्यक आहेत. मुख्याध्यापक आहेत. त्यांना वर्गच नाही आहे. या १७५ कोटीच्या महापालिकेमध्ये जिथे वर्षानुवर्षे शाळा चालते त्या शाळेमध्ये मुख्याध्यापकाला खोली नाही. त्या शाळेचे टायटल क्लिअर नाही. एका महिलेने तिच्या नावासाठी जागा दिलेली होती. त्या महिलेचे त्या शाळेला नांव लावले. त्या महिलेचा विरोध होता हे सांगून दिले होते, तरीसुद्धा आपण त्या ठिकाणी जबरदस्तीने प्रभाग कार्यालय केले. ज्यावेळी तलावाच्या ठिकाणी महापालिकेने ६५ लाख रुपये खर्च करुन इमारत बांधलेली आहे. पण ती तुम्ही उपयोगात आणली नाही. का उपयोगात आणली नाही? त्याचे बांधकाम खाते उत्तर देऊ शकत नाही. आयुक्त देखील उत्तर देऊ शकत नाहीत. ती जागा अजून तशीच आहे आणि कधी पण स्थायी समितीमध्ये अवलोकनार्थ विषय येतात. स्थायी समितीमध्ये आर्थिक व प्रशासकीय मंजुरी घेतात. त्याला कुठेही आधार नाही. आम्ही पत्र देऊ तेव्हा तुम्ही उत्तर द्या. आता ती पाळी आलेली आहे की, मला हे उत्तर हवे आहे की, आता बालवाडी कुठे भरेल? जी सतरावी बालवाडी.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य रोहिदासजी पाटील यांनी या ठिकाणी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्यांचा प्रस्ताव असा होता की, बंदरवाडीची जी शाळा आहे त्या ठिकाणी प्रभाग कार्यालय सुरु करु नये. ॲक्चुअली ज्यावेळी प्रभाग समितीच्या स्थापनेची घोषणा झाली. त्यानंतर प्रत्येक प्रभागामध्ये हे प्रभाग समितीचे कार्यालय कुठे असावे? याचा सर्वे केला गेला. हा सर्वे करीत असतांना बंदरवाडीची शाळा आम्हांला उपयुक्त वाटली. कारण ती लोकांच्या दृष्टीने सोयीची आहे, मध्यवर्ती आहे. त्या ठिकाणी मी स्वतः जाऊन दोन-तीन वेळा जाऊन त्या शाळेची पाहणी केली. त्या ठिकाणी ज्या वर्गांचा प्रश्न तुम्ही उपस्थित केला त्यांना कुठे पर्यायी जागा देता येईल या संदर्भातदेखील मी स्वतः पाहणी केलेली आहे. मुख्याध्यापकांना कुठे बसवायचे? क्लासेस कुठे बसवायचे? तिसरा जो त्या शाळेचा मजला आहे तो अद्यापही रिकामा आहे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, मला माहिती आहे. मी सभागृहात माहिती देतो आहे. व्यक्तिगत माहिती देत नाही. त्याचे रेकॉर्डींग होत आहे की, त्या ठिकाणी दहा वर्ग आवश्यक आहेत. आता तिथे सात वर्ग खाली आहेत. गेल्या वर्षी खोलीमध्ये दोन वर्ग भरत होते. ही वस्तुस्थिती होती. तुम्ही वस्तुस्थिती टाळली आहे. म्हणून मी आपल्याला पोटतिडकीने सांगत आहे.

**मा. आयुक्त :-**

त्या ठिकाणी त्यांची व्यवस्था करण्यांत येईल.

**रोहिदास पाटील :-**

कशी येईल?

**मा. आयुक्त :-**

त्या ठिकाणी जागा आहे.

**रोहिदास पाटील :-**

मी सांगतो जागा नाही आहे. जागा आहे म्हणून काय सांगता?

**दिपक खांबित :-**

साहेब तुम्ही जेव्हा पाहणी केली तेव्हा तिसरा मजला पूर्ण रिकामी होता. परंतु, तिकडे सॅनेटरी इन्स्पेक्टर हे एकटेच एका केबीनमध्ये बसायचे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्हांला याची नक्की माहिती आहे का? की, ते हळूहळू तुम्ही त्याच्यामध्ये घुसखोरी केली. एकतर पहिल्यांदा आरोग्य अधिकारी घुसवले, ते बसले. नंतर लोकांची सेवा म्हणून आम्ही सांगितले. लोकांच्या सोयीसाठी आम्ही पत्र दिले होते की, टॅक्सचे ऑफिस तुम्ही खाली चालू करा. ते वर्ग नव्हते. ते ग्राऊन्ड फ्लोअर होते, ते वर्ग नव्हते. त्याला वर्ग बनविणेसाठी, कार्यालय बनविण्यासाठी आम्ही विनंती केली. ते चांगले झाले आरोग्य केंद्र चालू केले. ते चांगले झाले पण प्रभाग कार्यालय म्हणून तुम्ही तीन वर्ग घेतल्यावर आता जागा नाही आहे.

**दिपक खांबित :-**

पण जेव्हा प्रभाग कार्यालयाकरीता पाहणी केली तेव्हा तिसरा मजला पुर्णपणे रिकामी होता. आणि शिक्षण विभागसुद्धा असे काही बोलले नाहीत.

**रोहिदास पाटील :-**

तुम्हाला रिकामी कसा दिसला ? तुम्ही शिक्षण अधिकाऱ्याकडून विचारणा केली का ? तुम्ही आता मला सांगा त्या ठिकाणी मराठीचे किती वर्ग भरतात ?

**दिपक खांबित :-**

सांगितले नाही की, हे वर्ग आवश्यक आहेत.

**रोहिदास पाटील :-**

बांधकाम अधिकाऱ्यांनी अशी माहिती द्यावी की तुम्हाला त्या शिक्षण अधिकाऱ्यांनी जी माहिती दिली आहे. तर तिथे मराठीच्या किती तुकडया भरतात ? एक अंगणवाडी, एक बालवाडी, एक मुख्यध्यापिका ऑफिस आणि मराठीच्या किती तुकडया ? यांचे उत्तर द्या. गुजराथीला किती तुकडया? त्याचे उत्तर द्या.

**ए. के. संन्याशिव :-**

त्या शाळेमध्ये पहिली ते सातविचे वर्ग भरतात आणि गुजराथी माध्यम पण आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही एकदम स्पष्ट माहिती द्या की, गुजराथी माध्यमासाठी इतके वर्ग लागतात आणि त्याची ही वेळ आहे.

**ए. के. संन्याशिव :-**

गुजराथी माध्यम सकाळी आहे. पाच वर्ग पहिली ते पाचवीचे लागतीत आणि दुपारी मराठी माध्यमाचे पहिली ते सातवीचे वर्ग आहेत.

**मदन उदितनारायण सिंग :-**

गुजराथी माध्यमाचे वर्ग पहिली ते सातवीपर्यंत त्यांना हवे आहेत. आणि मराठी माध्यम पहिली ते पाचवी आहेत. आम्ही एकच प्रभागातून आहोत.

**ए. के. संन्याशिव :-**

यावर्षी जर विद्यार्थी संख्या वाढली तर मी शिफारस करीन.

**रोहिदास पाटील :-**

विद्यार्थी संख्या वाढली नाही रेग्युलर आहे त्याबद्दल मी बोलतो आहे. वाढवायचा तुमचा प्रयत्नच नाही आहे. तुम्ही एकतरी उदाहरण सांगा की, एका शाळेत तुम्ही अशी वाढवून दाखविली तुमचा रिझल्ट वाढत नाही. तुमची सेवा वाढत नाही. तुमची हजेरी वाढत नाही. तुमची प्रत्यक्ष पाहणी नाही. तुम्ही आयुक्तांना चुकीचे रिपोर्टींग करता.

**मा. आयुक्त :-**

प्राध्यपकांनी आमच्या हे निदर्शनास आणायला पाहिजे होते.

**रोहिदास पाटील :-**

मी त्या प्रभागाचा नगरसेवक आहे. आणि त्या शिक्षण समितीचा मी अध्यक्ष आहे आणि सात नगरसेवकांनी जेव्हा तुम्हाला निवेदन दिले त्याच्यामध्ये आम्ही स्पष्ट लिहिलेले होते. ते निवेदन तुमच्यापर्यंत आणले नाही वैरागडे साहेबांनी दिलेले निवेदन तुम्हाला आणले नाही. ते स्थायी समितीमध्ये

ठेवले नाही. स्थायी समितीचे चेअरमन सांगतात सन्मा सदस्य रोहिदास पाटील आम्हाला हे निवेदन दाखविलेच नाही. तुम्ही वाद कशासाठी घालता ? कशासाठी दोन सदस्यांमध्ये भेदभाव करता ?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेबांनी जी सुचना मांडलेली आहे की, त्या ठिकाणी शाळेला रुम्स कमी पडतील मी शिक्षण अधिकारी यांना आणि आयुक्त साहेबांना अशी सुचना देतो की, यावर्षी ॲकॅडमी इयर व्हायला फार कमी दिवस राहिलेले आहेत. त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची गैरसोय होता कामा नये. आयुक्त साहेब आता मला या ठिकाणी सांगत होते. काही रुम्समध्ये सामान पडलेले आहे. शिक्षण आधिकाऱ्यांनाही सुचना देण्यात येत आहे की, त्यांनी तिकडे प्रत्यक्ष जाऊन भेट घेऊन मुख्याध्यापकांनी तुमच्याकडे पत्र पाठविले नसेल, कळविले नसेल तर तुमचे कर्तव्य आहे. ॲकॅडमिक इयर सुरू होणार आहे. सर्व व्यवस्था बरोबर आहे की नाही हे बघण्याचे तुमचे काम आहे. हे जर तुम्ही करित नसाल तर तुम्ही तुमचे कार्य पुर्णपणे पार पाडत नाही. असे दिसून येते कृपा करून आयुक्त साहेबांनी जातीने लक्ष घालून व्यवस्थीत व्यवस्था करावी अशी मी त्यांना सुचना देत आहे.

**रोहिदास पाटील :-**

आरोग्य अधिकाऱ्यांनी मला पत्र दिलेले आहे की, तिकडे आरोग्य अधिकारी त्या प्रभागाचे बसतात त्यांना हलविण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. त्याही गोष्टीला तीन महिने झाले.

**मा. महापौर :-**

आता मी आपल्या समक्ष आयुक्त साहेबांना सुचना दिली आहे की, याच्यावर योग्य कारवाई करावी.

**परशुराम पाटील :-**

शाळेचा हा जो विषय आहे तो आम्हाला मान्य आहे. आता जे काही सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेबांनी सांगितले जी खरी वस्तुस्थीती आहे. पण खारीगावातील जी शाळा आतापर्यंत पुर्ण झालेली आहे आणि जी खारीगावातील शाळा मंदिराकडे आहे. त्या शाळेमध्ये या येत्या पावसाळ्यामध्ये हानीकारक होण्याचा संभव आहे. तर ही शाळा तयार असताना तिथे त्या डाकु, चोरांना तिथे आपले साहित्य चोरण्यासाठी ठेवलेले आहे का? त्या शाळेचे उद्‌घाटन का करीत नाहीत. त्याची शाळा तिथे शिफ्ट का करत नाही ? प्रॉब्लेम काय आहे ?

**ए. के. संन्याशिव :-**

या शैक्षणिक सत्रापासून तिथे सुरू करता येईल.

**परशुराम पाटील :-**

कधी ? वेळ काय ? या वर्षात करणार का ?

**ए. के. संन्याशिव :-**

या वर्षातील शैक्षणिक वर्षात करणार जूनपासून.

**परशुराम पाटील :-**

नाहीतर मग सरकारी काम आणि वर्षभर थांब.

**ए. के. संन्याशिव :-**

शाळा सुरू झाल्यानंतर, त्यांना सुचना पण तशा दिलेल्या आहेत.

**परशुराम पाटील :-**

आमच्या खारीगांवातील शाळा लवकरात लवकर शिफ्ट करून घ्या आणि तेथील जे मैदान आहे ते लवकरात लवकर साफ करून घ्या.

**मोहन पाटील :-**

विरोधी पक्ष नेते यांनी जी सुचना या ठिकाणी मांडली ती अतिशय योग्य सुचना आहे. त्या शाळेच्या तारीख नक्की करून उद्‌घाटन समारंभ लावून लवकरात लवकर उद्‌घाटन करावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्या अधिकाऱ्यांना दोन वेळा सांगितले. पण अधिकारी सक्षम नाही आहे या अधिकाऱ्याना तुम्ही पाठवत का नाही? दोन तीन वेळा त्यांनी सभागृहाचा वेळ घेतला आहे.

**रतन पाटील :-**

विरोधी पक्षनेते परशुराम पाटील यांनी जी सुचना मांडली त्यांच्या मताशी मी सहमत आहे. कारण जी शाळा क्र. ६ खारीगाव ती माझा प्रभाग क्रमांक २२ मध्ये येते आणि जी नवीन शाळा तलाव रोड येथे तयार झालेली आहे. ती पूर्ण तयार झालेली आहे. पण महापालिका का टाळाटाळ करित आहे. हे समजत नाही चालू वर्षी ही शाळा त्या शाळेमध्ये स्थलांतरीत करावी अशी मी विनंती करतो.

**मिलन म्हात्रे :-**

मा. उपमहापौर साहेब प्रकरण क्र. ३ आपल्या शहरातील एकूण बालवाड्या किती? आणि आकडेवारीवरून जे मघापासून गणित बसत नाही आहे. असे आहे की, मागच्या वेळेला बालवाडीमध्ये पण गणवेश वाटप केले गेले होते. परंतु विद्यार्थ्यांची संख्या ही आपल्याकडे ठोस नसल्या कारणाने काही गणवेश काही ठिकाणी वाटले गेले. काही ठिकाणी विद्यार्थ्यांना मिळाले नाहीत. अशा काही विद्यार्थ्यांना गणवेश मिळाले नाहीत. त्यांना ते अपमानास्पद वाटले आहे. एके वर्षी मला चांगले आठवते माझ्या प्रभागात दोन बालवाडया आहेत. आपल्याला प्रशांसनीय अशी गोष्ट आहे की माझ्या वार्डमधील बालवांडयामध्ये जवळजवळ पावणे दोनशे ते दोनशे विद्यार्थी दररोज येतात. त्या सकस आहाराचा उपभोग घेतात, चांगला सकस आहार असेल तर आवडीने खातात, ही आपल्या महापालिकेची एक चांगली बाब म्हणजे प्रशंसनीय बाब आहे. परंतु मी एक बघितले आहे की, बऱ्याच वेळेला आम्ही पत्रव्यवहार करतो की, नुसता पौष्टीक आहार आपण त्यांना देतो हा आपला नित्याचा भाग आहे. परंतु या विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी चांगली खेळणी जे एज्युकेशनल चार्ट आहेत. दोन-अडीच वर्षे झाली मी प्रशासनाकडे मागणी करतो आता काहीतरी खोटे थातुरमातुर उत्तर मला मिळेल. पण प्रत्यक्ष असे आहे की, त्या बालवाडीमध्ये कोठलाही अधिकारी जात नाही. त्या बालवाडी टिचर बरोबर येतात की, नाही ते कोणीही बघत नाही. त्यांच्या हजेरीचा पट नाही अधिकाऱ्यांनी बालवाडीमध्ये गेले पाहिजे. स्थानिक ठिकाणी जे नगरसेवक आहेत त्यांच्या सह्या घेतल्या पाहिजेत बालवाडी व्यवस्थित चालू आहे की नाही आणि मागच्या हाऊसमध्ये आम्ही जेव्हा नगरसेवक होतो. त्यावेळेला हा विषय गंभीरपणे चर्चिला गेला.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे कृपा करून या विषयावरच बोला.

**मिलन म्हात्रे :-**

मी बालवाडीच्या विषयासंदर्भात बोलत आहे. बाकीच्या सर्व शाळेच्या विषयावर बोलले खिचडीवर बोलले खिचडीचा विषय बालवाडीला नाही आहे. तुम्ही ती चर्चा करायलाच नको. शाळेची चर्चा ह्याच्यावर तुम्ही केली. मी बालवाडीबद्दल बोलत आहे. मला बोलू द्या मी विषयाला धरून बोलत आहे. आम्ही स्वतः आमच्या खर्चाने चार्ट दिलेले आहेत. महापालिका सक्षम नाही आहे का? आम्ही मुंबईवरुन चार्ट आणले आहेत आणि ते लावले आहेत. आमच्या वार्डमध्ये जाऊन बघा आमची अशी इच्छा आहे की, सगळया वार्डमध्ये ते लागले पाहिजेत. एज्युकेशनल चार्ट घेण्याकरिता आपल्या प्रशासनाकडून काहिही कारवाई होत नाही. आपल्या इकडचे कुठलेही राष्ट्रीय संत पुरूष, नेते यांची चित्रे बालवाडयांमध्ये नाहीत. कुठल्याही पुढाऱ्याचे किंवा कोणाचेही चित्र नाही आहे. एज्येुशनल चार्ट एकही नाही. खेळणी नाहीत आणि या सर्व गोष्टी जर असतील तर त्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त वाढेल आणि आपल्या शाळेतील ज्या बालवाडया आहत. त्या चा स्तर पण चांगला वाढेल. मी मागच्या वेळेला म्हटले होते की, आपण ठेके पास करते. १० लाखावरून १५ लाखावर आलो. पण बालवाडीला जे सकस आहार पुरवितात. तो जो ठेकेदार आहे तो ५० ग्रॅमचे पाऊच बांधून देतो का? हे आपण बघितले आहे का? मागच्या वेळेला जे १०० ग्रॅमचे पाकिट होते ते ५० ग्रॅम द्यायचे आणि जी शिक्षिका आहे. तिच्याकडून चलनावर १०० ग्रॅमवर सही करायची साहेब हा प्रकार चालू होता. तुम्ही पण त्यावेळी सभागृहामध्ये होतात आणि त्यावेळेला आश्वासन मिळाले होते की, हा प्रकार बंद होईल. परंतु डिपार्टमेंटतर्फे कुठलीही चलने चेक केली जात नाहीत. आपले १५ लाख रूपये वसुल होत नाहीत. ते तेवढा माल पोचत नाहीत ही गंभीर बाब आहे. मागच्या वेळेला सभागृहात आम्हाला आश्वासन मिळाले पण त्याची पुर्तता झाली नाही. हा ठेका देताना त्या अटीशर्ती द्याव्यात त्यांचे जे मिलीग्रॅम वगैरे जे काही असेल त्याच्या वजनाचे पॅकिंगवर त्यांनी स्पष्टपणे लिहिले पाहिजे आणि त्याच्या डिलीव्हरी म्हणजे त्यांनी काय काय माल दिला? किती वाजता दिला आहे? ह्याच्यावर लक्ष ठेवले पाहिजे. ह्या माझ्या सर्व सुचनाबद्दल आयुक्त साहेब आपण जरा आम्हाला या सभेमध्ये आश्वासन द्यावे.

**प्रभात पाटील :-**

साहेब, या ठरावाला अनुमोदन झालेले आहे. महिला व बालकल्याण अंतर्गत हा विषय इथे ठेवण्यात आलेला आहे. आता संबंधीतांनी चर्चा केली. त्या काही बालवाडयांना जागा नाही आहे. बालवाडी कुठे भरणार? तर बालवाड्यांमध्ये खेळणी नाहीत किंवा चार्ट नाहीत किंवा इतर ज्या अडचणी सांगितल्या गेल्या. दोन वर्षे ही महानगरपालिका स्थापन होऊन झाली आणि प्रत्येक वर्षी महिला बालकल्याण अंतर्गत हा सकस आहाराचा विषय ठेवला की, आपले महिला बालकल्याण विषयी कर्तव्य संपले. अशी या सभागृहाची भावना झाली आहे की काय? ते मला कळत नाही. कारण पुढे एक विषय आहे. बालक आणि मातांच्या संगोपनासाठी तुम्ही तो विषय आणलेला आहे. हा विषय तुम्ही

बालकांसाठी ठेवलेला आहे. माझा एक अनुभव सांगते, संजय गांधी निराधार योजना आणि आपल्या शहरी रोजगार योजनामध्ये महिलांविषयी ज्या तरतुदी आहेत किंवा ज्या योजना आहेत त्या महिला लाभार्थी गेल्या तर त्यांना तलाठी आणि इतर संबंधीत अधिकारी यांच्याकडून आणि बँकाकडून जे काही प्रश्न उपस्थित होतात आणि त्यांना सेवा किंवा शर्तीचा काहीही लाभ होत नाही मागच्या वेळी मी या विषयावर तुमच्याशी बोलले होते की, या संदर्भात पण एक सभा लावा. या सर्व कारणाचा उहापोह केला तर एकच लक्षात येते की, केवळ सकस आहार ही एकच महिला बालकल्याण अंतर्गत न येणारी गोष्ट आहे. बऱ्याचशा महिला व बालकांचा प्रश्न आहे की, त्यासाठी ही समिती या ठिकाणी गठित झाली. पण तिचे कामकाज कधी सुरू होणार? जेव्हा या समितीचे कामकाज सुरू होईल तेव्हा त्या समितीला या प्रश्नाची उकल करण्याचे अधिकार प्राप्त होतील आणि तेव्हाच सर्वार्थाने महिला आणि बालकल्याण ह्या विभागामध्ये समर्थपणे काम केले जाईल. माझ्या म्हणण्याचा रोख आपल्या लक्षात आला असेल या शहरासाठी हा पुरेपुर फायदा घ्यायचा असेल तर समितीचे गठन लवकरात लवकर करून तिला कार्यान्वित करावी असे मी या ठिकाणी आपल्याला सुचित करीत आहे.

**जयंत पाटील :-**

बालवाडीचा विषय क्र. ३ चालू आहे. तर त्याला अनुसरून ज्या आपल्या मराठी शाळा आहेत. त्या सबंधी थोडेसे दोन मिनिटामध्ये बोलतो महापालिका झाल्यानंतर बऱ्याचशा ठिकाणी शाळा दहावी पर्यंत आहेत. आणि आपल्याकडे अजून सातवीपर्यंत आहेत. सातवी ते आठवी कधी होणार ? काही कल्पना नाही. आणि मराठी शाळेमध्ये शिकणारे जे आपले विद्यार्थी आहेत. म्हणजे कार्पोरेशनच्या शाळेमध्ये शिकणारे जे विद्यार्थी आहेत. आपण मान्य करतो की, ते गरीब आहेत. सातवीच्यानंतर माध्यमीक शाळेत जाताना प्रचंड प्रमाणामध्ये त्यांच्याकडून डोनेशन घेतले जाते. माझ्या माहितीप्रमाणे अभिनव विद्यालयामध्ये कमीतकमी रू. ४०००/- घेतले जाते. ते रू. ६०००/- म्हणतात. आज विद्यार्थी पुढे शिकूच शकत नाही. कारण डोनेशन भरण्याची त्यांच्याकडे ताकद नाही. तर ह्या ज्या आपल्या शाळा आहेत की, ज्यांच्याकडे आपला विद्यार्थी वर्ग होतो. माध्यमिक शाळेत जातो. त्या शाळांवर जर काय आमचे विद्यार्थी तुम्ही घेतले पाहिजेत. यांच्यामध्ये घेतले पाहिजेत. एवढेच तुम्हाला डोनेशन त्यांच्याकडून घेता येईल. अशा तऱ्हेची जर आपण त्या सबंधीत शाळांना जर सुचना केली तर शाळा आपल्याकडे आहेत. त्यांना आपण परवानगी देतो बऱ्याचशा खोट्या शाळा आपल्याकडे आहेत आपण मान्य करतो की, पंधरा शाळा माझ्या माहितीप्रमाणे आजच्या तारखेला कार्पोरेशनमध्ये अनधिकृत आहेत. आपण त्यांना काहीच करीत नाहीत फक्त आम्ही लिस्ट मागितली आम्हाला लिस्ट दिली शाळा चालू आहेत. त्या विद्यार्थ्यांचे काम भविष्य असेल आपल्याला काहीही कल्पना नाही. परंतु आपल्या विद्यार्थ्यांचे भविष्य चांगले व्हावे. या दृष्टीने एकतर आपण दहावीपर्यंत शाळा वाढवाव्यात ही माझी सुचना आहे किंवा आता जे विद्यार्थी आठवीमध्ये जातात त्यांना योग्य दराने त्या शाळेने डोनेशन घेतले पाहिजे अशा तऱ्हेने आपण एखादी योजना केली. त्यांच्यावर काहीतरी प्रेशर कुठल्याही तऱ्हेने केले तर हे गरीब विद्यार्थी पुढे दहावीपर्यंत शिकतील.

**आसिफ पटेल :-**

मी आयुक्तांकडे माझे पत्र दिलेले आहे. आपल्याकडे काशीगावामध्ये अंगणवाडी चालू आहे आणि ती काँग्रेस पक्षाच्याकार्यालयात चालू आहे आणि जेव्हा त्याची मिटींग असते. तेव्हा अंगणवाडीतील मुलांना बाहेर काढले जाते. मी आपल्याकडे निवेदन सादर केलेले आहे. अंगणवाडीसाठी मराठी शाळा पडिक झालेली आहे. तिची जर थोडीसी सुधारणा केली तर तिथे अंगणवाडी चालू शकते. हे मी निवेदन आपणांस वेळोवेळी केलेले आहे. त्या संदर्भात आपण जर खुलासा केला तर बरे होईल.

**मा. महापौर :-**

आपल्या सुचनेची नोंद झालेली आहे.

**आसिफ पटेल :-**

पीठासीन अधिकारी साहेब नोंद घेऊ नका उत्तर द्या

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

आपल्या ज्या काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात जी अंगणवाडी सुरू आहे. ती महानगरपालिकेकडून सुरू नसून शासनाच्या आय. सी.डी.एस्. कार्यक्रमाखाली सुरू आहे.

**आसिफ पटेल :-**

याच्यासाठी मी विनंती केली आहे. ती केंद्र शासनाच्या अधीन येते म्हणून मी आपल्याला विनंती केलेली आहे. त्याला रस्त्यावर सोडून द्यायचे का ? त्याच्यासाठी आपण सोय करू शकता.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

आय.सी.डी. एस्. चर्चा करून आपण निश्चित मार्ग काढू.

**आसिफ पटेल :-**

आपण चर्चा कधी करणार ?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

येत्या काही दिवसातच चर्चा करू.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपल्याकडे जे शिक्षण अधिकारी आहेत. आपल्या वर्तमानपत्रात नेहमी येते की, पंधरा ते वीस शाळा ह्या बेकायदेशीर शाळा चालू आहेत. त्याच्यावर आपण लक्ष केंद्रीत ठेवून ह्या शाळा कशा बंद करता येतील ? कारण त्यांच्याकडे गेल्यानंतर सहावी, सातवी, आठवीपर्यंत शाळा चालू आहेत. पण जेव्हा एखादा बालक दुसऱ्या शाळेत ॲडमिशन घेण्यासाठी सर्टिफिकेट मागण्यासाठी एखादा बालक तिथे गेला तर ते सर्टिफिकेट देत नाहीत आणि ते बेकायदेशीर आहे. म्हणून आपण त्यांच्यावर लक्ष केंद्रीत करून त्या शाळा कशा बंद करता येतील. याच्यावर आपण पाठपुरावा करावा.

**जयंत पाटील :-**

मी आता जे बोललो त्याच्यावर निर्णय दिलेला नाही. आपण काय करणार आहोत, हे सभागृहाला कळले पाहिजे. आपण दहावीपर्यंत शाळा करणार आहात की, त्या डोनेशनसंबधी काय बोलणार आहात का? हे सभागृहाला कळले पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी या ठिकाणी सुचना मांडलेली आहे की, सातवीच्या ऐवजी दहावीपर्यंत आपण शैक्षणिक सुविधा या ठिकाणी नागरीकांना निर्माण करून द्यावीत इयत्ता पहिली ते सातवी ही आपल्या महापालिकेवर कायदेशीर जबाबदारी आहे. मला वाटते आपण प्रथम कायदेशीर जबाबदारी पार पाडण्याच्या बाबतीमध्ये विचार करावा. ही अधिक चांगल्या रितीने ज्यावेळेला पार पडेल. आपण ज्यावेळी त्याच्यात समाधानी होऊ त्यावेळी आपण आठवी ते दहावी याच्याबद्दल विचार करावा असे मला व्यक्तिशः वाटते. ज्यावेळेला याची गुणवत्ता सुधारेल आणि आठवी ते दहावी खाजगी शिक्षण सुद्धा भरपूर उपलब्ध आहे. आपण म्हणता तर आपल्या भावनेशी मी सहमत आहे की, ॲडमिशनचे प्रश्न आहेत. इतर प्रश्न आहेत. गोरगरीब विद्यार्थ्यांना फी परवडत नाही. ह्या सगळया गोष्टी जरी असल्या आणि त्याच्यात ज्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील जे विद्यार्थी आहेत त्यांच्यासाठी देखील शासन प्रयत्न करत आहे आणि जेव्हा खाजगीमध्ये द्यायचे असते ते विद्यार्थी खाजगीमध्ये जातात. तर त्यांना खर्च किती येईल. तर हा विचार करणे कम्पलसरी भाग आहे. ह्याच्यामध्ये कुठल्याही प्रकारची जबाबदारी टाळता येणार नाही. तरी आपल्याला ह्याच्यावर विचारपुर्वक निर्णय घ्यावा लागेल. तसेच याच प्राथमिक शाळा उत्तम रितीने कशा चालविता येतील? याची तपासणी आपल्याला करावी लागेल. मी माझे वैयक्तिक मत सांगितलेले आहे. जर आपल्याला तसा विचार करायचा असेल तर आपण पुढच्या टप्प्यामध्ये तसा विचार करु शकतो. पण तो इतक्या लवकर करु नये असे मला वाटते कारण ही महापालिका अदयापही बाल्यावस्थेमध्ये आहे. आपल्याला अनेक सुविधा अजुनपर्यंत नागरिकांना पुरविता आलेल्या नाही आहेत. बेसीक सुविधा म्हणजेच पाणीपुरवठा, रस्ते, इतर जलबंधारे आहेत. आपले ते पुर्ण झालेले नाही आहेत. ज्यावेळी ह्या सुविधा होतील मला वाटते त्यावेळी आपण या हायस्कुल एज्युकेशनच्या बाबतीत विचार करावा.

**रोहिदास पाटील :-**

आयुक्त साहेबांना माहितीसाठी सांगतो आहे की, आपल्या नगरपरिषदेने आठवी ते दहावी चालू करण्याचा ठराव केलेला आहे.

**जयंत पाटील :-**

ते विद्यार्थी पुढे चालु शिकु नये अशी आपली इच्छा आहे का? तशी नाही तर मग ज्या शाळा डोनेशन घेतात.

**मा. आयुक्त :-**

मी एवढेच सांगितले की, आपली कायदेशीर जबाबदारी ही पहिली ते सातवीपर्यंतची आहे आणि पहिली ते सातवीपर्यंत आपण सक्षम रितीने आपल्या शाळा चालवु शकतो का? ह्याचा आपण प्रथम विचार केला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

ठिक आहे. मला मंजुर आहे. आर्थिकदृष्ट्या कदाचित ते परवडणार नसेल. आपल्या शहरामध्ये ज्या हायस्कुल आहेत आणि त्या डोनेशन घेतात.

**मा. आयुक्त :-**

माझी दुसरी सुचना आहे की, खाजगी शाळांमध्ये जे गरजू विद्यार्थी आपल्याकडे येतात आणि त्यांच्या ॲडमिशनचा जो प्रश्न आहे. त्या संदर्भात त्यांना सुचना देतील का? याबाबत मी लिगल पोझीशन जी आहे ती तपासुन जर तसे शक्य असेल तर आपल्याला तसे कळविण्यांत येईल.

**मा. महापौर :-**

शक्य नसेल तरी आयुक्त साहेब, माझी आपल्याला सुचना राहिल की, त्यांना विनंती करावी की अशा केसेस कन्सिडर कराव्यात.

**प्रकरण क्र. ३ :-**

महानगरपालिका बालवाडीतील विद्यार्थ्यांना सन २००४/२००५ या सालाकरिता ''सकस आहार'' पुरवठा करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ५ :-**

महानगरपालिकेच्या एकूण २५ बालवाड्या सुरु आहेत. सदर बालवाड्यांमध्ये १७०० मुले मुली शिक्षण घेत आहे. सदरची मुले मुली झोपडपट्टी व आर्थिक दृष्ट्या कमकुवत वर्गातील आहेत. त्यामुळे बालवाडीमधील मुलामुलींना सकस आहार देणे गरजेचे आहे.

बालवाड्यामधील मुलांना आठवड्यचे सहा दिवस (रजा वगळता) मोड आलेली कडधान्ये उसळी, (मसाल्यामध्ये तयार केलेली) शेंगदाणे व गुळ, फुटाणे, अंडी (उकडलेली) बिस्कीट (नाचणीयुक्त व सोयायुक्त) केळी, इत्यादी प्रकारचा आहार द्यावयाचा आहे. यासाठी सन २००४ ते २०५ पर्यंत सकस आहार बाबत निविदा मागविण्यांत याव्या व येणाऱ्या रु. १५,००,०००/- अंदाजित खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४ चे वाचन केले.)

**दिनेश नलावडे :-**

सन्मा. महापौर साहेब, विषय क्र. ४ मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र. ७१ शाळा विस्तार या महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ प्रमाणे शासनाने निर्देशित केलेल्या फेरबदलाबाबत मा. आयुक्त या संदर्भात दिलेल्या टिपणीचे वाचन करण्यांत आले. मिरा भाईंदर शहर हे ग्रामपंचायत काळापासुन झपाट्याने वाढत आहे. दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत असल्याने हिन्दी व स्थायिक गुजराथी विद्यार्थ्यांसाठी निकड लक्षात घेऊन सन १९८३ साली श्री भाईंदर केळवणी मंडळाने जे.एच.पोद्दार हायस्कुल ही शाळा सुरु केली आहे. वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात शिक्षणाची निकड, गरज विचारात घेऊन ह्या शाळेत इंग्रजी माध्यम व वरील माध्यमाचे पुर्व प्राथमिक व माध्यमिक वर्ग सुरु करण्यात आले. सध्या या शाळेत इंग्रजी, गुजराथी, हिन्दी माध्यमाचे एकुण तीन ते चार हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मिरा भाईंदर शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात शिक्षणाची गरजदेखील वाढत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील वाढत्या लोकसंख्येचा विचार करता मिरा भाईंदर शहराचा प्रथमतः तयार करण्यांत आलेला विकास आराखडा राज्यशासनाने निर्णय क्र. टी.पी.एस. दिनांक १४/०५/१९९७ अन्वये मंजुर केलेला असुन दि. १५/०७/१९९७ पासुन अंमलात आलेला आहे. त्यावेळी मंजुरीतुन वगळलेल्या विकास योजनेतील भागाला शासनाने दिनांक २५/८/२००० रोजी मंजुरी दिलेली असुन या वगळलेल्या भागाची योजना दिनांक १५/१०/२००० पासुन अंमलात आलेली आहे. अशा रितीने मंजुर केलेल्या व सध्या अंमलात असलेल्या विकास योजनेमध्ये आरक्षण क्र.७१ माध्यमिक शाळेच्या विस्तारासाठी नियोजित केलेले असुन नगर भुमापन क्र. १३६९ ते १४२८ मध्ये या आरक्षणाखालील जागा सध्या मोकळी आहे. या जागेलगत जे.एच.पोद्दार हायस्कुल, अस्तित्वात असुन शहरातील सुमारे चार हजार

मध्यमवर्गीय विद्यार्थी, विद्यार्थिनी शिक्षणाचा लाभ घेत आहेत. भाईंदर (पश्चिम) भागात विशेषतः हिन्दी व गुजराथी माध्यमाच्या अन्य शाळा नसल्याने या हायस्कुलमध्ये विद्यार्थी प्रवेशाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे दोन सत्रांत शाळा चालवावी लागत असुन तिच्या विस्तारासाठी तातडीने जागेची आवश्यकता निर्माण झालेली आहे. विकास योजनेमधील आरक्षण क्र. ७१ खाली जागा आमच्या माध्यमिक शाळेच्या विस्तारासाठी म्हणजेच पोद्दार हायस्कुलच्या विस्तारासाठी नियोजित केलेली असल्यामुळे महानगरपालिकेने दिनांक १९/०४/२००३ च्या महासभेत ठराव क्र. ८ मंजुर करुन वरील आरक्षणाखालील जागेचे भुसंपादन अधिनियम १८९४ प्रमाणे कलम १७ चा वापर करुन तातडीने भुसंपादनविषयी कारवाईसाठी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे प्रस्ताव दिनांक ०९/०६/२००३ रोजी सादर करण्यांत आलेला आहे. तसेच आरक्षण क्र. ७१ ची अंमलबजावणी भुसंपादनाच्या माध्यमातुन महानगरपालिकेने सुरु केली आहे. असे असतानाही भुसंपादन विशेष अधिकारी (विशेष घटक), ठाणे यांनी सुरु केल्यानंतर राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने आदेश क्र. टी.पी.एस./१२०३/६५४/ प्र.क्र.१६७/०३/नवि१२, दिनांक २२/३/०४ अन्वये आरक्षण क्र. ७१ मधील ०.६६ हेक्टर क्षेत्र त्यामधुन वगळुन रहिवासी विभागात समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ (१) अन्वये वरील मंजुर विकास योजनेत किरकोळ बदल करण्याचे निर्देश दिले आहेत. आरक्षणाखालील नगर भुमापन क्र. १३६९ व १४२८ ही जागा शेजारील संतोक चित्रपटागृहाच्या मालकीची असुन या चित्रपटगृहापासुन ६१ मीटर अंतराच्या आत शाळेसाठी आरक्षण ठेवणे अयोग्य असण्याची सबब देऊन शासनाने हा निर्णय घेतलेला आहे. वरील संदर्भिय आदेश शासनाने महानगरपलिकेला दिला आहे. हा काढण्यात आलेला आदेश शैक्षणिक कार्यावर, स्थानिक स्वराज्य संस्थेवर घाला घालणारा आहे. शिक्षणापासुन कोणीही वंचित राहु नये. याकरीता एकीकडे शासन करोडो रुपये खर्च करुन 'सर्व शिक्षा अभियान' सारखे प्रकल्प राबवुन प्राथमिक गरज म्हणुन प्राथमिक शिक्षण मोफत करुन सर्वांना शिक्षणाचे महत्त्व पटवित आहे, तर दुसरीकडे खाजगी व्यक्तीचे हित पाहत आहे. त्या आदेशात नमुद केलेली तत्वशुद्ध कारणे ही एका व्यक्तीच्या हितासाठी दाखविण्यांत आलेली आहे. वास्तविक पाहता विकास आराखडा तयार करताना शहराचा ''विद्यमान वापर नकाशा'' म्हणजेच लॅन्ड युज मॅप तयार केला होता. या नकाशाच्या आधारे विकास आराखड्यात आरक्षणे दाखविण्यात आली आहेत. विद्यमान वापर नकाशामध्ये सध्या असलेली सिनेमागृहे व त्या लगत असलेले 'जे.एच.पोद्दार हायस्कुल' ही शाळा दाखविण्यांत आली आहे. म्हणजेच सिनेमागृहे असतानाच शाळेसाठी आरक्षण दाखविण्यात आलेली आहेत. जी आरक्षणे दाखविण्यांत आलेली आहेत ती विकास आराखडा विशेष नियम/तत्वे यांचा आधार शहराची गरज विचारात घेऊनच विकास आराखडा तयार केला आहे. या गोष्टींचा विकास आराखडा तयार करणारे तज्ञ, मंजुरी देणारे प्राधिकारी यांनी वरील गोष्टीचा साकल्याने विचार करुनच दिनांक १५/१०/२००० रोजी शासनाने या आरक्षणाला अंतिम मंजुरी दिली होती. ज्या संतोक चित्रपटागृहामुळे या आरक्षणातील ०.६६ हेक्टर जागा वगळल्याचे आदेश शासनाने दिले आहेत. ते संतोक चित्रपटगृह आता पूर्णपणे पाडण्यात आलेले असुन त्या जागेवर रहिवासी वापराच्या बहुमजली इमारती उभ्या आहेत. या आरक्षणातील काही जागा रद्द करुन रहिवासी वापरासाठी मुक्त करणे नियोजनाच्या दृष्टीनेही योग्य ठरणार नाही. वाढत्या लोकसंख्येचा या शहरासाठी ठिकठिकाणी जास्तीत जास्त शाळागृहे, कॉलेज बांधणे आवश्यक आहे असे असता 'शाळागृह विस्तार आरक्षण' रद्द करुन त्या ठिकाणी खाजगी व्यक्तीच्या हितासाठी 'रहिवास क्षेत्र' करण्याची शासनाची कार्यवाही शैक्षणिक कार्यात मारक आहे. तसेच, आरक्षण क्र. ७१ मधील जागा क्षेत्र ६६०० चौ.मी. पैकी ११५१.३६ चौ.मी. इतकी नागरी जमीन कमाल मर्यादा व अधिनियम १९७६ च्या कलम १० पोटकलम (३) प्रमाणे दिनांक १२/२/०४ च्या राजपत्रात अतिरिक्त म्हणुन जाहिर झाली आहे. ती सर्व जमीन महाराष्ट्र शासनाकडे दिनांक ८/१/०४ पासुन संपादित झाली आहे. म्हणजे ही जमीन राज्यशासनाकडे वर्ग झाली असता तिच पुन्हा मुळ मालकाच्या अर्जाप्रमाणे परत करण्याची कृती चालु आहे. हे देखील लोकहिता विरुद्ध आहे. जे.एच.पोद्दार हायस्कुल ही शैक्षणिक संस्था शहरातील गुजराथी, हिन्दी, इंग्रजी माध्यमाची प्राथमिक/माध्यमिक शिक्षणाची गरज भागवित आहे. शहराची वाढती वस्ती आणि वाढत्या वस्तीच्या मानाने विद्यार्थ्यांचे वाढीव प्रमाण, वाढत्या विद्यार्थी संख्येला सामावुन घेण्यासाठी जे.एच.पोद्दार हायस्कुल या शाळेसारख्या आवश्यक असलेल्या जागेची गरज विचारात घेऊन महानगरपालिकेने यापुर्वी आरक्षणाखाली (क्र. ७१) जागा भुसंपादनासाठी कार्यवाही सुरु केली आहे. शाळा विस्तारासाठी (आरक्षण क्र. ७१) जागेची अत्यंत आवश्यकता असल्याने आरक्षण क्र. ७१ तसे ठेवणे शहराच्या हिताचे आहे. आरक्षण हटविल्यास त्या जागी रहिवास क्षेत्र केल्यास शाळा विस्तारासाठी जागा उपलब्ध होऊ शकणार नाही. तरी आरक्षण क्र. ७१ हे तसेच ठेवण्यांत यावे. या ठिकाणी शहराचे

हित विचारात घेता रहिवास क्षेत्रात बदल करण्यात येऊ नये. अशी सध्या महाराष्ट्र शासन विनंती करीत आहे. तरी हा ठराव मी सभागृहामध्ये मंजुरीसाठी मांडत आहे.

**मिलन पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

महापौर महोदय, हा विषय प्रकरण क्र. ४ एक भाईंदर पश्चिमेची एक शैक्षणिक संस्था त्या ठिकाणी त्या शैक्षणिक संस्थेचा विस्तार किंवा भाईंदर पश्चिमेकडील किंवा मिरा भाईंदरच्या सर्व विद्यार्थ्यांकरीता भविष्यातील शिक्षणाची तरतुद आणि सोय करु इच्छिते आणि महापालिकेच्या सभागृहामध्ये सदर आरक्षण बदलुन त्या जमिनीच्या मालकाच्या निवेदनावर विचार करुन हा विषय आपल्याकडे आलेला आहे. अत्यंत वाईट असे वाटते की, त्या शैक्षणिक संस्थेला आपण मदत करायची सोडुन हा विषय आणि हे आरक्षण आहे. तो बदलण्याचा प्रस्ताव इकडे आलेला आहे. हे आरक्षण यापुर्वी बदलले गेले. मला आठवत नाही की, सभागृहामध्ये त्याची मंजुरी यापुर्वी घेतली गेली होती. कारण हे जे सिनेमा थिएटरकडे आर झोन झाले आणि त्या ठिकाणी दोन बिल्डिंग बनल्या. ह्याच्यातील काही भाग माझ्या प्रभागामध्ये येतो. परंतु, ते आरक्षण बदलत असताना आमची कुठलीही परमिशन घेतली गेली नाही. पण शाळेसारख्या किंवा भविष्यात होणाऱ्या कॉलेजसारख्या चांगल्या कामाला आपल्या सभागृहामध्ये विचारविनिमय आणि मंजुरी करण्याकरीता हा ठराव येत आहे. अधिकाऱ्यांची स्तुती करावीशी वाटते. ते फार चाणाक्ष अधिकारी आहेत. असाच विचार जर त्यावेळी जर केला असता तर बरे झाले असते. पण त्यावेळेला कळले पण नाही की, सिनेमा थिएटरचा आर झोन झाला कधी? आणि तिकडे बिल्डिंग बनल्या कधी? आणि त्यांचे ते प्लॅन महापालिकेने कुठल्या ताकदीवर पास केले. पण वास्तव असे आहे की, आजच्या तारखेला तिकडे टॉवर्स बनलेले आहे. त्याला असेसमेंट झाले त्याला नळाची कनेक्शन लागली. त्याला रितसर इलेक्ट्रीकचे परमिशन लागले. त्याला मीटर लागले. केबल लागली. या सगळ्या सुविधा पटापट दिल्या गेल्या आणि या दोन बिल्डिंग इकडे तयार होऊन परिपुर्ण झालेल्या आहेत. या ठिकाणी या शाळेची अनेक वर्षापासुनची मागणी आहे. मागच्या हाऊसमध्ये हा विषय आला होता. त्या वेळेलासुद्धा आम्ही या ठिकाणी जे.एच.पोद्दार हायस्कुलचे एक्स्टेन्शन त्या इमारतीचे एक्स्टेन्शन किंवा भविष्यात भाईंदर पश्चिमेला होणारे कॉलेज हे त्या ठिकाणी असावे. आपल्याला खास करुन या विषयामधील त्यांनी शब्द मांडलेले आहेत. हे जाणुनबुजुन काही ठिकाणी कमी मांडले आहेत. त्याचा उल्लेख या विषयपत्रिकेमध्ये व्हावा. अशी आपल्याला नम्र विनंती. एज्युकेशन ऑफ हायस्कुल एवढेच रिझर्वेशन या ह्याच्यामध्ये दाखविलेले आहे. वास्तविक पाहता आपल्या डेव्हलपमेन्ट प्लॅनमध्ये एज्युकेशनल प्रायमरी स्कुल पी.एच.हायस्कुल एच.एस. आणि कॉलेज सी., इन्डस्ट्रियल टेक्निकल इन्स्टिट्युट आय.टी.आय. हा उल्लेख या रिझर्वेशनमधील आहे. जाणुनबुजुन त्याचेतील रिझर्वेशन डेप्रिसिएट करायचे. त्याचे प्रमाण कमी दाखवायचे आणि मग ह्याच्याकडुन हा विषय हळुहळु पुढे आणायचा हा प्रकार चालला आहे. जर तुम्ही एक इकडे उल्लेख केला तर बाकीच्या तीन लाईनचा उल्लेख करुन घ्यावा. कारण भविष्यामध्ये भाईंदर पश्चिमेला मोठे कॉलेज होणार आहे. आपली नवीन पिढी तिकडे जाणार आहे. भाईंदर पश्चिमेचे चांगले असे मोठे कॉलेज होईल. असे आम्हाला वाटते. आणि या समर्थनार्थच मी या ठरावाच्या बाजुने मी या ठिकाणी समर्थनार्थ बोलायला या सभेत उभा आहे. ठरावाला माझेसुद्धा अनुमोदन आहे. मी त्या ठिकाणचा स्थानिक नगरसेवक आहे. परंतु, जी काही शैक्षणिक संस्था आहे. माझ्या वॉर्डमधील बरेचसे गरीब विद्यार्थी त्या शाळेमध्ये जातात. त्यांना चांगले शिक्षण मिळते. आपल्या या शहरामध्ये अनेक अनधिकृत शाळा दारुच्या गुत्त्यासारख्या गल्लीगल्लीमध्ये दररोज वाढत आहेत. पण चांगल्या शाळेला जर आपण प्राधान्य दिले. तर ओघाने चुकीच्या आणि गैरमार्गाने चालणाऱ्या खोट्या शाळा ज्या डोनेशन काढतात. पालकांना त्रास देतात. शिक्षणाच्या चांगल्या चांगल्या जाहिराती करुन त्यांना फसवित आहेत. अशा ग्राहकांची अशा करदात्या नागरिकांची फसवणुक होणार नाही. पोद्दार हायस्कुल या संस्थेचा केळवणी मंडळ या संस्थेचा चांगला विकास व्हावा, या शहराचा विकास व्हावा. याकरीता हा ठराव कुठलेही आढेवेढे न घेता जे आहे. तसे आहे. जे तुम्ही डेव्हलपमेन्ट प्लॅनमध्ये दाखविलेले रिझर्वेशन आहे. ते तसेच ठेवण्याच्या आपल्या ठरावाला मी अनुमोदन देतो. त्या ठिकाणी कुठलेही दुसऱ्या आरक्षणाला आमचा सक्त विरोध राहिल. याची नोंद घ्यावी. धन्यवाद.

**प्रकरण क्र. ४ :-**

मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेतील आ.क्र. ७१ शाळा विस्तार या आरक्षणात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ प्रमाणे शासनाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे फेरबदला बाबत.

**ठराव क्र. ६ :-**

मिरा भाईंदर शहर हे ग्राम पंचायत काळापासून वेगाने, झपाट्याने वाढत आहे. दिवसें दिवस लोकसंख्या वाढत असल्याने हिंदी व गुजराती विद्यार्थ्यांसाठी निकड लक्षात घेवून सन १९८३ साली श्री भाईंदर केळवणी मंडळाने 'जे.एच्.पोद्दार हायस्कूल' ही शाळा सुरु केली आहे. वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात शिक्षणाची निकड / गरज विचारात घेवून ह्याच शाळेत इंग्रजी माध्यम व वरील माध्यमाचे पूर्वप्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक वर्ग सुरु करण्यात आले. सध्या ह्या शाळैत इंग्रजी, हिंदी, गुजराती माध्यमाचे एकूण तीन ते चार हजार विद्याथी शिक्षण घेत आहेत. मिरा भाईंदर शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात शिक्षणाची गरज देखील वाढत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील वाढत्या लोकसंख्येचा विचार करता मिरा भाईंदर शहराचा प्रथमतः तयार करण्यात आलेल्या विकास आराखडा राज्यशासनाने निर्णय क्र. टी.पी.एस. दि. १४/०५/९७ अन्वये मंजुर केलेला असून दि. १५/०७/१९९७ पासून अंमलात आलेला आहे. त्यावेळी मंजुरीतून वगळलेल्या विकास योजनेतील भागाला शासनाने दि. २५/०८/२००० रोजी मंजुरी दिलेली असून या वगळलेल्या भागाची योजना दि. १५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. अशा रितीने मंजुर केलेल्या व सध्या अंमलात असलेल्या विकास योजनेमध्ये आरक्षण क्र. ७१, माध्यमिक शाळेच्या विस्तारासाठी नियोजीत केलेले असून नगर भूमापन क्र. १३६९ व १४२८ मध्ये या आरक्षणा खालील जागा सध्या मोकळी आहे. या जागे लगत 'जे. एच. पोद्दार हायस्कूल' अस्तित्वात असून शहरातील सूमारे चार हजार विद्यार्थी / विद्यार्थीनी शिक्षणाचा लाभ घेत आहेत.

भाईंदर पश्चिम भागात विशेषतः हिंदी व गुजराती माध्यमाच्या अन्य शाळा नसल्याने या हायस्कूलमध्ये विद्यार्थी प्रवेशाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे दोन सत्रात शाळा चालवावी लागत असून तिच्या विस्तारासाठी तातडीने जागेची आवश्यकता निर्माण झालेली आहे. विकास योजने मधील आरक्षण क्र. ७१ खालील जागा आमच्या माध्यमिक शाळेच्या विस्तारासाठी म्हणजेच पोद्दार हायस्कूल विस्तारासाठी नियोजीत केलेली असल्यामुळे महानगरपालिकेने दि. १९/०४/२००३ च्या महासभेत ठराव क्र. ८ मंजुर करुन वरील आरक्षण खालील जागेचे भूसंपादन, भूसंपादन अधिनियम १८९४ प्रमाणे कलम १७ चा वापर करुन तातडीने भूसंपादन विषय कार्यवाहीसाठी मा. जिल्हा अधिकारी, ठाणे यांचेकडे दि. ०९/०६/२००३ रोजी प्रस्ताव सादर करणेंत आलेला आहे.

या आरक्षण क्र. ७१ ची अंमलबजावणी भूमीसंपादनाचे माध्यमातून महानगरपालिकेने सुरु केली आहे. असे असतानाही भूसंपादन विशेष अधिकारी (विशेष घटक), ठाणे यांनी सुरु केल्यानंतर राज्य शासनाचे नगर विकास विभागाने आदेश क्र. ⠞⠏⠎ १२०३/६५४/प्रक्र.१६७/०३/नावि.-१२, दि. २२/०३/०४ अन्वये आरक्षण क्र. ७१ मधील ०.६६ हेक्टर क्षेत्र त्यामधुन वगळून रहिवाशी विभागात समाविष्ठ करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या अलम ३७(१) अन्वये वरील मंजुर विकास योजनेत किरकोळ बदल करण्याची निर्देश दिले आहेत. आरक्षणा खालील नगर भूमापन क्र. १३६९ व १४२८ ही जागा शेजारील संतोक चित्रपट गृहाच्या मालकीची असून या चित्रपट गृहापासून ६१ मी. अंतराचे आत शाळेसाठी आरक्षण ठेवणे अयोग्य असल्याची सबब देऊन शासनाने हा निर्णय घेतलेला आहे.

वरील संदर्भिय आदेश शासनाने महापालिकेला दिला आहे. हा काढण्यात आलेला आदेश हा शैक्षणिक कार्यावर / स्थानिक स्वराज्य संस्थेवर घाला घालणारा आहे. शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये याकरीता एकीकडे शासन करोडो रुपये खर्च करून 'सर्व शिक्षा अभियान' सारखे प्रकल्प राबवून प्राथमिक गरज म्हणून प्राथमिक शिक्षण मोफत करुन सर्वांना शिक्षणाचे महत्व पटवीत आहे, तर दुसरीकडे खाजगी व्यक्तिंचे हित पाहत आहे. ह्या आदेशात नमुद केलेली (तत्वशून्य) कारणे ही एका व्यक्तिच्या हितासाठी दाखविण्यात आली आहेत. वास्तविकतः विकास आराखडा तयार करतांना शहराचा ''विद्यमान वापर नकाशा'' (⠇⠁⠝⠙ ⠥⠎⠑ ⠍⠁⠏) तयार केला होता. ह्या नकाशाच्या आधारेच विकास आराखड्यांत आरक्षणे दाखविण्यात आली आहेत. विद्यमान वापर नकाशामध्ये सध्या असलेली सिनेमागृहे व त्या लगत असलेली 'जे. एच्. पोद्दार हायस्कूल' ही शाळा दाखविण्यात आली आहे. म्हणजेच सिनेमागृहे असतांनाच शाळेसाठी आरक्षण दाखविण्यात आले आहे. जी आरक्षणे दाखविण्यात आली आहेत ती विकास आराखडा विषयक नियम / तत्वे यांचा आधार शहराची गरज

विचारात घेवूनच विकास आराखडा तयार केला आहे. ह्या गोष्टींचा विकास आराखडा तयार करणारे तज्ञ, मंजुरी देणारे प्राधिकारी ह्यांनी वरील गोष्टींचा साकल्याने विचार करुनच दि. १५//१०/२००० रोजी शासनाने या आरक्षणाला अंतिम मंजुरी दिली होती.

ज्या संतोक चित्रपट गृहामुळे या आरक्षणातील ०.६६ हेक्टर जागा वगळल्याचे आदेश शासनाने दिलेले आहेत. ते संतोक चित्रपट गृह आता पूर्णपणे पाडण्यात आलेले असून त्या जागेवर रहिवासी वापराच्या बहुमजली इमारती उभ्या राहिलेल्या आहेत. या आरक्षणातील काही जागा रद्द करुन ती रहिवासी वापरासाठी मुक्त करणे नियोजनाच्या दृष्टीनेही योग्य ठरणार नाही.

वाढत्या लोकसंख्येच्या ह्या शहरासाठी ठिक ठिकाणी जास्तीत जास्त शाळागृहे, कॉलेज बांधणे आवश्यक आहे असे असता ''शाळागृह विस्तार आरक्षण'' रद्द करुन त्या ठिकाणी खाजगी व्यक्तिंच्या हितासाठी ''रहिवासी क्षेत्र'' करण्याची शासनाची कार्यवाही शैक्षणिक कार्यास मारक आहे.

तसेच आरक्षण क्र. ७१ मधील जागा क्षेत्र ६६०० चौ. मिटर पैकी ११५१.३६ चौ. मिटर इतकी जमिन नागरी जमिन कमाल मर्यादा व अधिनियम १९७६ च्या कलम १० पोटकलम (३) प्रमाणे दि. १२/०२/०४ चे राजपत्रांत अतिरीक्त म्हणून जाहीर झाली आहे. ती सर्व जमिन महाराष्ट्र शासनाकडे दि. ०८/०१/०४ पासून संपादीत झाली आहे. म्हणजे ही जमिन राज्य शासनाकडे वर्ग झाली असता तीच पून्हा मूळ मालकाच्या अर्जाप्रमाणे परत करण्याची कृती चालू आहे. हे देखील लोकहिता विरुद्ध आहे.

जे. एच्. पोद्दार हायस्कूल ही शैक्षणिक संस्था शहरातील गुजराती, हिंदी, इंग्रजी माध्यमाची प्राथमिक / माध्यमिक शिक्षणाची गरज भागवित आहे. शहराची वाढती वस्ती, वाढत्या वस्तीच्या मानाने विद्यार्थी वर्गाचे वाढीव प्रमाणे, वाढत्या विद्यार्थी संस्थेला समावून घेण्यासाठी (क्र. ७१) जागा भूसंपादनाची कार्यवाही सुरु केली आहे. शाळा विस्तारासाठी (आरक्षण क्र. ७१) जागेची अत्यंत आवश्यकता असल्याने आरक्षण क्र. ७१ तसेच ठेवणे शहराच्या हिताचे आहे. आरक्षण हटविल्यास त्या ठिकाणी रहिवास क्षेत्र केल्यास शाळा विस्तारासाठी जागा उपलब्ध होऊ शकणार नाही. तरी आरक्षण क्र. ७१ हे तसेच ठेवण्यात यावे. त्याचप्रमाणे शेजारील सिनेमा थिएटर पासून बांधण्यात येणाऱ्या शाळा/कॉलेजसाठी सोडावयाचे अंतरात शासनाने आपल्या स्तरावर शिथीलता द्यावी असा ठराव करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश नलावडे.** **अनुमोदन :- श्री. मिलन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिव प्रकरण क्र. ५ चे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर आपल्या या शहरामध्ये विविध विकास कामे सर्व सन्मा. सदस्यांनी प्रशासनाकडुन कामे करुन आज या शहराचा नावलौकिक विकास कामामध्ये वेगळ्या पद्धतीने ठसा या ठिकाणी उमटवला आहे. प्रत्येक सदस्याने आपापल्या पद्धतीने या शहरामध्ये विकास व्हावा या दृष्टीकोनातुन आपले प्रस्ताव आपल्या पक्षाच्या मार्फत आपल्या गटाच्या मार्फत या ठिकाणी ठेवलेले आहेत. आज या ठिकाणी प्रकरण क्र. ५ विविध विकास कामांना प्रशासकीय आर्थिक मंजुरी देण्याबाबत विषय आलेला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत करावयाच्या विविध विकास कामाकरीता सन २००५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यांत आलेली आहे. सदर अर्थसंकल्पात उपलब्ध तरतुदीमधुन खालील कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. क्र. १ भाईंदर (पश्चिम) पोलिस स्टेशन ते जनार्दन रकवी मार्ग व क्रॉस रोडपर्यंतचा रस्ता दोन्ही बाजुने गटार बांधुन फुटपाथ तयार करणे. भाईंदर (पश्चिम) विनायकनगर ते राणी लक्ष्मीबाई उद्यानापर्यंत मुख्य नाल्यावर स्लॅप घालुन रस्ता तयार करणे. भाईंदर (पूर्व) महाराष्ट्र मित्रमंडळ ते नवघर खाडीपर्यंत नाला दुरुस्ती करणे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब, ठराव दिलेला आहे. काही सुचना मांडायच्या असतील तर बोला.

**मोहन पाटील :-**

मी सुचनेसह मांडत आहे. वरील कामांना प्रशासकीय आर्थिक मंजुरी देण्यांत येत आहे. सदर कामी होणारा खर्च सन २००४ व ०५ व उर्वरित खर्च २००५-०६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतुद करुन करण्यांत यावा. वरीलपैकी रस्ते, सभागृहातील सन्मा. सदस्यांनी सुचविलेले व सुचविणारे आहेत. प्रभागातील अत्यावश्यक प्रस्तावित विकास कामे समाविष्ट करुन त्यांची सविस्तर टिपणी मा. स्थायी समितीसमोर आणुन त्यांचे प्रायोरिटी बेस ठरवावा. डि.पी. रस्त्यावरच्या जागा बघुन वाटाघाटी करुन किंवा केवळ भुसंपादनाने ताब्यात घेण्यात येऊन कामे करण्यांत यावी. तसेच डी.पी. रस्त्याकरीता शासकीय, निम शासकीय व इतर वित्तीय संस्थाकडुन कर्ज उपलब्ध करुन ही सभा मंजुरी देत आहे. ज्या कोणाच्या या सभेमध्ये सुचना असतील त्यांनी आपल्या सुचना मांडाव्या. जो कामे करुन जाईल त्यामध्ये माझी अशी एक सुचना आहे. भाईंदर (पूर्व) महाराष्ट्र मित्र मंडळ ते नवघर खाडीपर्यंत नाला दुरुस्ती करण्याचा एक भाग आपण केलेला आहे. तो जवळजवळ पन्नास लाखाचा आहे. परंतु, भाईंदर (पुर्व) केबीन रोड सोनल अपार्टमेन्ट ते स्वाती अपार्टमेन्ट पर्यंत नाल्याबाबत २४ लाखाचे स्लॅप टाकायचा आहे. मी प्रशासनाला असे सुचवित आहे की, गोडदेव नाका ते एम.आय. उद्योग नगर ते रावलनगर पर्यंतचा नाला दुरुस्ती करायचा अंदाजे जो खर्च येईल. तो खर्च या ठिकाणी समाविष्ट करावा. नंतर त्याच्यावर स्लॅप टाकण्यांत यावा असे मी या ठिकाणी सुचवित आहे.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी मांडलेल्या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**परशुराम पाटील :-**

साहेब, अनुमोदन होण्याअगोदर या टिपणीमध्ये जी आपण दिलेली कामे आहेत. त्याला माझी काही अडचण नाही. मी विरोधदेखील करणार नाही. मी सुचना देतो की, ज्या ठिकाणी आपण शहरातील जी कामे घेतलेली आहे. ती जी शहरातील कामे आपण जास्त टॅक्स मिळतो म्हणून घेता का? आणि त्या पद्धतीने जे लोक खेडोपाडी राहतात. आज वेलकरी पाडा आहे, पाटील पाडा चेना येथे आहे. राई, मुर्धा, उत्तन, डोंगरी याच्यामध्ये कुठेही त्याचे नाव नाही. हे असे कशाला?

**मा. महापौर :-**

आपल्याला काय सुचना मांडायची असेल तर ती मांडा.

**परशुराम पाटील :-**

सुचना आहे पण ती समाविष्ट करा. जे काही आता चेन्नाचे आहे. ते डी.पी. प्लॅनमध्येसुद्धा आहे. ज्याची जागा आहे. ते सुद्धा दयायला तयार आहेत. पण आपण ती ॲक्वायर करीत नाही. आमच्या पत्राला तुम्ही उत्तर देता की, आम्ही गव्हर्नमेन्टकडे कागदपत्र पाठविलेले आहे. कधी पाठविलेले आहे?

**दिपक खांबित :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब आणि त्यांचे इतर नगरसेवक आणि आम्ही स्वतः जागेवाल्याकडे गेलो होतो.

**परशुराम पाटील :-**

मग त्यांनी काय उत्तर दिले?

**दिपक खांबित :-**

त्यांनी सांगितले की, भुसंपादन करुन जागा ताब्यात घ्या.

**परशुराम पाटील :-**

त्याचे म्हणणे बरोबर आहे. पण आपण करीत का नाही?

**दिपक खांबित :-**

त्याची केस वनविभागाबरोबर सुरु आहे.

**परशुराम पाटील :-**

बरोबर आहे. ते आपल्याला लेखी दयायला तयार आहेत. वनविभागाची जर असेल.

**दिपक खांबित :-**

मालकाची आणि वनविभागाची केस सुरु आहे.

**परशुराम पाटील :-**

तरीसुद्धा आपल्याला ते करता येते. आपण नगरपालिकेच्या हद्दीमध्ये त्यांची जागा भुसंपादन झाली आहे. तो सर्वे नंबर कुठला आहे? आपण भुसंपादनाकरिता पाठवा. पण गव्हर्नमेन्टकडुन काय

रिप्लाय येईल ते बघा.  तेव्हा आपल्याला कळेल. त्यांची केस चालु आहे म्हणुन आपण त्यांचा काही प्रयत्न करु नये का?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य परशुराम पाटील साहेब, आता जो आपला आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरीचा विषय आहे ह्याच्यामध्ये तुमचे एखादे रस्ते याच्यात सामिल झाले नसतील तर तेवढीच तुम्ही सुचना मांडावी आपण जो वेगळा मुद्दा मांडतो त्या संदर्भात जमीन मालकाशी चर्चा करणे गरजेचे आहे.

**परशुराम पाटील :-**

पीठासीन अधिकारी साहेब, मला कल्पना आहे त्या ह्याच्यावर माझे पूर्णपणे लक्ष आहे कारण प्रत्येकवर्षी तिथे लहान-लहान मुले शाळेत जातात आणि जेव्हा तिथे असे प्रकरण घडेल तेव्हा असे लक्षात येईल की, हे काय झाले? म्हणुन आपल्या प्रशासनाने तिथे काय केले तर आपल्या मिरा भाईंदरची शान वाढेल.

**मा. महापौर :-**

आयुक्त साहेब, सन्मा. सदस्य परशुराम पाटील यांनी मांडलेला मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे. कारण पावसाळ्याच्या मुलांना येण्या-जाण्यासाठी तिथे मार्ग नाही आहे.

**मिलन पाटील :-**

आता तुम्ही प्रशासकीय मंजुरी घेता. प्रशासकीय मंजुरी घेतल्यानंतर ही जी कामे आहेत. त्याचा पाठपुरावा हे अधिकारी करीत नाहीत.  उदाहरणार्थ आता चौपाटीचे काम आहे प्रशासकीय अधिकाऱ्यांनी याला प्रशासकीय मान्यता घेतलेली आहे.  ते काम थोड्या-थोड्या कारणासाठी आज मंजुरी घेऊन एवढे रखडलेले काम आहे आता याबाबतीत पण रोड वगैरे घेतलेले आहेत त्या बाबतीतसुद्धा असेच काम राहणार आहे. सॉल्ट डिपार्टमेन्टची परमिशन तुम्हाला घ्यावी लागणार आहे. त्या ह्याच्यामध्ये तुम्हाला झोपडपट्ट्या येणार आहेत. याचे तुम्हाला दुसरीकडे पुर्नवसन करावे लागणार आहे आणि या अधिकाऱ्यांना तुम्ही वेळ दयायची. ह्या वेळेमध्ये तुम्ही हे काम केलेच पाहिजे. आम्ही सभागृहाला तशी मान्यता देतो. पण तुम्ही या वेळेतच काम केले पाहिजे.  असे आयुक्तांनी त्यांना ठोसुन सांगितले पाहिजे. छोटे-मोठे कारण घेऊन ते सांगतात. आणि तशा प्रकारची मंजुरी घेऊन आज एवढे मोठे चौपाटीचे काम तसेच पडुन आहे.  काही थोडके मोडके हितचिंतक आहेत त्या हितचिंतकाच्या ह्याच्याने एवढे मोठे काम रखडलेले आहे तुम्ही नुसती प्रशासकीय मंजुरी घेऊन चालणार नाही.  ह्याच्याध्ये जे अडथळे येतील ती जबाबदारी त्या अधिकाऱ्यांवर टाकुन द्या.

**याकुब कुरेशी :-**

विषय क्र. ५ मध्ये मला असे वाटते की, अमुक रस्ते आलेले नाहीत किंवा जे रस्ते आपल्या डी.पी.रोडमध्ये आहेत जसे लिंक रोड आणि त्याच्या बाजुला दुसरे कार्यालय रोड डी.पी.रोडमध्ये आहेत वेस्टला ओव्हर ब्रीजवरुन उतरताना डावीकडच्या रस्त्याच्या डिमार्केशचे काम या रस्त्याच्या कामामध्ये घ्यावे अशी मी विनंती करतो

**हेलन जॉर्जी गोविंद :-**

महापौर साहेबांच्या परवानगीने बोलते, उत्तन, पाली, चौक रस्ता रुंदिकरण व सुधारणा करण्यासाठी घेणे

**जेन्वी आल्मेडा :-**

महापौर साहेब, माझी एक सुचना आहे की, उत्तन भाटेबंदर रस्ता रुंदिकरण व सुधारणा करण्यासाठी तो पण घेण्यात यावा जेणेकरुन सप्टेंबरमध्ये आमची यात्रा चालू होणार आहे तर लवकरात लवकर घ्यावा ही आमची आग्रहाची विनंती आहे.

**रोहिदास पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो, आता अंदाजपत्रकासाठी मंजुरीसाठी हा जो प्रस्ताव ठेवलेला आहे या मंजुरीमध्ये दोन-तीन गोष्टी महत्त्वाच्या राहिल्या की, ज्या शहराशी अत्यंत निगडीत आहेत. अनेक वर्षाच्या त्या उपेक्षित आहेत. जसे औद्योगिक वसाहती आहेत. औद्योगिक वसाहतीतील ज्या व्यवस्था आहेत जसे पाण्याचा निचरा, त्यातील रस्ते मी आग्रहाने सांगु इच्छितो की, जसे भाईंदर (पूर्व) ला स्टेशनसमोर काशी इंडस्ट्रीयल इस्टेट, वर्षा इंडस्ट्रीयल इस्टेट, माकानी इंडस्ट्रीयल इस्टेट, आनंदी इंडस्ट्रीयल इस्टेट जवळजवळ दहा ते बारा वर्षे झाली. या रस्त्यावर कुठेही खर्च झालेला नाही. लो लेव्हल म्हणुन या ठिकाणी कारखानदारी जाहिर झाली. हळुहळु कारखाने उंच होत गेले. रस्ते तसेच राहिले आणि रस्त्यावर कोणताही खर्च झाला नाही. माझी आपणांस विनंती आहे की, औद्योगिक वसाहत जसे आम्ही पूर्वेचे सांगितले एम.आय. असेल, जय अंबे असेल औद्योगिक वसाहत या हेडखाली जसे या

उत्पन्नावर आपली महापालिका चालते. तर ते एक आपले साधन आहे त्यातील कामगारांना, कारखानदारांना सोय करण्याच्या दृष्टीने फार मोठी दखल घेतली नाही. अंदाजे ७५ ते ७६ कोटीचे बजेट आहे. या सभागृहामध्ये आपणा सर्वांना मान्य आहे. महापौर, उपमहापौर, आयुक्त व सर्व अधिकाऱ्यांना मान्य आहे. या सभागृहातील सर्व नगरसेवकांना मान्य आहे की, भाईंदरमध्ये किंवा देशात जी पत्रकारीता आहे. आपल्यातीलच जे अंग आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब तो विषय नाही आहे. कृपा करुन तो विषय बंद करा. आम्ही पत्रकारांशी बोलतो आणि त्यावर आम्ही योग्य निर्णय घेणार आहोत.

**रोहिदास पाटील :-**

पण माझी आयुक्त साहेबांना विनंती आहे.

**मा. महापौर :-**

त्यांच्याशी वार्तालाप चालु आहे. त्यांना संदेश दिलेला आहे. आम्ही त्याच्यावर योग्य निर्णय घेतो.

**लिओ कोलासो :-**

आदरणीय पीठासीन अधिकारी साहेब, आपण ही विषय क्र. ५ ची टिपणी दिली. आणि या महानगरासाठी आनंदाच्या गोष्टी प्रस्तावित केल्या. बजेट तयार करतानाच्यावेळी या शहरासाठी ५५० कोटी रुपयाची कामे एकाच वेळी सुचविण्यांत आली होती. त्यापैकी जी काही कामे सुचविलेली आहेत. ती ७८ कोटी ५३ लक्ष इतकी आहे. आपल्या बजेटचा ढांचा पाहता ही कामे कशा पद्धतीने करायची. हा आपल्यासमोर प्रश्न आहे. मी मुद्दामहून सभागृहाच्या निर्देशनास आणुन देऊ इच्छितो की, खात्याने जी टिपणी दिलेली आहे त्याप्रमाणे भाईंदर (पश्चिम) येथे २५ कोटी रुपयांची कामे प्रस्तावित करण्यांत आलेली आहेत. भाईंदर (पूर्व) येथे २९ कोटी ६२ लाख रुपयांची कामे प्रस्तावित करण्यांत आलेली आहेत. मीरा रोड भागात २२ कोटी ७१ लाख रुपयांची कामे प्रस्तावित करण्यांत आलेली आहेत. आणि प्रादेशिक इम्बॅलन्सचा जर प्रश्न असेल तर राई, मोर्वा, मुर्धा आणि वर्सोवा, चेन्नासारखा ग्रामीण भाग आहे. त्या ठिकाणी फक्त ७५ लाखाचे आपण प्रोव्हीजन केलेले आहे. हा जो इम्बॅलन्स आहे. तो आपल्याला कसा भरुन काढायचा आहे? याच्यावर आम्ही नंतर सुचना देणार आहोत. त्या सुचना स्थायी समितीच्यामार्फत त्या त्या भागातील सदस्य जेव्हा देतील तेव्हा त्याचा जरुर विचार करावा अशी मी आपल्याला विनंती करतो. पण त्यासोबत महापौरांचा बंगला, आयुक्तांचे निवासस्थान, हॉस्पिटल ह्या ज्या काही अत्यंत तातडीच्या आणि अत्यावश्यक गोष्टी आहेत. त्याच्याबद्दलचे प्रावधान मुळ बजेटमध्ये करुन ह्या प्रायोरिटी लिस्टने जर आपण गेलो तर पुढच्या पाच वर्षामध्ये ही कामे होण्यासारखी दिसत नाहीत. म्हणुन जेव्हा स्थायी समिती या प्रश्नाचा साकल्याने विचार करील तेव्हा प्राधान्यक्रम निश्चितपणे ठरवावा आणि त्या दृष्टीकोनातुन पुढील सभेपुढे तसे प्रस्ताव सादर करावेत अशी विनंती आहे. मा. विरोधी पक्ष नेते आणि सर्व सदस्यांनीसुद्धा ही कामे विकासभिमुख असल्यामुळे ती मंजुरीला सर्वांनी होईल असे म्हटलेले आहे. या ठिकाणी कायदयाचा प्रश्न उपस्थित झाला म्हणुन सन्मा. सदस्या जयाबाई भोईर यांच्या स्वतःच्या मालकी जागेच्या संदर्भातील एक कोर्ट मॅटर माझ्याकडे आलेले आहे आणि त्यांचा जिव्हाळ्याचा प्रश्न असल्यामुळे सदस्य या नात्याने नव्हेतर एक नागरिक या नात्यानेसुद्धा की, काही रस्ते डी.पी. रोड आणि प्रस्तावित जी काही आपण सुचविलेली कामे आहेत. याच्यामध्ये काही ठिकाणी ॲक्वॉझिशनचे प्रश्न असतील. काही ठिकाणी कोर्ट मॅटर्स वगैरे असतील तर या सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करुन कुठेतरी, कोणीतरी एखाद्याने आंदोलन केलेले आहे. किंवा चार नगरसेवक एकत्र येऊन सगळ्यांनी दबाव आणुन काम मंजुर केलेले आहे, असे होऊ नये. अशी आपणाला विनंती आहे.

**शरद पाटील :-**

पीठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीने बोलतो, रेल्वे समांतर जी गटारे आहेत, ती गेल्या पावसाळ्यापासुन मी सांगतो की, त्याचा काही भाग पडलेला आहे. तो रिपेरिंग करुन घ्या. त्याच्यावर परत परत कचरा पडतो. आणि अर्धे पुर्वेचे पाणी त्याच्यातुन निचरा होत असल्याने परत ह्या वेळेला साफसफाई करुनसुद्धा त्याचा काही फायदा होणार नाही, असे मला वाटते. म्हणुन तो रिपेरिंग करुन घ्या. असे मी गेल्या पावसाळ्यापासुन सांगत आहे आणि त्याचे रिपेरिंग होत नाही. तरी हे काम यामध्ये समाविष्ट करुन घ्यावे.

**मदनसिंग उदितनारायण :-**

पीठासीन अधिकारी के परमिशन से बोल रहा हुँ। ये जो आपने कामो की मंजुरी ली है। उसमे सब बडे बडे कामों की ले ली लेकिन जो जरुरी छोटे काम है। उनके उपर भी ध्यान दिया जाना

चाहिए। जैसे की राहुल पार्क और आर.एम.पी. पार्क को जोडनेवाला जो रस्ता है। जिसमे छह नंबर और आठ नंबर प्रभाग को जोडते है। उस रस्ते पे जो कच्चा रस्ता है। बरसात के चार महिने मे गटर न होने की वजहसे लोगो का चलना मुश्कील हो जाता है। इसलिए मेरा निवेदन है की, राहुल पार्क, ज्योती अपार्टमेन्ट से लेके शिवसेना शाखा तक की गटर को बनाने के लिए जल्दी से जल्दी लिया जाए।

**नरेन्द्र मेहता :-**

पीठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीने बोलतो, आपण जे काही आता डी.पी. रोड घेतले जैसल पार्क ते घोडबंदर आणि त्याला इन्टरलिन्क कनेक्ट करणारे कनकियापासुन घोडबंदर रोडला गोल्डन नेस्टपासुन आहेत. ग्रीनकोर्ट क्लबपासुन आहेत. साहेब, पण ते सर्व रोड दोन ते तीन किलोमीटर रुंदीचे असतात. लेन्थवाईस आहेत. त्या तिघा रस्त्यांना इंटरलिन्क करणारा एकही रस्ता नाही. जो माणुस सेन्टरला राहतो. त्याला तीन किलोमीटर परत बाहेर यायचे. आणि परत दुसऱ्या रस्त्याने आतमध्ये जायचे. आपण जर एक रस्ता इन्टरलिंक केले तर बरेचसे ट्राफिक जवळ जवळ डायव्हर्ट होईल. ते तीन रस्ते आपण घेतले आहेत. त्या तिघांच्यामध्ये इन्टरलिन्क्स आहेत.

**मा. महापौर :-**

तीन इन्टरलिन्क आहेत. गोल्डन नेस्ट, कनकिया आणि हटकेश, ते घेतलेले आहेत.

**नरेन्द्र मेहता :-**

आपण जवळजवळ सर्व नाला रिपेरिंगला घेतलेला आहे. पण थोडा एक बाकी राहिलेला आहे तो म्हणजे गोडदेव पासुन अभिनव शाळेपर्यंतचा. तोही एक पुर्ण रिपेरिंग करुन स्लॅप टाकुन घेण्यात यावा. गोडदेव ते अभिनव स्कुल म्हणजेच मस्जिदपर्यंत धन्यवाद.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पीठासीन अधिकारी साहेब, दोन-तीन सुचना आहेत. पहिली अशी सुचना आहे की, जो भाईंदर (पश्चिम) चा रस्ता आहे. आता आमच्या सभागृहनेत्यांनी आकडेवारी सांगितली. २५ कोटी भाईंदर (पश्चिम), २९ कोटी भाईंदर (पुर्व) म्हणजे महत्त्वाचे काम आहे. ते यामध्ये घेतलेले नसावे असे मला वाटते. भाईंदर पश्चिमचा जो छत्रपती शिवाजी महाराज ते भाईंदर स्टेशन रस्ता आहे. त्याचे रुंदिकरण होऊन आज दोन वर्ष झालेली आहेत. वेळोवेळी डांबरीकरण करण्याचे पत्र दिलेले आहे आणि मला पत्राचे उत्तरही दिलेले आहे. त्यावेळचे आयुक्त मा. शिवमुर्ती नाईक बसलेले आहेत. त्यांनी ज्या जिद्दीने काम केले. त्या जिद्दीने त्याचे डांबरीकरण होत नाही. त्यामध्ये काय राजकारण आहे? माहिती नाही. साहेब, भाईंदर (पश्चिम) छत्रपती शिवाजी महाराज ते भाईंदर स्टेशन हा रस्ता रुंदिकरण करुन दोन वर्षे झाली. मला पत्रदेखील दिलेले आहे की, डांबरीकरण करणार आहोत. तरतुदीमध्ये घेतलेले आहे. पण याच्यामध्ये घेतलेले नाही. म्हणुन प्रथम छत्रपती शिवाजी महाराज ते भाईंदर स्टेशन हा रस्ता करुन डांबरीकरण करुन याच्यामध्ये समावेश करुन घेणे. साहेब, दुसरा गोष्ट भाईंदर (पश्चिम) मध्ये वॉर्ड क्र. ५ आणि वॉर्ड क्र. २१ या मागच्या महासभेमध्ये जैन मंदिर रोड म्हणजे प्रभाग क्र. २६ ला एक कोटी रुपये त्या रोडला पृष्ठीकरण करण्यासाठी दिले होते. भाईंदर प्रभाग ५ आणि प्रभाग २१ यामध्ये मागच्या दहा वर्षापासुन कुठल्याही रस्त्याचे खडीकरण, डांबरीकरण झालेले नाही आहे. म्हणुन यामध्ये प्रभाग ५ आणि २१ या दोन रस्त्यामध्ये खडीकरण, डांबरीकरण करण्यासाठी तरतुद करावी. ही माझी सुचना आहे.

**दिपक खांबित :-**

स्टेशनवरचे एस्टीमेट आम्ही घेतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

धन्यवाद. भाईंदर पश्चिमेच्या सर्व नगरसेवकांकडुन आपले धन्यवाद. पण प्रभाग क्र. ५ आणि प्रभाग क्र. २१ मध्ये मागच्या आठ-दहा वर्षापासुन एकही रुपया खर्च केलेला नाही. त्याचा याच्यामध्ये समावेश करून घ्यावा. साहेब, या विषयपत्रिकेमध्ये क्र. २६ मध्ये उड्डाणपुलाच्या खाली वाहन कार्यशाळेचे एस्टिमेंट आपण केलेले आहे. भाईंदरमध्ये मीटर लागत नाही. मीटरची दुरूस्ती होत नाही. नगरपालिकेच्या काळामध्ये मीटर कार्यशाळा उघडण्याचा प्रस्ताव पास झालेला आहे. भाईंदर उड्डाणपुलाच्या खाली मीटर कार्यशाळा पण त्यामध्ये समाविष्ट करून घेणे. म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज वॉर्ड क्र. ५ आणि २१ रस्ते आणि मीटर कार्यशाळा हे तिन्ही विषय त्यामध्ये समाविष्ट करून घेणे.

**जोत्स्ना हसनाळे :-**

मा. पीठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीने बोलते सन २००४-०५ या चालू वर्षाकरीता आपण जी विकास कामे घेतली ती विकास कामे मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये होणे अत्यंत गरजेचे आहे. परंतु मा. सभागृहानेते यांनी जे आता भाईंदर पुर्वेला, भाईंदर पश्चिमेला, मिरा रोड विभागात आणि आमच्या काशीमिरा विभागात कामाचे बजेटचे आपण पाहिले त्यामध्ये फक्त ७५ लाखाची कामे त्या भागामध्ये घेतलेली आहेत. परंतु काही छोटी-मोठी अशी विकास कामे प्रत्येक प्रभागात होणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणजे एक ठिकाणी आपण पाच करोडची किंवा सतरा करोडचे काम घेतो आणि काही ठिकाणी जी लाखोची कामे आहेत ती होत नाहीत. त्यासाठी आम्हाला इकडे वारंवार पालिकेमध्ये येऊन आयुक्तसाहेबांना त्रास द्यावा लागतो. आणि सांगावे लागते ही कामे होणे अत्यंत गरजेचे आहे. पण त्यांना आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळाली असेल तर ती कामे पुढच्या ह्याच्यामध्ये होऊ शकतील. अशी विकास कामे मा. सिटी इंजिनिअर साहेब आणि अधिकाऱ्यांनी येऊन पाहणी केलेली आहे.

**दिपक खांबित :-**

सगळ्याची प्रायोरिटी लिस्ट फक्त द्या. दोन-तीन कामांची प्रायोरिटी लिस्ट द्या, आपण ती यामध्ये समाविष्ट करू.

**जोत्स्ना हसनाळे :-**

जरीमरी गावदेवी मंदिर ते वेस्टर्न पार्कचा डी.पी. प्लानचा रस्ता अशा प्रकारची ही कामे घेण्यात यावी तशी मी आपणास विनंती करते. साहेब मी लिस्ट त्यांच्याकडे दिलेली आहे.

**अनंत पाटील :-**

पीठासीन अधिकारी साहेब, आताच आपले सन्मा सभागृहनेते लिओ कोलासो साहेब, तसेच विरोधी पक्षनेते पाटील साहेब यांनी पश्चिमेकडील आमच्या काही गावाचा उल्लेख केला. आमच्या गावामध्ये एक गांधी तलाव म्हणून जे काही प्रसिद्ध आहे आणि गांधी तलाव हा संपूर्ण गावाच्या मधोमध असल्या कारणाने आरोग्याच्या दृष्टीकोनातून या तलावाची निगा राखणे अत्यंत आवश्यक आहे आणि हा तलाव ज्या विकास कामामध्ये घेतला तर लोकांना रोगराईपासून मुक्तता मिळू शकेल. त्या ठिकाणी बरीच मच्छर झोलेली आहे आणि यापुढच्या विकास कामामध्ये त्याचे काम घ्यावे. त्याचबरोबर राई शिवसेना शाखेकडून जो मोठा नाला आहे. संपूर्ण मुर्धा, राई, मोर्वापासून जे पावसाळी पाणी जाते. ते मोठा नाला आहे. त्या नाल्याचे कामसुद्धा आपण हाती घ्यावे, अशी मी आपल्याला सुचना करीत आहे.

**जयंत पाटील :-**

विषय नं. ५ मध्ये ३१ नंबर साडे सतरा करोडचे आपण एक टेन्डर काढणार आहोत. तो रस्ता किती रुंद असेल ?

**दिपक खांबित :-**

सुरूवातीला अठरा मीटर आहे. मधला पीस तीस मीटर आणि पुन्हा अठरा मीटर आहे.

**जयंत पाटील :-**

आपण त्या रस्त्याचा सर्वे केला असेल.

**दिपक खांबित :-**

हो.

**जयंत पाटील :-**

त्यामध्ये इंदिरा नगरची झोपडपट्टी त्या रस्त्यामध्ये वसलेली आहे. आपण काय करणार आहात? याच्यामध्ये नवीन मंदिरे बनविली? आपण हा रस्ता बनविण्यासाठी कर्ज घेणार आहोत. कर्ज घेण्याची प्रक्रिया होईपर्यंत आणखी पाच-पन्नास झोपड्या वाढतील. आपण त्यांचे डिमार्केशन अगोदर करा. आपण डिमार्केशन करा. रस्त्यामध्ये आलेली अतिक्रमणे दूर करा आणि हा रस्ता कसा चांगला होईल? कारण गेली दहा वर्षे हा रस्ता होत नाही. हा रस्त्या जर झाला तर आपले संपुर्ण ट्राफिक त्या रस्त्यावर डायव्हर्ट होईल आणि माझा दुसरा विषय असा आहे की, महाराष्ट्र मित्रमंडळाकडून एस्. एन्. कॉलेजकडून जो नाला जातो. तो गेले वर्षभर पडलेला आहे. खरे म्हणजे तो आपल्याला अत्यावश्यक बाब म्हणून ताबडतोब घ्यावा लागेल.

**दिपक खांबित :-**

खर्च खूप मोठा होता. परंतु आता मंजुरी घेऊन लगेच करतो.

**जयंत पाटील :-**

ते गटार होणे खुप गरजेचे आहे आणि माझ्याच प्रभागामध्ये एक काम आलेले नाही. ते कृपया लिहून घ्या गोडदेवचे जे स्मशान आहे. त्या स्मशानाला लागून एक नाला आहे. तो नाला अर्धवट

अवस्थेत आहे. तो नाला महादेव पार्ककडून निघतो. त्याच्यापुढे एक विश्वकर्मा आश्रम नावाचा आश्रम झालेला आहे. त्या आश्रमाने पुढे समोरून जाणारा एक रस्ता अडवलेला आहे. तो रस्ता देखील पुर्ण होणे आणि हे गटार पुर्ण होणे या दोन गोष्टी त्या ठिकाणी आहेत.

**रक्षा शाहः-**

मा. महापौरांच्या आदेशाने बोलू इच्छिते. विनायक नगर ते राणी लक्ष्मीबाई उद्यानापर्यंत मुख्य नाल्यावर जे स्लॅप बांधून आपण रस्ता तयार करणार आहोत. त्या रस्त्याबाबत मी शिंदे साहेबांना एक पत्र दिले होते. ४० ते ५० फुटाच्या अंतरामध्ये कुंपण भिंत बांधायची. त्याचा त्यामध्ये समावेश करून घ्यावा.

**दिपक खांबित :-**

चाळीस हजाराचे काम आहे ते त्याच्यात होऊन जाईल.

**रक्षा शाह :-**

दुसरे असे आहे की, पहिले जे गटाराचे काम झालेले आहे त्यावर अजून लादीचे काम राहिलेले आहेट ते त्यात करावे. पार्श्वनगर १ ते ५ पर्यंत गटारावर लादी टाकलेली नाही.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, प्रकरण क्र. ५ अनुक्रमांक १६ वर नवघर रोड पुर्नःपृष्ठीकरणाचा विषय मंजुरीसाठी आलेला आहे. महापौर साहेब, मी आपल्याला या विषयावर सांगु इच्छितो की, नवघर पुर्न पृष्ठिकरण करण्या अगोदर नवघरवर पाण्याच्या दोन-तीन पाईप लाईन नवीन पडलेल्या आहेत. तीन महिन्यापासून त्या रोडला पुर्णपणे ५ एम.एल.डी. पाणी माझ्या मते तिथे दरारोज वाया जात असेल. पाऊस पडत नाही. परंतु आम्ही मात्र रोज पावसाच्या पाण्यासारखे चालतो असे त्या ठिकाणी लिकेज आहे. तीन महिने झाले आम्ही लिकेज आहे असे सांगतो, पण अजुनपर्यंत लिकेज निघालेले नाही. परत-परत तिथे लिकेज काढले जाते. चार-चार वेळा लिकेज काढल्यानंतर परत पाईप लाईनचे पाणी त्याच ठिकाणी लिकेज होते. हा रोड पुन्हा पृष्ठिकरण करण्या अगोदर ही संपुर्ण पाण्याची पाईप लाईन व्यवस्थितपणे लिकेज काढून नंतर रोड व्हावा. त्याच्यानंतर रस्ता रुंदिकरण झालेले आहे. परंतु, इलेक्ट्रिक पोल, बी.एस्.ई.एस्.चे पोल आणि टेलिफोनचे बॉक्स परत बाजुला घेण्यासाठी या रोडच्या अगोदर ते काम झाले पाहिजे एवढी माझी सुचना आहे.

**प्रभात पाटील :-**

महापौर साहेब, याच विषयाला धरून मला बोलायचे आहे म्हणून मी मध्ये उभी राहिली आहे. हा जो पाईप लाईनचा विषय सांगितला, अतिशय गंभीर विषय आहे. त्याशिवाय या रस्त्याला हात लावू नका. कारण सर्व पैसा पाण्यात जाणार आहे. संपूर्ण रोड भिजलेला असतो. सकाळी अक्षरशः पावसाच्या पाण्यामधून लोक मार्गक्रमण करीत असतात आणि वारंवार तक्रारी करून सुद्धा त्याचे काही होत नाही. शेवटी ५० लाख रूपये पाण्यात वाहून जातील. आधी पाण्याचे लिकेजेस काढा आणि मगच तो रस्ता करा.

**एस. के. दशोरे :-**

लिकेज दुरूस्ती करण्याचे प्रकरण तयार करण्यात आले असून मंजूरी मिळालेली आहे आणि पंधरा दिवसात ते पुर्ण होईल.

**प्रभात पाटील :-**

पुर्नःपृष्ठिकरण आहे. तर जेवढा आपला रस्ता आहे. त्याच्या बाजूने दहा फुट रस्ता मोकळा सोडलेला आहे. मातीचा भाग आहे. आता रस्ता रूंदिकरण झालेले आहे. तो पोर्शनसुद्धा त्यामध्ये कव्हर करा, जेणेकरून वाहतुकीला त्याचा चांगला परिणाम दिसून येईल.

**हॅरल बोर्जिसः-**

सन्मा. पीठासीन अधिकारी साहेब, प्रकरण क्र. ५ वरील शहरातील विविध विकास कामाची आर्थिक प्रशासकीय मंजूरीचा विषय होता. प्रभाग क्र. १ मधील पालखाडी आणि आनंद नगरचा जो एक तलाव आहे. अत्यावश्यक अशा संरक्षक भिंतीचे काम आहे. ते कृपया याच्यामध्ये समाविष्ट करावे आणि केशवसृष्टीपासून पुढचा डी.पी. रोड जो बाकी आहे, कृपया तो प्रायोरिटीवर डेव्हलप करण्यासाठी आपण विचाराधीन घ्यावा. कृपया ही कामे याच्यामध्ये समाविष्ट करावी. मागच्या सभेमध्ये नगरभवनला लिफ्ट लावण्याबाबत बराचसा वादविवाद झाला. तर काही ज्येष्ठ सदस्य आहेत, काही लोकसुद्धा तिथे जातात. नगरभवला लिफ्ट लावण्याचे जे काम आहे ते करावे.

**मिलन म्हात्रे :-**

प्रकरण क्र. ५ विषय क्र. १ आणि विषय क्र. १३ यामध्ये सर्वप्रथम इकडे एकच रोड आहे. त्याच्या गटाराच्या कामाचे सांगितलेले आहे. त्यानंतर परत पुर्नःपृष्ठीकरण दिलेले आहे. याला वर ५९ लाखाचा खर्च आहे आणि खाली २८ लाखाचा खर्च आहे. सिटी इंजिनिअर साहेबांनी खुलासा करावा. क्र. ६ चा जो विषय आहे, भाईंदर पश्चिम या ठिकाणी जो नाला बनविलेला आहे. माझ्या माहितीनुसार भाईंदरला फक्त तीन नाले आहेत. एक सुभाषचंद्र बोस मैदानापासून सुरू होऊन मुर्धा खाडीपर्यंत जाणारा नाला, त्यानंतर मोती नगरपासून थेटपर्यंत जाणारा नाला. या संपुर्ण बांधकामाकरीता गेल्या दोन-अडीच वर्षापासून मी स्वतः व्यवस्थितरीत्या स्थायी समितीमध्ये दोन वर्षे झाली प्रयत्न करीत आहे. गेल्या वर्षी सुद्धा तरतुद केली गेली. एकही रूपया तरतुद त्याच्यावर खर्च केली गेली नाही. जवळजवळ सहा वॉर्डच्या पाठीमागे हा एक नाला आहे आणि सहा वार्डचा पाण्याचा निचरा या वार्डच्या नाल्यामधून जात आहे. साहेब, यावर्षी जवळ जवळ ७५ लाखाची तरतुद स्थायी समितीने या कामाकरीता केलेली आहे हे मला चांगले माहिती आहे. कारण मी दरवेळेला अशी तरतुद करण्याकरीता भांडतो. कमी केली असेल, जास्त केली असेल. परंतु फक्त या तीन-चार ठिकाणच्या नाल्याच्या कामाच्या ऐवजी एकच काम इकडे घेतले गेलेले आहे. हे पंधरा लाख सतरा हजार सातशे पन्नास रूपयाचे आहे. तरतुद असूनसुद्धा तिकडे दाखविले गेलेले नाही. याच नाल्यावर आपल्याला नाले खोदाईकरीता लाखो रूपये दरवर्षी खर्च येतो. जर तुम्ही एकदा कायमस्वरूपी नाला बांधला तर पुढच्या वर्षी तुम्हाला त्याचे रिलॅक्सेशन मिळेल, त्याचा बेनिफीट मिळेल. या नाल्याच्या बद्दल जे मी तुम्हाला सांगितले ते नाले जय अंबे एस्.टी. बस डेपो म्हणजे बेकरी ते खाडीपर्यंतचा एक छोटा नाला आहे. तो ह्याच्यात उल्लेखही केलेला नाही आहे आणि हे जे त्यांनी टायटल दिलेले आहे. जनता नगर ते गणेश देवल नगर हा असा नाही आहे. गणेश देवल नगर बालवाडी ते हनुमान नगर झोपडपट्टीचा ब्रीज फेज नं. १ आणि त्याच्यापुढे फेज नं. २ अशा तीन भागामध्ये हे काम करायचे आहे आणि साहेब या ठिकाणी शेवटी याची तरतुद करून घ्यावी. बजेटमध्ये त्याच्या पैशाची तरतुद आहे. पण आपण यामध्ये फक्त पंधरा लाखाची तरतुद केली आहे आणि डी.पी. रोड हा सेपरेट विषय दिलेला आहे. हा विषय पुर्णपणे जवळजवळ सत्तर करोड रूपयाचा जो खर्च त्यावेळी स्थायी समितीला अपेक्षित दाखविला गेला होता. या कामाला आम्ही मंजुरी दिलेली आहे.

**जयंत पाटील :-**

साहेब, विधान परिषदेची जी निवडणूक आहे आणि विधान परिषदेला उभे राहिलेले आपले सन्मा. नगरसेवक मिलन म्हात्रे साहेब यांना आपण शुभेच्छा देत आहोत. त्यांची कदाचित ती शेवटची सभा असेल म्हणून ते जास्त बोलत आहेत. कारण नंतर ते विधानसभेमध्ये आपले प्रश्न मांडणार आहेत. तेव्हा असा प्रश्न आहे की, विधानसभेला उभा राहणार उमेदवार सभागृहामध्ये किती बोलू शकतो? की बोलू शकतो का? त्यांना आचार संहिता लागू आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

नाही. रितसर पत्र घेतलेले आहे.

**जयंत पाटील :-**

आपण त्यांना शुभेच्छा दिलेल्या आहेत तर त्यांनी निवडून यावे आणि आपले संपूर्ण भाईंदरचे प्रश्न विधान परिषदेत मांडावे.

**मिलन म्हात्रे :-**

महापौर महोदय आणि सन्मा. सदस्या जयंत पाटील हा महत्वाचा विषय आहे. ही जी सत्तर करोडची मंजूरी दिली गेली. त्यावेळी स्थायी समितीला आम्ही एक कंडिशन ठेवली होती. त्याचे प्रोसीडिंग आपण जर वाचले. हा जो सत्तर कोटीचा भविष्यामध्ये येणारा जो खर्च आहे आणि जे रस्ते डेव्हलप करायचे आहेत त्याच्यामध्ये झालेला मातीचा भराव, आजमितीस मातीचा भराव झाला असेल तर, किंवा कुठल्या बिल्डरने प्रायव्हेट किंवा स्वतःच्या खर्चाने हे रस्ते बनविले असतील तर, गटारे, लाईट वगैरे ही जर काही केली असतील तर, या सर्व बाबींचा जो खर्च आहे तो या संपुर्ण रोडमधून येणाऱ्या खर्चातून वजा करायचा आहे आणि मग येणाऱ्या खर्चाला आम्ही मंजूरी दिलेली आहे. हे जे खालचे शेवटचे तुम्ही डी.पी. रोड दिलेले आहे ह्याची आपण जरा नोंद घ्यावी. ही जी या ठिकाणी फिगर दिलेली आहे त्यामधुन ते वजा करावी. त्यावेळेला मला आठवते आहे व्हिडीओ शुटिंग काढण्याची सुचना केलेली आहे. बऱ्याचशा प्रोजेक्टमध्ये बिल्डर लोकांनी खाजगी रस्ते बनवून तयार केलेले आहेत. त्यांचे परत मेजरमेन्ट यामध्ये दाखविले गेले आहे आणि खर्चही दाखविला आहे. तर हे करण्याने जवळजवळ महापालिकेला तीस-चाळीस करोड रूपयाचा फरक पडू शकतो अशी सुचना

आम्ही त्यावेळेला केली होती. त्याचा विचार करावा आणि त्याचे रिएस्टीमेंट काढून परत सभागृहापुढे ठेवावे किंवा तसे केले असल्यास तसे द्यावे.

**दिपक खांबित :-**

प्रत्यक्ष पाहणी ते बघुनच आपण केलेली आहे.

**शरदचंद्र वैरागडे :-**

तो भाग वगळून त्याचे एस्टिमेट केलेले आहे. गेल्या वेळेला हा प्रश्न आला होता आणि जे तुम्ही म्हणला होता की, ऑलरेडी एक्झिस्टींग रोड आहे ते आणि जे रोड आता तयार आहे. त्याचा तो भाग वगळून बाकीचे एस्टिमेट केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्यामध्ये तुम्ही हे दिलेले नाही. ही विषयपत्रिका आहे तशीच फिरविली आहे. तुम्ही वगळले बोललात तर त्या ठिकाणचा म्हणजेच भाईंदर स्टेशन रोडचा भाग इथून अमुक एकपर्यंत वगळला आणि पुढे केला.

**शरदचंद्र वैरागडे :-**

ते डिटेल एस्टिमेटमध्ये येणार.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब ते आम्हाला कळविले पाहिजे. हे याच्यात नाही आहे. ते तुम्ही डिटेल द्या. नगरपालिकेचा जवळजवळ ४०-५० करोड रूपयाचा यावर फरक पडेल आणि आपण व्हिडीओ शुटिंग काढली का? त्यावेळी स्थायी समितीमध्ये ठरले होते की, व्हिडीओ शुटिंग काढायची.

**दिपक खांबित :-**

एक्झिस्टींग रस्त्यांची लेव्हल घेतलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

व्हिडोओ शुटींगचे ठरले होते. जे सभागृहात झाले आहे, जे वचन दिलेले आहे, ते पाळले पाहिजे.

**दिपक खांबित :-**

ठिक आहे, आपण व्हिडीओ शुटिंग घेऊ या.

**मा. महापौर :-**

विषय क्र. ५ ला धरून पुढच्या सर्व सदस्यांना जी काही सुचना मांडायची असेल याच्यात सामावून घ्यायची असेल तर कृपा करून ती यादी आयुक्त साहेबांकडे द्यावी आणि मी आयुक्त साहेबांना सांगतो की, ती याच्यामध्ये समाविष्ट करून घ्यावी.

**मिलन म्हात्रे :-**

माझा गौतम नगरमधील रस्त्यांचे डांबरीकरण करायचे आहे. अनेक पत्रव्यवहार केलेले आहेत. साहेब, मी येथे सांगितले त्याचे काय करणार?

**मा. महापौर :-**

लिस्ट आपण दिलेली आहे ना.

**शानु गोहिल :-**

मै दो मिनिट प्रभाग क्र ६ के बारे मे बोलना चाहूँगी। प्रभाग क्र. ६ मे जैसल पार्क, आर.एम.पी. पार्क और राहुल पार्क है। खास करके जेसल पार्क के बारे मे आपको जानकारी दूँगी की, वहाँ के रोड जो की दस बारा साल से जिसका डांबरीकारण अभी तक हुआ नही है। तो मै चाहूँगी की, आप उस काम को सबसे जादा प्राधान्य दे। और राहुल पार्क जिसका रस्ता काफी कच्चा है। खांबित साहब को इसके बारे मे मालूम है। इसके बारेमे मै पत्र भी दिया है। तो आप कृपा करके इस काम को लिजिए।

**शुभांगी नाईक :-**

पीठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीने बोलते, या ठिकाणी कैराली अपार्टमेंटपासून ते नाकोडापर्यंत दुरूस्ती करण्याचा स्लॅप आणि नाल्यापासूनची पुर्नबांधणी व दुरूस्तीचा स्लॅप टाकायचा आहे. दुसरी गोष्ट या ठिकाणी नाला साफ करताना एवढ्या अडचणी येतात की, त्या ठिकाणी आपल्या पाण्याच्या लाईन्ससुद्धा भरपूर प्रमाणात जेसल पार्कला गेलेल्या आहेत. त्याची पण आपण व्यवस्थित सोय करावी आणि तिसरी गोष्ट, माझ्या प्रभागामध्ये मी त्या दिवशी माणसे पण आणलेली होती आणि संपूर्ण चौथरा पण बांधून द्यायचा होता. साहेब, त्या ठिकाणी गटार पुर्वीपासून होते आणि त्या कालूसिंगने ते गटार

पुर्णपणे चोक-अप केलेले आहे आणि ती अडचण आपल्या लोकांना आलेली आहे आणि कंपनीवाल्यांना त्याचा त्रास होत आहे. त्याच्यावर आपण काय ॲक्शन घेणार, ती पण आपण त्याच्यावर नोंद करावी.

**शशिकांत भोईर :-**

पीठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीने बोलत आहे. खारीगाव शाळा येथे मा. विरोधी पक्ष नेते परशुराम पाटील यांनी जो शाळा सुरू करण्याबद्दल प्रस्ताव मांडला. तो योग्य आहे आणि मी प्रशासनाला प्रस्तावही दिलेला की, त्या शाळेच्या वर तीन माळ्यांचे बांधकाम करायचे आहे, असा मी प्रस्ताव दिलेला होता तो घेतलेला नाही. तो याच्यामध्ये समाविष्ट करावा.

**दिपक खांबित :-**

या कामाकरीता बजेटला तरतुद केलेली नाही. त्यामुळे तो घेतला नाही.

**रमेश जैन :-**

पीठासीन अधिकारी के परमिशन से बोलता हूँ। भाईंदर (प.) मे डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड मुख्य मार्ग है। आठ वर्ष उसका दुरूस्तीकरण और डांबरीकरण नही किया गया है। उसके लिऐ मैने पत्रव्यवहार भी किंया। स्थायी समितीने भी लिया। फिर भी यहाँ पे नही आया है ।

**अशोक पां. पाटील :-**

आयुक्त साहेब, दि. २९/६/२००२ रोजी मी पत्र दिलेले आहे की, राममंदिर जवळ, मांडली गल्ली हे अजून समाविष्ट झालेले नाही. पाच पत्र आहेत. त्याबाबत अजून मला लेटरसुद्धा दिले नाही.

**प्रकरण क्र. ५ :-**

विविध विकास कामांना प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देणेबाबत.

**ठराव क्र. ७ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या विविध विकास कामांकरीता सन २००४-०५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली आहे. महानगरपालिका हद्दीत करावयाच्या कामांची खालील प्रमाणे अंदाजपत्रके आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १. | भाईदर(प) पोलिस स्टेशन ते जनार्दन रकवी मार्ग क्रॉस रोड पर्यत रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार बांधून फुटपाथ तयार करणे. | रू.५९,३२,६००/- |
| २. | भाईदर(प) विनायक नगर ते राणीलक्ष्मीबाई उदयान पर्यत मुख्य नाल्यावर स्लॅब घालून रस्ता तयार करणे. | रू.४८,१०,३००/- |
| ३. | भाईदर(पू) महाराष्ट्र मित्र मंडळ ते नवघर खाडीपर्यतचा नाला दुरूस्ती करणे. (भाग १) | रू.५०,००,०००/- |
| ४. | भाईदर(पू) केबिन रोड सोनल अपार्टमेंट ते स्वाती अपार्टमेंट पर्यत नाला दुरूस्ती करणे, स्लॅब टाकून पादचारी मार्ग तयार करणे. | रू.४०,००,०००/- |
| ५. | मिरा रोड एस.के.स्टोन ते गीतानगर व पुढे शितल नगर जंक्शन पर्यत गटार बांधणे. | रू.२३,४७,४६२/- |
| ६. | भाईदर(प) गणेश देवल नगर नाला पक्का बांधणे (जनता नगर ते गणेश देवल नगर) | रू.१५,१७,७५०/- |
| ७. | भाईदर(प) उड्डाणपूल रस्ता टेंभा हॉस्पीटल क्रॉस रोड ते उड्डाणपूल मुख्य रस्त्यापर्यत दोन्ही बाजुस गटारे बांधणे. | रू.१७,४८,४००/- |
| ८. | भाईदर(पू) गोडदेव नाका ते नवघर नाक्यापर्यत नाल्याची पूर्नबांधणी, दुरूस्ती करून स्लॅब टाकणे. | रू.५०,००,०००/- |
| ९. | पाली बीच रिसोर्ट ते पेट्रोल पंप पर्यत गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.२४,५७,०००/- |
| १०. | मिरा रोड एस.टी.पी. ते स्मशानभूमी पर्यत नाला बांधणे. | रू.५८,२५,३८०/- |
| ११. | भाईदर(पूर्व) प्रभाग क्र.६ मध्ये साधूराम हॉटेल जवळील नाला पूर्न बांधणी करून स्लॅब टाकणे. | रू.२७,७६,७४३/- |
| १२. | मिरा रोड शांतीनगर नाला पूर्नबांधणी करणे. (भाग-१) | रू.४०,००,०००/- |
| १३. | भाईदर(प) पोलिस स्टेशन ते जनार्दन रकवी मार्ग क्रॉस रोड पर्यत रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रू.२९,५४,७००/- |

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
| --- | --- | --- |
| १४. | भाईदर(प) जय अंबे झोपडपट्टी क्र.२ व पुढे चौपाटी कडे जाणारा रस्ता दुरूस्तीसह डांबरीकरण करणे. | रू.३३,२२,४००/- |
| १५. | भाईदर(प) मांडली तलाव गार्डन शेजारील रस्ता टेंभा हॉस्पीटल क्रॉस रोड पर्यंत रूंदीकरणासह, गटार बांधून डांबरीकरण करणे. (भाग १) | रू.२०,००,०००/- |
| १६. | भाईदर पूर्व नवघर रोड पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रू.५०,८०,४५०/- |
| १७. | भाईदर पूर्व साईबाबा मंदिर ते नवघर नाक्या पर्यत रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रू.५०,००,०००/- |
| १८. | सिल्व्हर पार्क रस्ता (छत्रपती शिवाजी महाराज मार्ग ते जांगीड सर्कल पर्यत) पुर्नःपृष्ठीकरण करणे व डीव्हायडर बसविणे. | रू.५४,८९,२००/- |
| १९. | नगरभवन येथे लिफ्ट बसविणेस आवश्यक बांधकाम करणे. | रू.२५,५०,०००/- |
| २०. | मिरा रोड रामदेव पार्क रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे. (क्वीन्स पार्क व सरदार पटेल शाळे समोरून) | रू.४२,५०,८००/- |
| २१. | शांतीनगर ते सृष्टी रस्त्याच्या मध्यभागी डीव्हायडर बसविणे. | रू.३७,५१,२२०/- |
| २२. | मिरा रोड रेल्वे स्टेशन ते विभागीय कार्यालय पर्यत रस्ता उंच करून डांबरीकरण करणे. | रू.१५,२०,३००/- |
| २३. | मिरा रोड हैदरी चौक ते सन रॉक पर्यत एन.एच. हायस्कूल पर्यतचा रस्ता तयार करणे. | रू.६३,०६,८००/- |
| २४. | नरेंद्र पार्क लोढा पार्क रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रू.६३,००,०००/- |
| २५. | पेणकरपाडा शाळागृह इमारतीवर वाढीव मजला बांधणे. | रू.१९,७४,१७४/- |
| २६. | मुर्धा येथे शाळागृह इमारत बांधणे. | रू.५०,८९,२५०/- |
| २७. | भाईदर(प) रेल्वे उड्डाणपूलाखाली वाहन कार्यशाळेकरीता बांधकाम करणे. | रू.१०,००,०००/- |
| २८. | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर विकास टॉवर, नंदधाम, शालीभद्र इमारती मधील रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे गटार बांधणे. | रू.२३,८०,०००/- |
| २९. | चेणा, पाटील पाडा, बेलकरी पाडा रस्ता तयार करणे. | रू.२५,००,०००/- |
| ३०. | घोडबंदर गांव स्मशानभूमीच्या पुढे गणपती विसर्जनासाठी संरक्षक भिंत व सी.सी. रस्ता तयार करणे. | रू.१५,४०,०००/- |
| ३१. | चेणा शाळा, संरक्षक भिंत बांधणे. | रू.४,५०,०००/- |
| ३२. | भटाचा पाडा मिनाक्षी नगर मधिल रस्ते सिमेंट कॉंक्रिट करणे. | रू.११,८७,४९२/- |
| ३३. | मांडवी पाडा सेंट झेवियर्स हायस्कूल ते शनिवार हिंगे यांच्या घरापर्यत रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे. | रू.१७,९५,८७४/- |
| ३४. | राष्ट्रीय महामार्ग क्र.८ वर गावठण येथे श्री.महाविष्णू मंदिरापासून नविन गावठण पर्यत रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे. | रू.२३,०८,४५७/- |
| ३५. | जरीमरी तलाव ते वेस्टर्न पार्क डी.पी. रोड तयार करणे. | रू.३३,५०,०००/- |
| ३६. | राष्ट्रीय महामार्ग क्र.८ वर महाजनवाडी जवळ वरळी पाडा येथे प्रसाद हॉटेल ते शाम उपवन पर्यत रस्ता, खडीकरण, डांबरीकरण करणे. | रू.८,७८,६८३/- |
| ३७. | राष्ट्रीय महामार्ग क्र.८ वर माशाचा पाडा रोडवर जरीमरी तलाव गार्डन साठी खेळणी, पायवाटा लॅण्डस्केपींग, बाके बसविणे. | रू.८,२०,०००/- |
| ३८. | राष्ट्रीय महामार्ग क्र.८ वर महाजनवाडी येथे नित्यानंद शाळेजवळ क्रॉस ड्रेन बांधणे. | रू.५,००,०००/- |
| ३९. | पांडूरंग वाडी(साईबाबा मंदीर रोड) रस्ता रूंदीकरण पुर्नपृष्ठीकरण करणे. | रू.१८,५५,०००/- |

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| ४०. | पेणकरपाडा प्राथमिक शाळा, किसन नगर, वर्तक आळी रस्त्यावर शहाबादी लादी बसविणे. | रू.१,५०,००० /- |
| ४१. | काशिचर्च येथे सी.सी. रस्ते तयार करणे व गटारे दुरूस्ती करणे. | रू.३,००,००० /- |
| ४२. | पालखाडी रस्त्यालगत संरक्षक भिंत बांधणे. | रू.१४,५०,००० /- |
| ४३. | केशव सृष्टी ब्रीज पासून गावाकडील रस्ता तयार करणे. | रू.१५,००,००० /- |
| ४४. | माशाचा पाडा रोडवर संरक्षक भिंत बांधणे. | रू.१२,५०,००० /- |
| ४५. | भाईदर (पूर्व) प्रभाग क्र.६ औद्योगीक वसाहतीमधील रस्ते गटारे बांधणे. | रू.२९,८०,००० /- |
| ४६. | पेणकरपाडा येथे हनूमान मंदीराच्या पाठीमागे जयचंद्र गावंड यांच्या घरापासून ते विहीरीपर्यंत सी.सी. गटार बांधणे. | रू.४,९०,००० /- |
| ४७. | पातानबंदर मजीद दुकानापासून ते उत्तन स्मशानभूमी पर्यत बंद गटार बांधणे. | रू.२०,५०,००० /- |
| ४८. | प्रभाग क्र.१७ मधील गटारे, स्लॅब दुरूस्ती करणे, नविन गटारे बांधणे. | रू.१३,००,५०० /- |
| ४९. | भाईदर (पूर्व) खारीगाव शाळा इमारतीवर प्रभाग कार्यालय, वाचनालय, अभ्यासिका, इन्डोअर गेम करीता वाढीव मजले बांधणे. | रू.५०,००,००० /- |
| ५०. | केबिन रोड नाका ते रिंका अपार्टमेंट, एम.आय.उद्योगनगर, नर्मदानगर ते स्वाती अपार्टमेंट पर्यत रस्ता डांबरीकरण करणे. | रू.४५,००,००० /- |
| ५१. | संध्यागुप्ता, पृथ्वी सदन, नर्मदा टॉवर ते महालक्ष्मी टॉवर पर्यत सी.सी. गटार स्लॅब टाकणे. | रू.२५,००,००० /- |
| ५२. | राष्ट्रीय महामार्ग क्र.८ मुन्शी कंपाउंड (मस्जीद पाठीमागील) गटार दुरूस्ती करून पूर्नबांधणी करणे. | रू.४,७०,००० /- |
| ५३. | हटकेश उद्योग नगर मधील क्रॉस लेन उंची वाढवून खडीकरण/डांबरीकरण करणे. | रू.२८,५०,००० /- |
| ५४. | भाईदर (पूर्व) केबिन रोड रेल्वे समांतर नाला दुरूस्ती करणे. | रू.१५,४०,२०० /- |
| ५५. | भाईदर (प) छत्रपती शिवाजी महाराज मार्ग पूर्नपृष्ठीकरण करणे. | रू.८०,००,००० /- |
| ५६. | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग क्रॉस रोड दीपक हॉस्पीटल शेजारील डी.पी.रोड रूंदीकरण, खडीकरण, डांबरीकरण करणे गटार बांधणे. | रू.४०,५०,००० /- |
| ५७. | भाईदर (पू) नवघर गाव ते चाळघर रस्ता खडीकरण/डांबरीकरण करणे. | रू.१४,५०,३०० /- |
| ५८. | भाईदर (पू) आझादनगर सी.सी. रस्ते करणे. | रू.३,४५,००० /- |
| ५९. | मिरा रोड जांगीड कॉम्पलेक्स नविन रस्त्यालगत गटारे बांधणे. | रू.१७,४०,००० /- |
| ६०. | मिरा रोड स्मशानभूमी रोड लगत गटार बांधणे. (रिक्षा स्टॅन्ड पासून) | रू.४८,२६,५०० /- |
| ६१. | भाईदर (पू) कीरण नगर नाला दुरूस्ती करणे. | रू.२५,००,००० /- |
| ६२. | भाईदर पूर्व स्नेहा हॉस्पीटल लेन पूर्नपृष्ठीकरण करणे. | रू.३,०६,३१६ /- |
| ६३. | भाईदर (पूर्व) प्रशांत हॉटेल कॉर्नर ते शांती गंगा इमारतीपर्यत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.४,७८,२५५ /- |
| ६४. | भाईदर (पूर्व) मोरेश्वर पाटील पाण्याची टाकी ते इंदिरानगर झोपडपट्टी रस्ता दुरूस्ती ग्राउंटींग करून डांबरीकरण करणे. | रू.४,८७,६५० /- |
| ६५. | भाईदर (पूर्व)नवघर शाळेपाठीमागे, रिध्दी सिध्दी शिवशंकर नगर चाळ खाडीकडे नाला बांधून स्लॅब टाकणे. | रू.१५,८७,५०० /- |
| ६६. | भाईदर (पूर्व) प्रभाग क्र.८ शिवशक्तीनगर, शिवकृपा को.हौ.सो.पर्यत सीसी रस्ता तयार करणे. | रू.३,२०,००० /- |
| ६७. | भाईदर (पूर्व) तिरूपती गल्लीतील कुबेर अपार्टमेंट ते बालाजी अपार्टमेंट पर्यत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.२,८९,७०० /- |

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| ६८. | भाईदर (पूर्व) प्रभाग क्र.८ मधील नवलताकुंज ते गणेश महिमा पर्यत गटार दुरूस्ती करून स्लॅब टाकणे. | रू.३,२८,०५० /- |
| ६९. | भाईदर (पूर्व) प्रल्हाद अपार्टमेंट ओमपुष्ठक, सुवासिता दोषी उद्योगनगर ते जय अंबे क्रॉसरोड गटार दुरूस्ती करणे. | रू.३,७३,५६५ /- |
| ७०. | भाईदर (पूर्व) कल्पतरू इमारत ते साईबाबा नगर सनशाईन इमारतीपर्यत गटाराचे नुतनीकरण करणे. | रू.२,९१,१७० /- |
| ७१. | भाईदर (पूर्व) गोल्डन नेस्ट रस्त्यावरील मधूकर पाटील घरासमोरून नाल्यावर स्लॅब टाकणे. | रू.४,९०,००० /- |
| ७२. | भाईदर (प) पार्श्वनगर (१ ते ५) गटार पूर्नबांधणी करणे व इतर गटारे दुरूस्ती करणे. | रू.७,४०,००० /- |
| ७३. | भाईदर (पूर्व) गोडदेव स्मशानभूमी मागील रस्ता १०० फुटी डी.पी.रोड पर्यत तयार करणे, जुना रस्ता पूर्नपृष्ठीकरण करून गटार बांधणे, महादेव पार्क विश्वकर्मा आश्रम येथे गटार बांधणे. | रू.२५,८०,००० /- |
| ७४. | मिरा रोड शांती विहार १३, १४, १५, पूनमसागर, वृषभ, अस्मिता गार्डन, वसूंधरा ते ज्यूपीटर येथील रस्त्यावर डांबरीकरण करणे. | रू.४२,३९,९०० /- |
| ७५. | भाईदर (पू) शुभम अपार्टमेंट ते संजीवनी व रत्नसिंधू पर्यत सिमेंट कॉक्रिट रस्ता करणे. | रू.१,८०,००० /- |
| ७६. | भाईदर (प) सर्व्हे क्र.२७६ (५७४) ते २६८ (५७५) पर्यत डी.पी. रोड तयार करणे. | रू.२४,५०,००० /- |
| ७७. | भाईदर (पू) ओस्वाल टॉवर, डीवाईन हेरीटेज ते सुमन अपार्टमेंट पर्यत गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.१५,६७,४४० /- |
| ७८. | राई गांधी तलाव सुशोभिकरणाकरीता कुंपणभिंत बांधणे व इतर आवश्यक कामे करणे. | रू.४२,००,५०० /- |
| ७९. | मिरा रोड धरती कॉम्पलेक्स ते एन.एच.हायस्कूल पर्यत रस्ता करून गटार बांधणे. | रू.१४,९६,८०० /- |
| ८०. | मिरा रोड कानुंगो ते लोढा पार्क पर्यत रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे. | रू.३०,११,६०० /- |
| ८१. | मिरा रोड जीसीसी क्लब ते क्लब व्हयू ते क्लासीक सोनल पर्यत रस्ता तयार करणे. | रू.२०,४४,१०० /- |
| ८२. | भाईदर (पूर्व) काशिमिरा रोडवरील रेमंड शॉप येथील होली कॉम्पलेक्स ते वैभव पार्क पर्यतचा रस्ता खडीकरण करून डांबरीकरण करणे. | रू.४,९९,५५० /- |
| ८३. | भाईदर (पूर्व) कनकिया क्रॉस रोडवरील कोसमोस बिल्डींग ते शिवशक्ती कॉम्पलेक्स पर्यत रस्ता गटार तयार करणे. | रू.४,८९,९०० /- |
| ८४. | भाईदर (पूर्व) रामदेव पार्क येथील रामदेवपार्क रोड ते केनवूड पार्क रस्ता खडीकरण करून डांबरीकरण करणे. | रू.४,९६,७०० /- |
| ८५. | भाईदर (पूर्व) विकास इंडस्ट्रीयल इस्टेट येथिल एच.बी.आर. पॅकेजींग ते नाल्याकडील सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.४,९५,००० /- |
| ८६. | भाईदर (पूर्व) दत्तासदन अपाटमेंट ते महाराष्ट्र मित्र मंडळ पर्यत डांबरी रस्ता दुरूस्ती करणे. | रू.४,८४,९६० /- |
| ८७. | भाईदर (पूर्व) हनुमान मंदिर ते गोडदेव नाका, बी.पी. रोड, स्टेशन रोड डांबरी रस्ते दुरूस्ती करणे. | रू.२,२६,५३७ /- |
| ८८. | भाईदर (पूर्व) जेसलपार्क, आर.एन.पी. पार्क भागातील डांबरी रस्ते दुरूस्ती करणे. | रू.४,८५,००० /- |
| ८९. | भाईदर (पूर्व) प्रभाग क्र.८ कॉक्रिट रस्ते दुरूस्ती करणे. | रू.३,९०,००० /- |

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| ९०. | भाईदर (पूर्व) बंदरवाडी स्मशानभूमी ते नवघर क्रॉस रोड (आराधना इमारत) पर्यत सिमेंट कॉंक्रिट रस्त्याचे नुतनीकरण करणे. | रू.३,७५,१५०/- |
| ९१. | भाईदर (पूर्व) नवघर रोड वरील आराधना अपार्टमेंट मागील आराधना इंडस्ट्रीयल प्रिमायसेस रस्ता खडीकरण करून डांबरीकरण करणे. | रू.२,५५,५००/- |
| ९२. | भाईदर (पूर्व) गिरीष इस्टेट ते धीरज इस्टेट पर्यत सिमेंट कॉंक्रिट रस्ता करणे. | रू.१,९०,०००/- |
| ९३. | भाईदर (प) सुदामा नगर येथे बद्रीनाथ बिल्डींग ते बाबुलनाथ बिल्डींग पर्यत गटार बांधणे. | रू.३,३६,५००/- |
| ९४. | भाईदर (प) सुदामा नगर येथे केदारनाथ ते शंभुनाथ बिल्डींग पर्यत गटार बांधणे. | रू.३,३६,५००/- |
| ९५. | भाईदर (प) शास्त्रीनगर येथे सुरेश फोम ते रमजान यांच्या घरापर्यत गटार बांधणे. | रू.२,०१,१००/- |
| ९६. | भाईदर (प) येथे माच्छी सुदेश यांच्या घरासमोरील गटार बनविणे. | रू.४,८९,०००/- |
| ९७. | उत्तन अलिबाग येथे गटार दुरूस्ती करणे. | रू.५,००,०००/- |
| ९८. | उत्तन इंदिरानगर येथे साईमंदिर ते राजेश सातपुते यांच्या घरापर्यत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.३,४२,०००/- |
| ९९. | राई शिवनेरी येथे धनेश्वर गणपत म्हात्रे ते शशीबाई भावसर यांच्या घरापर्यत गटारावर स्लॅब टाकणे. | रू.१,१३,०००/- |
| १००. | भाईदर (प) बालाजीनगर (शेख इस्माईल मार्ग) गटारावर स्लॅब टाकणे. | रू.३,४८,०००/- |
| १०१. | भाईदर (प) गंगाविहार ते मेहता पटेल शॉपिंग सेंटर पर्यत गटार बनविणे. | रू.४,८४,१००/- |
| १०२. | भाईदर (प) मधु अग्रवाल रोड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग (६० फुटी रोड) ते राणी लक्ष्मीबाई उद्यानापर्यत गटार बांधणे. | रू.३,३६,०००/- |
| १०३. | भाईदर (प) शास्त्रीनगर व नेहरूनगर येथे चॅनल गटार बनविणे. | रू.४,५४,५००/- |
| १०४. | भाईदर (प) अशोक सम्राट बिल्डींग ते सोना बिल्डींग पर्यत गटार बनविणे. | रू.३,३६,०००/- |
| १०५. | भाईदर (प) मिना बाजार येथे सी.सी. रस्ता बनविणे. | रू.२,१३,८००/- |
| १०६. | चौक येथे आलीनच्या बंदरावर सी.सी. वॉल व पाय-या बनविणे. | रू.१,५०,०००/- |
| १०७. | डोंगरी येथे डायगो नुनीस ते जॉन्सन निग्रेल यांच्या घरापर्यत सी.सी. रस्ता बनविणे. | रू.५,००,०००/- |
| १०८. | चौक येथील यु टर्न रिसॉर्ट समोरील रस्ता बनविणे. | रू.१,७०,०००/- |
| १०९. | भाईदर (प) आंबेडकर नगर येथे सी.सी. रस्ता तयार करून गटार बांधणे. | रू.३,००,०००/- |
| ११०. | उत्तन येथे देवतलावास ग्रिल बसविणे. | रू.३,००,०००/- |
| १११. | उत्तन येथे देवतलावात लॅडस्केपींग करणे. | रू.२,००,०००/- |
| ११२. | डोंगरी धारावी मंदिर येथे संरक्षक भिंत बांधून मातीभराव करणे. | रू.३,००,०००/- |
| ११३. | डोंगरी धारावी मंदिर येथे लॅण्डस्केपींग करणे. | रू.२,००,०००/- |
| ११४. | उत्तन येथे मोहतलाव लाल माती टाकणे. | रू.१,००,०००/- |
| ११५. | भाईदर (प) साईबाबा गार्डन उद्यानामध्ये लॅडस्केपींग करणे. | रू.२,००,०००/- |
| ११६. | भाईदर (प) प्रभाग क्र.१६ मधील डॉन बॉस्को शाळेजवळ गटार बांधणे. | रू.४,७६,४००/- |
| ११७. | भाईदर (प) व्यंकटेश प्लाझा बिल्डींग समोर क्रॉस ड्रेन बांधणे. | रू.१,०१,६००/- |
| ११८. | भाईदर (प) नारायण नगर साई निकेतन गार्डन व्हयू पर्यत गटार बांधणे. | रू.८,८७,५५०/- |

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| ११९. | उत्तन चर्च चार्ली प्रिंटींग प्रेस ते पॉल डिसुझा यांचे घरापर्यत गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.६,00,000/- |
| १२0. | उत्तन येथे वॉल कुटिनो यांचे घरापासून ते कुंभारवाडा शौचालयापर्यत गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.६,00,000/- |
| १२१. | भाईदर(प) विनायक मंदिर मार्ग प्रभाग क्र.८ मधील नंदूसदन बिल्डींग ते हनुमान नगर झोपडपट्टी पर्यत गटार बांधणे व फुटपाथ तयार करणे. | रू.८,0६,८५0/- |
| १२२. | भाईदर(प) विनायक मंदिर मार्ग, विनायक मंदिर ते हिंगलाज बिल्डींग पर्यत नविन गटार बनविणे. | रू.८,0६,८५0/- |
| १२३. | मोर्वा येथे पांडुरंग म्हात्रे ते मनीलाल पाटील यांच्या घरापर्यत गटार दुरूस्ती करून स्लॅब टाकणे. | रू.६,३0,000/- |
| १२४. | उत्तन येथे भातोडी बंदर ब्रीजच्या बाजुला सी.सी. वॉल बांधून मातीभराव करणे. | रू.६,४0,000/- |
| १२५. | चौक येथे जॉन गुलाम यांच्या घरापासून फर्नांडीस यांच्या घरापर्यत संरक्षक भिंत बांधणे. | रू.५,५0,000/- |
| १२६. | भाईदर(प) राव तलावात फाउंटन बसविणे. | रू.६,00,000/- |
| १२७. | भाईदर(प) प्रभाग क्र.१९ पातान बंदर येथील अंतर्गत रस्ते सी.सी. करणे. | रू.९,९0,000/- |
| १२८. | चौक येथे पिटर कोंतिया यांच्या घरापासून ते रॉकी मुंबईकर यांच्या घरापर्यत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.५,७0,000/- |
| १२९. | भाईदर(प) नारायणनगर क्रॉस रोड नं.२ येथे गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.६,६५,६५0/- |
| १३0. | भाईदर(प) स्मशानभूमीत आर.सी.सी. कुंपणभिंत बांधणे. | रू.८,७५,000/- |
| १३१. | प्रभाग क्र.२५ मधील गोल्डन नेस्ट परीसरातील डांबरी रस्ते दुरूस्ती करणे (पॅच वर्क) | रू.१२,४२,३00/- |
| १३२. | प्रभाग क्र.२५ मधील गणपती मार्वल्स च्या बाजूने शांती आशिष कडे जाणारा रस्ता तयार करणे. | रू.२,३६,१५0/- |
| १३३. | भाईदर(पू) कनकीया रोडवर लक्ष्मी पार्क समोरील रस्ता दुरूस्ती करणे. | रू.९,९0,000/- |
| १३४. | भाईदर(पू) रवि इंडस्ट्रीयल इस्टेट सी.सी. रस्ते करणे. | रू.७,८0,५३0/- |
| १३५. | सोलंकीपार्क ते नवघर हनुमान मंदिर गटारावर स्लॅब टाकणे. | रू.१,१२,0२0/- |
| १३६. | श्रध्दा सरोवर ते राधा कॉम्पलेक्स गटार खोल करून स्लॅब टाकणे. | रू.५,९२,६00/- |
| १३७. | नवघर गांवदेवी पटांगणात डांबरीकरण करणे. | रू.४,0६,९५0/- |
| १३८. | नवघर गांव ते घोडबंदर क्रॉस रोड दरम्यान रस्ता बनविणे. | रू.६,७४,७00/- |
| १३९. | नवघर गावातून उघाडीकडे जाणा-या रस्त्यालगत गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.६,0८,६00/- |
| १४0. | गोडदेव येथिल कमली निवास(विठ्ठल मंदिर) ते शेवंते चाळ गटारावर स्लॅब टाकणे. | रू.१,00,000/- |
| १४१. | सेनानगर गटारावर जाळी टाकून रस्ता सी.सी. बनविणे. | रू.२,३६,७00/- |
| १४२. | नवघर दत्तमंदिर ते रामेश्वर नगर रस्ता डांबरीकरण करणे. | रू.१,९६,८00/- |
| १४३. | शिर्डीनगर साईराज्य इमारत ते नवघर फाटक रोड पर्यत गटार खोल करून स्लॅब टाकणे. | रू.४,0५,८00/- |
| १४४. | राधा कॉम्पलेक्स ते पाणटेकडी रोड लगतच्या गटारावर स्लॅब टाकून जाळी बसविणे. | रू.२,२१,८५0/- |
| १४५. | भाईदर पूर्व गोडदेव गावातील अभीनव शाळेच्या गेटपासून फाटक रोड पर्यत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.४,0५,७५0/- |

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १४६. | भाईदर पूर्व आझाद नगर मधील गल्ली मधील सी.सी. पाथवे तयार करणे. | रू.३,४५,५00/- |
| १४७. | भाईदर पूर्व येथिल इंदिरानगर येथे उघाडी व एस.व्ही. रोड पाथवे क्रॉस ड्रेन व शिवार गार्डन दुरूस्ती करणे. | रू.६,0१,३५0/- |
| १४८. | भाईदर पूर्व, नवघर, चाळघर, घोडबंदर येथिल उघाडीचे तुटलेले दरवाजे नविन बसविणे. | रू.१,८२,६५0/- |
| १४९. | भाईदर पूर्व प्रभाग क्र.२३ मधील कबिन नाका ते हेम कुंज पर्यतचा डांबरी रस्ता दुरूस्ती करणे. | रू.७,६८,३५0/- |
| १५0. | राष्ट्रीय महामार्ग क्र.८ वरील प्रभाग क्र.११ मध्ये कमलेशनगर जवळ मिरा को.ऑ.हौ.सो. ते हायवे सर्वीस रोड नाल्यापर्यत सी.सी. गटार बांधणे. | रू.४,९९,९६६/- |
| १५१. | राष्ट्रीय महामार्ग क्र.८ वर प्रभाग क्र.१३ मध्ये मिरागांव येथे जीनगर, मास्जीद लगत सर्वीस रोडवर, रामतीर्थ, मुन्शी कंपाउंड पेट्रोल पंप पर्यत गटार दुरूस्ती करणे. | रू.९,९६,000/- |
| १५२. | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर सुंदर दर्शन सिल्व्हर प्लाझा ते भक्ती पर्यत तसेच कनकीया रोडवर सुंदर सागर रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे व गटार बांधणे. | रू.३५,५0,000/- |
| १५३. | मिरा रोड पार्श्व नगर ते एन.एच.हायस्कूल रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे. | रू.३५,८२,000/- |
| १५४. | शांतीपार्क येथील डांबरी रस्ते दुरूस्ती करणे. | रू.९,१२,२00/- |
| १५५. | मिरा रोड सिल्व्हर पार्क ते जांगीड सर्कल पर्यत) गटार बनविणे. | रू.१२,५३,८५0/- |
| १५६. | भाईदर(प) येथील महेश नगर १ बिल्डींग ते नालंदा ए बिल्डींगपर्यत गटार बांधणे. | रू.१५,१२,९00/- |
| १५७. | भाईदर(प) मिना मेन्शन ते चंद्रलोक बिल्डींग पर्यत गटार बांधणे. | रू.११,0९,५00/- |
| १५८. | भाईदर(प) येथे क्रॉस गार्डन ते मोनार्क अपार्टमेंट पर्यत गटार बांधणे. | रू.१0,६६,६00/- |
| १५९. | भाईदर(प) येथे घनकृष्णा बिल्डींग ते क्रॉस गार्डन पर्यत गटार बांधणे. | रू.१0,६६,६00/- |
| १६0. | राई येथे शिवसेना शाखे समोरील नाला बनविणे. | रू.३0,00,000/- |
| १६१. | मुर्धा सदानंद नगर येथे साईराम डेअरी ते पाटील किराणा स्टोअर्स पर्यत गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.१४,५0,000/- |
| १६२. | भाईदर(प) महाराज अग्रसेन मार्ग साईनिकेतन ते साईबाबा गार्डन पर्यत गटार बांधणे. | रू.७,२५,000/- |
| १६३. | मुर्धा येथे मुर्धा रेवआगार येथे नाला बनविणे. | रू.८७,५0,000/- |
| १६४. | भाईदर(प) जयप्रकाश नरायण रोड येथील रेड रोज ते जोशी निकेतन पर्यत गटार बांधणे. | रू.११,९0,५00/- |
| १६५. | भाईदर(प) जयप्रकाश नारायण रोड येथील प्रकाशभवन बिल्डींग ते सुदामा टॉवर पर्यत गटार बनविणे. | रू.१२,१0,३00/- |
| १६६. | भाईदर(प) जय अंबे नगर नं.१ झोपडपट्टी येथील सागर बेकरी ते सार्व जनिक शौचालय पर्यत नाला बांधणे. | रू.२३,८६,५00/- |
| १६७. | भाईदर(प) फकरी कॉलनी ते जय अंबे नगर(मोती नगर) पर्यत गटार बांधणे. | रू.१६,७0,५५0/- |
| १६८. | भाईदर(प) स्टेशन रोड वेलंकनी हायस्कूल ते साइबाबा झोपडपट्टी पर्यत नाला बांधणे. | रू.६८,१८,३00/- |
| १६९. | भाईदर(प) उत्तन गुलाम एस.टी.डी. ते दिपसागर इमारतीपर्यत गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.१३,२५,000/- |

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १७०. | भाईदर (प) येथील भोलानगर मंदिर ते तोदीभवन पर्यत रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार बांधणे. | रू.२२,४३,५००/- |
| १७१. | भाईदर (प) महाराजा अग्रसेन मार्ग येथील नंदूसदान ते साईबाबा मंदिर पार्यत गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.११,०९,५००/- |
| १७२. | उत्तन येथे शिरेगांव ते वेलंकनी चर्च पर्यत सी.सी. रस्ता बनविणे. | रू.१४,५०,०००/- |
| १७३. | राई येथे बादशहा इंडस्ट्रीच्या समोरील रस्ता खडीकरण करून डांबरीकरण करणे. | रू.२४,००,०००/- |
| १७४. | उत्तन येथील भाटेबंदर रोडचा चढ कमी करून खडीकरण व डांबरीकरण करणे. | रू.१५,००,०००/- |
| १७५. | भाईदर (प) येथील पोद्दार हायस्कूल मार्ग येथील अंतर्गत रस्त्याचे पुर्न पृष्ठीकरण करणे. | रू.१७,७२,३५०/- |
| १७६. | भाईदर (प) सिध्दीविनायक मार्ग व अंतर्गत रस्त्याचे पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रू.१५,०५,६००/- |
| १७७. | भाईदर (प) महाराणा प्रताप रोड पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रू.६,५४,०००/- |
| १७८. | भाईदर (प) राममंदिर रस्त्याचे पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रू.३,४१,६००/- |
| १७९. | भाईदर (प) गणेश देवल नगर ब्रीज ते वसई खाडी पर्यत नाला बांधणे. | रू.२५,००,०००/- |
| १८०. | भाईदर (प) टेंभा हॉस्पीटल ते स्मशानभूमीपर्यत रस्त्याच्या कडेला दोन्ही बाजुस गटार बांधणे. | रू.५४,८८,१००/- |
| १८१. | भाईदर (प) अभिनव बिल्डींग ते ओम मंदिर बिल्डींग पर्यत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे. | रू.३,५०,०००/- |
| १८२. | पेणकरपाडा येथे निर्वादेवी मंदिर परिसरात सी.सी.पाथवे करणे. | रू.५,००,०००/- |
| १८३. | राष्ट्रीय महामार्ग क्र.८ वरील जनता नगर मांडवी पाडा परिसरात सी.सी. पाथवे करणे. | रू.९,९३,०००/- |
| १८४. | भाईदर पूर्व त्रिलोक दर्शन ते लता अपार्टमेंट, रूक्मीणी अपार्टमेंट ते लता ए व बी (शिवशक्ती धाम मंदीर) रस्ता पुर्नपृष्ठीकरण करणे. | रू.२५,००,०००/- |
| १८५. | भाईदर पूर्व डिव्हाईन हिम ते गीरीकुंज पर्यत रस्ता डांबरीकरण करणे. | रू.१२,५०,०००/- |
| १८६. | खारीगावातील सिमेंट कॉक्रिट रस्ते तयार करणे. | रू.१५,००,०००/- |
| १८७. | भाईदर (प) प्रभाग क्र.१७ मधील दादासाहेब दामले मार्ग येथे सी.सी. रस्ता तयार करणे. | रू.१,७२,२००/- |
| १८८. | भाईदर (प) प्रभाग क्र.१७ मधील दादासाहेब दामले मार्ग येथे सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.३,२४,५००/- |
| १८९. | भाईदर (प) येथील अवर लेडी ऑफ नाझरेथ चर्च मार्ग मुख्य रस्त्यापासून फकरी कॉलनी मोतीनगर ते जय अंबे माता मंदिर ते राजेश हॉटेल पर्यत रस्त्याचे पुर्नपृष्ठीकरण करणे. | रू.२१,८४,०००/- |
| १९०. | भाईदर (प) येथील देवचंद्र जेठालाल संघवी क्रॉस रोड येथील आकाशगंगा, बिजली बिल्डींग ते तिर्थकार बिल्डींग पर्यर सी.सी.गटार बांधणे व स्लॅब टाकणे. | रू.२,७०,५००/- |
| १९१. | भाईदर (प) देना बॅक व्यापारी लेन ते शंकर मंदिर पर्यर रस्त्याचे पुर्न ःपृष्ठीकरण करणे. | रू.४,५०,०००/- |
| १९२. | भाईदर (प) येथील फकरी कॉलनी व सकीना, गोदावरी व लक्ष्मी इंडस्ट्रीयल इस्टेट व अण्णा नगर येथे चॅनल गटार बनविणे. | रू.३,६०,०००/- |
| १९३. | उत्तन इंदिर नगर येथे सातपुते व पद्मा शेट्टी यांच्या घराजवळ संरक्षक भिंत बांधणे. | रू.१,८५,०००/- |

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १९४. | भाईदर(प) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गाच्या दोन्ही बाजुस गटार बांधून पाथवे तयार करणे. | रू.१,३३,५0,000/- |
| १९५. | भाईदर(प) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रू.५२,६0,000/- |
| १९६. | पाली येथे पाली बिच रिसॉर्ट ते पेट्रोलपंप पर्यत रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रू.१५,३१,000/- |
| १९७. | भाईदर(प) लाल बहादूर शास्त्री नगर येथील विठ्ठल कदम ते सुरेश कानु यांच्या घरापर्यत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.७,२१,५00/- |
| १९८. | भाईदर(प) नेहरू नगर येथील राधाबाई कांबळे ते हरिश्चंद्र चंदनशीव यांच्या घरापर्यत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.३,२४,५00/- |
| १९९. | भाईदर(प) रेल्वे समांतर रस्ता ते तोदीभवन पर्यत डी.पी. रस्त्याच्या दोन्ही बाजूस नाला बांधणे. | रू.८0,00,000/- |
| २00. | भाईदर (पूर्व) केबिन रोड (रेल्वे समांतर) डांबरीकरण करणे. | रू.१८,५0,000/- |
| २0१. | भाईदर(प) गौतम रोड खोदुन खडीकरण व डांबरीकरण करणे. | रू.३,२२,५00/- |
| २0२. | भाईदर(प) सदासत्य अपार्टमेंत जवळ गटार बांधणे. | रू.५,५१,५00/- |
| २0३. | भाईदर(प) महाराजा अग्रसेन रोड खोदुन खडीकरण व डांबरीकरण करणे. | रू.१२,0२,७00/- |
| २0४. | भाईदर(प) जमुनाबाई ठाकूर मार्ग खडीकरणअ करून डांबरीकरण करणे. | रू.८,६0,५00/- |
| २0५. | भाईदर(पूर्व) उड्डाणपूलाखालील जागेत मातीभराव रस्ता तयार करून कुंपण गेट बाधणे. | रू.९,५0,000/- |
| २0६. | उत्तन भाटेबंदर येथे शौचालय बांधणे. | रू.३,00,000/- |

डी.पी. रोड

| | | |
|---|---|---|
| २0७. | रॉयल कॉलेज ते मिरा औदयोगीक वसाहत राष्ट्रीय महामार्ग क्र.८ कडे जाणारा रस्ता तयार करणे. दोन्ही बाजूस गटार बांधणे.(३0.00 मी. रूंद) | रू.२,0५,१३,२00/- |
| २0८. | आरक्षण क्र.५७ (एस.टी.डेपो) ते स्टेडीयम आरक्षण क्र.९१ पर्यत ३0.00मी. रूंदीचा डी.पी. रोड तयार करणे करीता मातीभराव करून रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे, दोन्ही बाजुस गटारे बांधणे. | रू.९,१३,२८,१00/- |
| २0९. | भाईदर(प) रेल्वे समांतर उड्डाणपूल ते आरक्षण क्र.१३९ पर्यत ३0.00 मी रूंदीचा डी.पी. रोड तयार करणे करीता मातीभराव करणे व गटार बांधणे. | रू.१0,६६,७९,६00/- |
| २१0. | भाईदर पूर्व उड्डाणपूल ते नयानगर कडे जाणारा ३0.00 मी. डी.पी. रोड तयार करणे व डीव्हायडर बसविणे गटार बांधणे. | रू.२,७२,0६,८५0/- |
| २११. | भाईदर पूर्व जेसल पार्क ते घोडबंदर कडे जाणारा (खाडीलगत असलेला) डी.पी. रोड तयार करणे करीता मातीभराव, खडीकरण डांबरीकरण करणे व संरक्षक भिंत बांधणे. | रू.१७,५0,00,000/- |
| २१२. | भाईदर पूर्व उड्डाणपूल जंक्शन (गोल्डन नेस्ट ते खाडीपर्यत) ते जेसलपार्क रस्त्यापर्यतचा रस्ता ३0.00 मी. पर्यत रूंद करून तयार करणे, नाला बांधणे. | रू.६,७0,0२,३३0/- |
| २१३. | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग ते कनकीया कडे जाणारा ३0.00 मी. रूंदीचा उर्वरीत डी.पी. रोड खाडीपर्यत (जेसलपार्क घोडबंदर रस्त्यापर्यत) तयार करणे करीता मातीभराव करणे, खडीकरण डांबरीकरण करणे व गटार बांधणे. | रू.६,२६,५८,000/- |

| | | |
|---|---|---|
| २१४. | हटकेश उदयोग नगर येथून घोडबंदर जेसलपार्क रस्त्यापर्यत जाणारा ३०.०० मी. डी.पी. रोड तयार करणे, गटार बांधणे. | रू.५,२०,७१,५५०/- |
| २१५. | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग सर्व्हे क्र.४७९ ते सर्व्हे क्र.२९२ पर्यत जाणारा१८.०० मी. रूंदीचा डी.पी. रस्ता तयार करणे, गटार बांधणे. | रू.३,१८,८१,३५०/- |
| २१६. | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग पासून प्लीझंट पार्क ते मिरा गाव हायवेपर्यत ३०.००मी. रूंदीचा डी.पी. रोड तयार करणे करीता मातीभराव करणे खडीकरण, डांबरीकरण करणे व गटार बांधणे. | रू.५,०१,३९,८००/- |
| २१७. | भाईदर पूर्व पांचाळनगर गॅस गोडाऊन ते गोल्डन नेस्ट डी.पी. रोड पर्य त रस्ता तयार करणे, गटार बांधणे. | रू.५८,६४,३००/- |

वरील सर्व कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर कामी होणारा खर्च सन २००४-०५ व उर्वरीत खर्च सन २००५-०६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतूद करून करण्यात यावा. वरील पैकी रस्ते व डी.पी. रस्त्यांच्या जागा वेळोवेळी वाटाघाटी व्दारे किंवा भूसंपादानाने ताब्यात घेण्यात येऊन कामे करण्यात यावीत. तसेच डी.पी. रस्त्याकरीता शासकीय/निमशासकीय व इतर वित्तिय संस्थांकडून कर्ज उपलब्ध करून घेण्यास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच वरील कामापैकी सुरू वर्षात करावयाच्या कामाबाबत मा.स्थायी समितीच्या सभेपुढे ठेऊन प्राधान्य यादी ठरवून उपलब्ध तरतूदीनूसार कामांच्या निविदा मागविण्यात याव्यात.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत वैती.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ६ चे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छितो, मिरा भाईंदर शहरामध्ये आपण विविध रस्त्यांना जी नावे दिलेली आहेत, ती सर्व नावे आपण या सभागृहापुढे आणून ती मंजूर करून आज मिरा भाईंदर शहरातील सर्व रस्त्यांना नावे दिलेली आहेत आणि चांगले काम या मिरा भाईंदर महानगरामध्ये झालेले आहे. आतासुद्धा आपल्याकडे हा विषय आलेला आहे. या विषयामध्ये काही सन्मा. सदस्यांनी काही संस्थेनी नावे सुचविलेली आहेत. परंतु प्रशासनाला मला या विषयी एक सुचना करायची आहे आणि विनंती करायची आहे की, आपण जी नावे दिलेली आहेत, ती नावे ज्या भागातील रस्त्यांना द्यायची असतील आणि जी काही संस्थेने नावे दिलेली आहेत ती काही नावे त्या-त्या विभागातील नगरसेवकांना पण माहिती नाहीत. तर कृपया आपण सर्व सदस्यांना या पद्धतीचे आपण पत्र द्यावे की, आपल्या ज्या शहरामध्ये जे असे रस्ते असतील, मुख्य गार्डन्स असतील, चौक असतील अशा ठिकाणी जी नावे द्यायची असतील तर तसे पत्र प्रशासनाने संपुर्ण नगरसेवकांना द्यायला पाहिजे आणि ते द्यावे जेणेकरून आपण त्यांची नावे व त्याची सुचना आपण घ्याव्या आणि एकत्रित हा विषय पुन्हा पुढच्या सभेला आणावा असे मी या ठिकाणी सुचवित आहे. धन्यवाद

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापौर मॅडम, असे पत्र सर्व नगरसेवकांना आलेले आहे.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी जी सुचना केली. त्या सुचनेला मी अनुमोदन देत आहे. हा विषय पुढे घ्यावा.

**रतन पाटील :-**

असे पत्र महापालिकेला पाठविले होते. तेव्हाच या सुचना दिलेल्या आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापालिकेने पत्र पाठविले म्हणूनच ते सुचनेमध्ये आलेले आहे.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील यांना माहिती नसेल

**मिलन पाटील :-**

ज्या रस्त्यामध्ये ज्या भूमिहिनाच्या जागा गेल्या असतील त्याचा विचार पुर्ण करावा. ज्याच्या जागा गेल्या असतील त्याच्या नावाचा पुर्ण विचार करावा. अन्यथा दुसऱ्या कोणाचा विचार करू नये.

**परशुराम पाटील :-**

सन्मा सदस्य मिलन पाटील जे काही बोलले त्याच्याशी मी सहमत आहे.

**रोहित सुवर्णा :-**

महापौरजी, इस विषय मे बोलना चाहता हूँ। महानगरपालिकाने अभी तक डी.पी. रोड ॲक्वायर किया है क्या? ॲक्वीझिशन करने से पहले ही आप रोड का एस्टीमेंट कर रहे है।

**मा. महापौर :-**

वापस विषय आनेवाला है। ये विषयमे कुछ नही करना है।

**रोहित सुवर्णा :-**

लेकीन आप उनको डायरेक्शन दिजिए की, पहले उन्होने कितने रोड का ॲक्विझिशन किया। ॲक्विझिशन नही किया और हम लोग रोड को बनाने जा रहे है। और हम ऐसा करेंगे तो ये कायदे के बाहर होगा।

**प्रकरण क्र. ६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध रस्त्यांना नावे देण्याबाबत आलेल्या प्रस्तावाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणेबाबत.

**ठराव क्र. ८ :-**

मिरा-भाईदर महानगरपालिका हद्दीतील विविध रस्त्यांना नावे देण्याबावत मा.स्थायी समिती सभा दि.0६.१0.२00१, ठराव क्र.२६३ अन्वये निर्णय झाल्यानूसार रस्त्याचे नामकरण करण्यात आलेली आहेत. सदर नामकरणाव्यतिरीक्त उर्वरीत रस्त्यांना नावे देण्याबावत महानगरपालिकेकडे प्रस्ताव आलेले आहेत. सदर प्रस्ताव खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | रस्त्याचे ठिकाण | सुचविलेले नाव |
|---|---|---|
| १. | डॉ. हेडगेवार मार्ग साई पेट्रोलपंप शेजारील रस्ता (पार्श्वनगर) | मारूती लेन |
| २. | डॉ. हेडगेवार मार्ग पेट्रोलपंप शेजारील रस्ता (गीता नगर ते सनरॉक पर्यत) | डॉ. श्यामप्रसाद मुखर्जी मार्ग |
| ३. | हरेकृष्ण मंदिर समोरील रस्ता शांती नगर | स्वामी भक्तीवेदांत मार्ग |
| ४. | सेक्टर २, ७ मधील चौक | प्रमूख स्वामी महाराज मार्ग |
| ५. | भाईंदर (प) वालचंद्र कॉम्प्लेक्स ते शंकर मंदिर व पुढे उड्डाणपूल पर्यतचा रस्ता | श्री. भगवान सिमंधर स्वामी मार्ग |
| ६. | भाईंदर (प) देवचंदनगर क्रॉस आकाशगंगा व देवचंद नगर चाळ इमारतीकडून तिर्थकार सदर, प्रार्थना पूजा इमारती कडे जाणारा रस्ता | ब्रम्हकुमारी मार्ग |
| ७. | भाईंदर (प) तेंडुलकर सदन ते दत्त मंदिर रस्ता | श्री. दत्त मंदिर लेन |
| ८. | मिरा रोड शांती पार्क, सेंट झेव्हीअर्स हायस्कूकल रस्ता | ब्रम्हकुमारी मार्ग |
| ९. | भाईंदर पूर्व चौपाटी | कुरूक्षेत्र चौपाटी |
| १0. | डॉ.हेडगेवार मार्गावरील सुदामा इंडस्ट्रियल इस्टेट, गौरव धर्म काटाच्या बाजूने साई इस्टेट कडे जाणारा रस्ता | राष्ट्रवीर महाराजा सुहेल देवजी राजभर मार्ग किंवा चौक<br>स्वर्गीय श्रीकांत केशव ठाकरे मार्ग |
| ११ | दया सागर इस्तेट रस्ता (मिलन पॅलेस शेजारील) | राष्ट्रवीर महाराजा सुहेल देवजी राजभर मार्ग किंवा चौक |
| १२ | भाईंदर पूर्व कृष्णा पार्क ते श्रीचंद्रलोक व साई टॉवर (१२ इमारती) | डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले किंवा महात्मा गांधी मार्ग |

| | | |
|---|---|---|
| १३ | कस्तूरी ॲव्हेन्यू व सोनल को.ऑ.हौ.सो. लि. समोरील चौक | आर.एन.पी.पार्क एकता चौक |
| १४ | शांतीनगर सेक्टर ६ मधील रस्ता (मंदिर जवळ) | पूज्य श्री प्रसन्न मुनी महाराज मार्ग |
| १५ | भाईदर (प) क्षिरसागर हॉटेल जवळील चौक | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक |
| १६ | बी.पी. रोड ते दिपक नगर गल्ली | सर्व सिध्दी गणेश मंदिर मार्ग |
| १७ | परब मसाले ते पाटील उदयोगनगर | आनंदी इस्टेट मार्ग |
| १८ | बी.पी.रोड (दक्षिण) शीतल शॉपिंग सेंटर ते महावीर अपार्टमेंट | श्री. भक्ती पथ |
| १९ | केबिन रोड ते दिपक नगर | रावळ पथ |
| २० | गणेश को.हौ.ते साई करिश्मा, जय भवानी अपार्टमेंट | पोस्ट ऑफिस मार्ग |
| २१ | अशोक हॉटेल ते गुलाम रसूल पटेल घरापर्यतचा रस्ता | विठ्ठल मंदिर मार्ग |
| २२ | बाळकृष्ण ज्योत, तलाव रोड, रस्ता | सिध्देश्वर महादेव नगर |
| २३ | राईगांव नाटयमंच | परमपूज्य कै.वैजनाथ हरीश्चंद्र पाटील उर्फ मोठेबाबा नाटयमंच, राईगांव |
| २४ | नाकोडा हॉस्पीटल लेन, भाईदर (प) | गुरूश्री राजेंद्र सुरी मार्ग |
| २५ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड व छत्रपती शिवाजी महाराज मार्ग चौक | श्री.संत खेतेश्वर चौक |
| २६ | नारायण नगर क्रॉस रोड दिवाकर भवन ते सुदामा टॉवर | श्री.नाकोडा पार्श्वनाथ मार्ग |
| २७ | महाराणा प्रताप व मोदी पटेल क्रॉस रस्त्यास व चौकास | श्री.बाप्पा सिताराम मार्ग |
| २८ | ९० फुटी रजिस्ट्रेशन कार्यालयासमोरील चौक | श्री.रूपमुनी महाराज चौक |
| २९ | महाजनवाडी, काशिमिरा | डॉ. राजेंद्र प्रसाद |
| ३० | सोनाली हॉटेल ते निलम पार्क पूतानगर रस्ता | पुण्यश्लोक महाराणी अहिल्यादेवी होळकर मार्ग |
| ३१ | काशिगाव शिवाजी महाराज चौक पाठून जाणारा रस्ता | श्री.विठ्ठल रूक्मीणी मंदीर मार्ग |
| ३२ | भाईदर (पू) खारीतलाव रोडला क्रॉस जवाहर व अमृत नगर मधील रस्ता | सिध्देश्वर मंदीर मार्ग |
| ३३ | नुपूर नगर मधील भारती पार्क पर्यतचा रस्ता | नुपूर नगर मार्ग<br>अंबा माता मार्ग |
| ३४ | सॉल्ट ऑफिस कडून पादचारी पूलाकडे जाणारा डी.पी. रोड | स्व.मालचंद लादूराम गाडोदिया |
| ३५ | पेणकर पाडा दत्तमंदिर खालचा पाडा, | दत्तमंदिर मार्ग |
| ३६ | पेणकरपाडा वर्तक अळी रस्ता | कै.जगन्नाथ वर्तक मार्ग |
| ३७ | मुन्शी कंपाउंड रस्ता (पेट्रोल पंप शेजारील) | कै.बुधु चांगो भोईर<br>कै.बाळकृष्ण जिवन राऊत मार्ग |
| ३८ | मिरागांव हनुमान मंदिर समोरील दोन रस्ते | हनुमान मंदिर मार्ग |
| ४९ | निलवसुंधरा ड्रीमलॅड मार्गे, गोकुळधाम शाम कॉम्पलेक्स | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मार्ग |
| ४० | बंदरवाडी गावदेवी मंदिर रस्ता | श्री.गावदेवी मंदिर मार्ग |
| ४१ | आर.एन.पी. पार्क व राहुल पार्क अपर्णा बिल्डींग रस्ता | मारूती मंदिर मार्ग |
| ४२ | जरीमरी तलाव ते ग्रीन व्हिलेज पर्यत | गावदेवी मंदिर मार्ग |
| ४३ | साईकृपा गेट ते शैलेश बिल्डींग पर्यत | साईकृपा कॉम्पलेक्स |
| ४४ | कब्रस्तान ते डोंगरी | जनतानगर मार्ग |
| ४५ | सेंट झेवियर्स हायस्कूल ते मांडवीपाडा | मांडवीपाडा मार्ग |
| ४६ | अंगणवाडी ते माशाचा पाडा पर्यत | माशाचापाडा रोड |

| | | |
|---|---|---|
| ४७ | बस्तानवाडी ते भटाचापाडा पर्यत | मिनाक्षी नगर मार्ग (भटाचा पाडा) |
| ४८ | नॅशनल हायवे लगत गॅरेज ते डाचकुलपाडा | डाचकुलपाडा मार्ग |
| ४९ | नॅशनल प्लास्टीक कंपनी ते बाभळीचा भाट नं.२ | बाभळीचा भाट नं.२ मार्ग |
| ५० | भारतीय स्टेट बॅंक ते बाभळीचा भाट नं.१ | बाभळीचा भाट नं.१ मार्ग |
| ५१ | गावठण ते चेकनाका | श्री.महाविष्णू मार्ग |
| ५२ | गोवळा देव मंदिर ते पर्यटक निवासाकडे जाणारा रस्ता | घोडबंदर किल्ला मार्ग |
| ५३ | शंकर मंदिर ते जुन्या रेशन दुकानाकडे जाणारा रस्ता | स्व.भालचंद्र नानाशंकर शेठ मार्ग |
| ५४ | हॉटेल हिल व्हयू ते चेणे गावात जाणारा रस्ता | स्व.नारायण दिनानाथ वेलकर मार्ग |
| ५५ | राई स्टॉप पासून रे राई गांवात | श्री.सदानंद महाराज मार्ग |
| ५६ | नविन रस्ता समाधी पासून ते राम मंदिरापर्यत | कै.यशवंत मास्तर मार्ग |
| ५७ | कै.हरकुबाई घरापासून ते सोसायटी पर्यत | श्री.राम मंदिर मार्ग |
| ५८ | सदानंद वामनच्या घरापासून ते डपका आळी पर्यत | गावदेवी मार्ग |
| ५९ | नविन तलावापासून ते खालच्या आळी चाफेकर घरापासून | जांबुळपाडा मार्ग |
| ६० | शिवसेना शाखा उघाडपासून गटारालगत रस्त्याला ते शेवट रमेश गणपत पाटील यांच्या घरापर्यत | प.पु.पांडुरंग शास्त्री आठवले मार्ग |

प्रशासनामार्फत सर्व नगरसेवकांना पत्र देऊन त्यांच्या मार्फत नामकरण प्रस्ताव मागवून वरील प्रस्तावासह आलेले सर्व प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मंजूरीसह मा.महासभेपुढे सादर करण्यात यावे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत वैती.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

( प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ७ चे वाचन केले )

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण क्र. ७ भाईंदर पुर्व व पश्चिम मुख्य पाईप लाईन जोडण्यासाठी रेल्वेमार्ग छेदून टाकावयाच्या पाईप लाईनला मंजुरी देण्याबाबत (ठरावाचे वाचन केले)

**दिनेश नलावडे :-**

मी अनुमोदन देत आहे.

**प्रकरण क्र. ७ :-**

भाईंदर पूर्व व पश्चिम मुख्य पाईप लाईन जोडण्यासाठी रेल्वे मार्ग छेदून टाकावयाच्या पाईप लाईनला मंजुरी देणे.

**ठराव क्र. ९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) विभागाला पाणी पुरवठा करणेसाठी टप्पा क्र. १ अंतर्गत रेल्वे फाटक क्र. ३५ येथे मोरीमधून ६०० मी.मी. व्यासाची लोखंडी जलवाहिनी छेदून टाकणेत आली आहे. सदर जलवाहिनीतून भाईंदर (प.) सह उत्तन, पाली, लाईटहाऊस व आजूबाजूच्या विभागाला पाणी पुरवठा करणेत येत आहे.

शहराची पाण्याची वाढती गरज विचारात घेऊन तत्कालीन नगरपरिषदेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत ५० द.ल.ली. पाणी पुरवठा योजना राबविली असून सदर पाणी पुरवठा योजनेच्या बचतीतून राई, डोंगरी, उत्तन विभागात काही पाणी पुरवठा उपांगाची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून चालू आहेत. सदरची उपांगे पुर्ण झाल्यावर पुर्ण क्षमतेने पाणी पुरवठा करणेसाठी व भविष्यकालीन वाढीव पाणी पुरवठा विचारात घेऊन तत्कालीन नगरपरिषदेने दि. २/१२/२००२ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास कळविले होते. त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सर्वेक्षण करुन रेल्वे ट्रक खालून बॉक्स पुशींग पदधतीने कॉंक्रीट बॉक्स मधून ९०० मी.मी. व्यासाची पोलादी जलवाहिनी छेदून टाकणेचे अंदाजपत्रक तयार करुन रेल्वे खात्यास सदरचा प्रस्ताव सादर केला असता,. रु. १३५ लक्ष रकमेच्या अंदाजपत्रकास रेल्वे खात्याने मंजुरी दिली असल्याचे

कळविले आहे. उक्त रकमेव्यतिरीक्त रु. १४.४९ लक्ष रेल्वे विभागास मंजूरीपोटी भरणेचे असून वरील कामास एकूण रु. १५०.०० लक्ष खर्च अपेक्षित आहे.

सदर कामास सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात रु. ३२५.०० लक्ष रकमेची तरतूद केली असून सदरचे काम अत्यावश्यक सेवेअंतर्गत असल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पुर्ण ठेव तत्वावर करुन घेण्यास मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**मा. महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांन क्र. ८ चे वाचन केले)

**चंद्रकांत वैती :-**

विषय क्र. ८ शांतीनगर सेक्टर ७ येथे आपण शांतीस्टार विकासकाकडून पाण्याची टाकी बांधण्याचे काम महाराष्ट्र शासनाच्या डायरेक्शनप्रमाणे सुरू केलेले आहे आणि त्यावरील २५ टक्के वाटा हा महापालिकेने करावयाचा आहे आणि तो साधारणपणे १०.४० लक्ष रूपये एवढा महानगरपालिकेने वाटा उचलावयाचा आहे आणि या योजनेसाठी आपल्याकडे जी तरतुद आहे त्या तरतुदीमधून ५० लक्षाची तरतुद आपल्याकडे आहे आणि त्याच्यातून हा खर्च भागविण्यास ही सभा मंजूरी देत आहे. असा ठराव मी मांडत आहे.

**परशुराम पाटील :-**

साहेब माझी एक सुचना आहे की, शांतीनगर बिल्डरची आपल्याला तो ७५ टक्के जेव्हा खर्च करणार आहे आणि आपण २५ टक्के करणार आहात. तर त्याचे आपण लेखी स्वरूपात काही ॲफिडेव्हीट वगैरे घेतले आहे का? म्हणजे उद्या त्याने त्याच्याबद्दल क्लेम करायला नको.

**मा. महापौर :-**

याच्यावरच त्याचा करारनामा झाला आहे.

**परशुराम पाटील :-**

करारनामा झालेला आहे ना. धन्यवाद.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, आपल्या माहितीसाठी सांगतो. आपल्याला सगळी टिपणी दिलेली आहे. हा करार झालेला आहे. शासनाच्या धर्तीवर करार झालेला आहे. नॉर्मली ठराव आहे. याच्यावर एवढे काही विशेष नाही आहे. आपण राग मानून घेऊ नका. सन्मा. सदस्य पाटील साहेब आपल्याला कल्पना असायला पाहिजे की, हा विषय सभागृहामध्ये नाही म्हटले तरी चार ते पाच वेळा चर्चा होऊन करार झालेला आहे. हे आता रूटिन प्रोसेस मांडण्यासाठी आलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

मला सांगा तो सभागृहामध्ये आणण्याची काय गरज पडली?

**मा. महापौर :-**

त्याला सभागृहाची मान्यता पाहिजे. आपल्याला त्याच्यात काय विषय मांडायचा आहे का? बोलायचे असेल तर बोला.

**रोहिदास पाटील :-**

एक तर तुम्हा सर्वांना माहिती आहे. मी सभागृहाला जाणीव करून देतो की, शांतीनगर बिल्डर बरोबर झालेले कॉन्ट्रॅक्ट आम्ही पत्र देऊनसुद्धा त्याची प्रत आम्हाला मिळाली नाही. हा एक मुद्दा आणि दुसरा मुद्दा म्हणजे जो खर्च होईल त्याच्या २५ टक्के आपण द्यायचा शांतीनगर बिल्डर तेही काही लेचापेचा नाही. त्यांनी फक्त टिपणी दिलेली आहे. काम चालू आहे. २५ टक्के काम केले. आता २५ टक्के काम केल्यानंतर ४० लाखातील १० लाख रूपये त्यांनी खर्च केले. १० लाखातील आपले २५ टक्के म्हणजे अडीच लाख आता अडीच लाखालासुद्धा आमची मंजूरी मागता की, पुर्ण १० लाख ४० हजारला मागता आणि नसेल तर करार केला त्यावेळी सगळी मंजूरी दिलेलीच आहे.

**एस. के. दशोरेः-**

दहा लाखाच्यावर अमाऊंन्ट आहे. त्यामुळे महासभेत आणलेला आहे. १० लाख ४० हजाराला आपण मंजूरी घेतलेली आहे. त्या बिल्डरने ७५ टक्के खर्च करायचा आहे. जर ६० लाख ५५ लाख असेल, तर ७५ टक्के तो खर्च करणार, २५ टक्के आपण त्याला देणार आणि ते पण त्याला चार टप्प्याने देणार जस जसे प्रोग्रेस होत जाणार, तस तसे २५ टक्के असे देणार.

**रोहिदास पाटील :-**

टिपणी वाचा. वाचल्यावर काय क्लिअर होते ते बघा.

**एस. के. दशोरेः-**

हे टोटल १०.४ लाख आहेत. ती टोटल २५ टक्के रक्कम आहे. त्याचे २५ टक्के चार टप्प्यांनी देणार.

**रोहिदास पाटील :-**

आता तुम्ही टिपणी दिलेली आहे की, त्याच्यापैकी १० लाख ४० हजार आहेत. ४० हजारापैकी त्यांनी २५ टक्के काम केलेले आहे. म्हणून जे काही दोन लाख येईल ते द्यायचे, असे तुम्ही इथे लिहिलेले नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी केलेल्या सुचनेची नोंद करण्यात यावी.

**रोहिदास पाटील :-**

या टाकीच्या कामात या ४० लाखाशिवाय दुसरा खर्च कारण आम्हाला ॲग्रीमेंट मिळत नाही.

**मा. महापौर :-**

ॲग्रीमेंट कॉपी सन्मा. सदस्यांना देण्यात यावी.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौरजी मै इस विषय मे बोलना चाहता हँ। १९७८ मे सन्मा. सदस्य तुळशीदास म्हात्रेजी और सन्मा. सदस्य यशवंत भोईरजी सरपंच थे। तब शांतीनगर के रहिवासीयो को शांतीस्टार बिल्डरने अंडरटेकिंग दिया की, मै शांती नगरके रहिवासीयोका पानी दूंगा एम.आय.डी.सी. से और आज वो हमारे पास से पैसा माँग रहे है। हम उनका आर्थिक मदद करने के बदले सरकार के ध्यान मे ये लाना जरूरी था की, उन्होने अंडर टेकींग दिया हुआ है की, शांतीनगर के रहिवासियों को, ११ सेक्टर मे रहनेवाले सभी रहिवासींयो को पानी वो अपने खर्च से पिलायेगा। हो सकता है की, सरकार के निदर्शन मे हमारे अधिकारोयोने ये बात को नही लाया होगा ।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहित सुवर्णाजी, आपके ध्यान मे लाना चाहता हुँ की, जब ये शासन के लेव्हल पे बातचीत हो रही थी। दो दिन मे इसका फैसला नही हुआ। सेक्रेटरी के लेव्हल पे हुई एम्.जी.पी. के सारे अधिकारी थे, बोर्ड के सारे अधिकारी थे, कलेक्टर थे। समिती बनाई गई और शांतीस्टार के ग्रामपंचायत के परवानगीसे लेके महानगरपालिका तक और शासन ने दी हुई यु.एल.सी.की परिमिशनसे लेके एन.ए. परमिशन तक कौनसी कंडिशन्स की उन्होने पुर्तता की, कौनसी नही की? इन सारी बातोपे चर्चा हुई। उस चर्चा के अंदर आयुक्त साहब, महापौर, उपमहापौर, स्थायी समिती के चेअरमन ऐसे लगातार कई सभा के उपस्थित थे। और उसपर जाकर फायनली पानी की टाकी उन्होने बनाने की इस तरकीब से योग्य निर्णय लिया गया है।

**रोहित सुवर्णा :-**

ऑगस्ट १९८८ मे प्रशासकीय अधिकारी भगतसाहेबने उनको चार कन्डिशन और डाले थे। आप शांतीस्टार बिल्डरसे क्या बनावा के लेना इसके बारे मे आप मुझे बोलने दिजिए।

**मा. महापौर :-**

आपको शांतीस्टार बिल्डरसे क्या बनाके मिल रहा है? आयुक्त साहब को विनंती है की, उन्होने लेखी स्वरूप मे।

**रोहित सुवर्णा :-**

आज तक मेरे पत्र कोई भी पत्र का जवाब नही दिया है।

**मा. महापौर :-**

आप उनको लेटर दिजिए वो आपको उसकी डिटेल दे देंगे।

**रोहित सुवर्णा :-**

उपविभागीय कार्यालय बनाना था, उन्होने आजतक बनाया नही। सार्वजनिक वाचनालय बनाना था, वो उन्होने आजतक बनाया नही। उन्होने ओ.पी.डी. हॉस्पिटल बनाके हमारे को देना, वो भी नही बनाया। सौ फिट का डी.पी. रोड बनाने का था, वो भी बनाया नही। ये सब हम शांतीस्टार बिल्डरसे करवा लेंगे। एक दिन ऐसा आयेगा की, शांती नगर बनाके बिल्डर भाग जायेगा और ये सब खर्चा अपने उपर आयेगा। हम मिरा भाईंदर मे रहनेवालोकों, शांती नगरवालो को सब सुविधा देनी पडेगी। साहब, ये फायनान्शीअल प्रॉब्लेम है।

**प्रकरण क्र. ८ :-**

शांतीनगर सेक्टर-७ येथे बांधावयाच्या उंच जलकुंभाच्या खर्चाचा महानगरपालिकेचा २५% वाटा देणेस मंजुरी देणेबाबत.

**ठराव क्र. १० :-**

शांतीनगर (मिरा रोड) जि. ठाणे येथील शांतीनगर वसाहतीच्या पाणी पुरवठ्याची समस्या सोडविण्यासाठी शासन स्तरावर वेळोवेळी बैठका आयोजित करणेंत आल्या होत्या. शांतीनगर वसाहतीला शांतीस्टार विकासक स्वखर्चाने पाणी पुरवठा योजना राबवून एम्.आय.डी.सी.कडून प्रतीदिन ५.०० द.ल.ली. मंजूर कोट्यातून पाणी पुरवठा करीत आहेत. शांतीनगर वसाहतीतील वाढत्या लोकसंख्येचा विचार करता सध्यास्थितीतील अपूरा पाणी पुरवठा होत असल्याने मिरा भाईंदर महानगरपालिकेने पाणी पुरवठा करावा म्हणून शासनाकडे वेळोवेळी बैठका होऊन काही ठोस व निर्णयक निर्णय होऊन शासनाच्या मार्गदर्शनाप्रमाणे दि. ३१/३/२००३ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका व शांतीस्टार विकासक यांचे मध्ये द्विपक्षीय करारनामा करणेत आला. सदर करारनाम्यातील कलम १ नुसार शांतीस्टार विकासकांनी ११ लक्ष क्षमतेचा उंच जलकुंभ शांतीनगर वसाहतीमध्ये बांधणेचा असून त्याचा खर्च अंदाजे (५० ते ५५) लक्ष असेल, पैकी रु. १०.४० लक्ष (२५%) खर्च मिरा भाईंदर महानगरपालिकेने करावयाचा आहे. याबाबतीत बांधकामाच्या वेगवेगळ्या टप्प्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम पुर्णत्वाचा दाखला देईल व त्याप्रमाणे एकूण चार टप्प्यात १०.४० लक्ष रु. शांतीस्टार विकासकाला मिरा भाईंदर महानगरपालिका देईल. वरील प्रमाणे शांतीस्टार विकासकाकडून उंच टाकीचे काम चालू असून २५% काम पुर्ण झाले आहे. सन २००४-०५ च्या आर्थिक वर्षात 'पाण्याची टाकी / इमारती बांधकाम / मिटर कार्यशाळा, गोडाऊन (व्हॉल्वमन, मिटर रुम इ.) या शिर्षाखाली रु. ५० लक्षाची तरतुद असून वरील खर्च उक्त शिर्षातून भागविणेस हरकत नाही.

शांतीस्टार वसाहतीची पाणी समस्या सोडविणे साठी व दि. ३१/३/२००४ रोजी केलेल्या करारनाम्यातील अटींची पुर्तता करणेसाठी शांतीस्टार विकासकाला जलकुंभाचे बांधकाम करणेसाठी महानगरपालिकेच्या २५ टक्के वाट्याचे १०.४० लक्ष रुपये देणेंस मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

( प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ९ चे वाचन केले )

**निर्मला सावळे :-**

विषय क्र. ९ महानगरपालिका क्षेत्रात केंद्र शासनाचे आर्थिक साह्याने आर.सी.एच. फेज-२ प्रकल्प सुरू करणेसाठी प्रकल्प अहवाल राज्य शासनाकडे मंजूरीसाठी पाठविणे बाबत. जागतिक बँक, जागतिक आरोग्य संघटना, युनिसेट, यु.एन.एफ.पी.ए., युरोपियन कमिशन इत्यादीसारख्या आंतरराष्ट्रीय व केंद्रशासनाचे आर्थिक आरोग्य विषयक प्रकल्प नियमितपणे राबविण्यात येतात. केंद्र शासनाच्या आर्थिक अनुदानातून सध्या देशातील विविध ठिकाणी प्रजनन व बाल आरोग्य (आर.सी.एच.) फेज-१ कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. या कार्यक्रमाचे फेज-२ अंतर्गत विविध ठिकाणी प्रकल्प राबविला जाणार आहेत. प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमात माता व बालकांसाठी विविध आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या प्रकल्पा अंतर्गत गरोदर माता, अंगावर पाजणाऱ्या माता व बालकांसाठी विविध वैद्यकिय सुविधा उपलब्ध करून देणे, नागरीकांची व विशेषतः महिलांना आरोग्य शिक्षणाद्वारे आरोग्य विषयक जागृती निर्माण करणे, माता मृत्यु एक वर्षाचे आतील बालकांचा मृत्यु दर

कमी करणे, प्रजनन दर कमी करणे इ. उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. झोपडपट्टी व कमकुवत किंवा तत्सम घटक असलेल्या विभागातील नागरीकांचे आरोग्याचा स्तर उंचावणे यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. आर.सी.एच. फेज-२ प्रकल्पा अंतर्गत महापालिका क्षेत्रात नवीन १० आरोग्य केंद्रे व भाईदर पश्चिम, भाईंदर पुर्व, मिरा रोड, घोडबंदर भागात प्रत्येकी एक याप्रमाणे ३ माता व बाल रूग्णालये या वैद्यकिय सुविधा तसेच महिला सक्षमीकरण, किशोर वयीन मुले व मुली यांना प्रजनन आरोग्य शिक्षण, महिला व मुलांचे आरोग्य याचा स्तर उंचावणे, आरोग्य कार्यक्रम राबविणे व आरोग्य शिक्षण यासाठी व नागरीकांस आरोग्य विषयक जाणीव निर्माण करणे इ. समावेश आहे. आर.सी.एच. फेज-२ अंतर्गत सुरू करावयाचे माता व बाल रुग्णालयासाठी आवश्यक कर्मचाऱ्यांचे वेतनावरील वार्षिक खर्च अंदाजे ४८,०९,६००/- महानगरपालिकेस करावा लागणार आहे. प्रकल्प संपुष्टात आल्यानंतर १० आरोग्य केंद्रे व ३ माता बाल रुग्णालये पुढे चालू ठेवायचे असल्यास वार्षिक अंदाजे १ कोटी ५० लाख खर्च अपेक्षित आहे. केंद्र शासनाचे अनुदानातून राबवावयाचे प्रकल्पासाठी एकूण रु. ५ कोटी १६ लाख खर्चाचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला आहे. हा संपुर्ण प्रकल्प खर्च ५ वर्षाच्या कालावधीसाठी आहे. प्रकल्पांचा संपुर्ण खर्च शासनाकडून अनुदान म्हणून मिळणार आहे. महानगरपालिकेने फक्त माता व बाल रूग्णालयाचे कर्मचारी यांचे वेतनावरील खर्च वार्षिक रु. ४८,०९,६००/- करावयाचा आहे. तरी प्रजनन व बाल आरोग्य फेज-२ महानगरपालिका क्षेत्रात राबविणेसाठी शासनाकडे प्रकल्प अहवाल मंजुरीसाठी पाठविणेस तसेच प्रकल्प कालावधी संपुष्टात आल्यानंतर सदरच्या प्रकल्पातील आरोग्य केंद्रे, माता बाल रुग्णालयातील सुविधा पुढे चालू ठेवणेस तसेच इतर खर्चासाठी इथे ठराव मांडत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, यामध्ये असे आहे की अठ्ठेचाळीस लाखाचा जो वेतनचा खर्च येणार आहे. तरी आपल्या अर्थसंकल्पामध्ये त्याची तरतुद आहे का ?

**डॉ. बावस्कर :-**

उपलब्ध तरतुदीमधून मार्चपर्यंत खर्च भागविता येईल आणि त्यानंतर पुढच्या वर्षाच्या अर्थसंकल्पात याची पुन्हा तरतुद करता येईल.

**शशिकांत भोईर :-**

मा. पीठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीने बोलतो. माझ्या माहितीप्रमाणे या अर्थसंकल्पात अठ्ठेचाळीस लाख नऊ हजार सहाशे ही तरतुद नाही आहे. कृपया डॉ. बावस्करांनी याचा खुलासा करावा. तत्पुर्वी फेज-१ मध्ये काय तरतुद आहे याची माहिती द्यावी.

**डॉ. बावस्कर :-**

मा. महापौर सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी आर.सी.एच. म्हणजे प्रजनन व बाल आरोग्य म्हणजे माता बाल संगोपन या फेज-१ कार्यक्रम सध्या देशामध्ये ग्रामीण भाग आणि काही महानगरपालिका या ठिकाणी राबविण्यात येत आहे. फेज-१ मध्ये सुद्धा प्रजनन आरोग्य किंवा माता आणि बाल आरोग्य यावर आऊट स्ट्रीट सर्व्हिसेस म्हणजे विभागात जाऊन सेवा देणे आणि त्यांच्यासाठी आपण प्राथमिक आरोग्य सुविधा किंवा प्राथमिक वैद्यकिय सुविधा म्हणतो याचा समावेश होता आणि या ठिकाणी आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत ज्या केसेस किंवा जे रुग्ण रेफर होतील त्यांना फर्स्ट रेफरन्स सर्व्हिसेस यासाठी माता आणि बाल रूग्णालये याच्यासाठीच्या सर्व्हिसेस द्यायच्या त्याचा समावेश होता. जे विभाग पहिल्या फेजमध्ये समाविष्ट केले नव्हते त्यांच्यासाठी आता हा आर.सी.एच. नवीन दुसरा फेज केंद्र शासनाने घेतलेला आहे आणि या केंद्र शासनाने घेतलेला आहे आणि या केंद्र शासनाने जो फेज आर.सी.एच. सेकन्ड फेज घेतलेला आहे. त्यासाठी महाराष्ट्रातून आपण शासनाकडे आग्रह धरला होता की, आमच्या महानगरपालिका हद्दीत अशा सुविधा किंवा वैद्यकीय सुविधा उपलब्ध नाहीत. शासनाचे रूग्णालय नाही, महापालिकेचे रूग्णालय नाही म्हणून प्राधान्याने मिरा भाईंदर महानगरपालिकेचा फेज-२ चा कार्यक्रम सुरू करण्यासाठी विचार करण्यात यावा आणि शासनाने हे तत्वतः मान्य केलेले आहे आणि त्यांनी मान्य केल्यानंतर प्रकल्प अहवाल तयार करून आमच्याकडे पाठवा तो प्रकल्प अहवाल आल्यानंतर त्यावर विचार करून आम्ही तुम्हाला मंजुरी देऊ आणि यासाठी याच महासभेची मंजुरी घेऊन हा प्रकल्प अहवाल सोमवारी महाराष्ट्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येईल.

**शशिकांत भोईर :-**

आपण जो फेज-२ साठी मंजूरी घेणार आहोत. पण जो सरकारी दवाखाना आहे. तरी आज आपल्या ताब्यात नाही आहे आणि आपण अठ्ठेचाळीस लाख नऊ हजार सहाशे रूपये खर्च करणार आहोत. मग ही तरतुद नसताना आपण कोणत्या माध्यमातून खर्च करणार?

**मा. आयुक्त :-**

हा फक्त वेतनावरचा खर्च आहे. तीन माता बाल संगोपन केंद्राच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा खर्च आहे. आपल्या रूटीन बजेटमध्ये जी तरतुद आहे. त्याच्यामधून खर्च करता येईल आणि त्याच्यामध्ये जर कमी पडले तर आपल्याला यथावकाश सभागृहापुढे प्रस्ताव सादर करता येईल.

**शशिकांत भोईर :-**

माझ्या माहितीप्रमाणे एवढी या रकमेची तरतुद नाही आहे.

**मा. आयुक्त :-**

अशी तरतुद नसेल तर आपण जी तरतुद संपुष्टात आल्यानंतर पुन्हा रिप्रिपरेशान करता येणे शक्य आहे. कायद्याने तशी तरतुद आहे. त्यामुळे ते करता येईल.

**रोहिदास पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो, अठ्ठेचाळीस लाखाला परवानगी देते वेळी हा जो प्रकल्प दोन आमच्या एवढे लक्षात येते की, कोणताही एक प्रकल्प राबविलेला आहे. दुसरा सुरू होत आहे. दुसरा प्रकल्प सुरू होते वेळी केंद्रशासनाच्या सहाय्याने सुरू होत आहे का? कारण तीन चार नावे लिहिलेली आहेत. नीट लक्षात येत नाही की, कोणाच्या सौजन्याने हा आपल्याकडे येणार आहे. एका इन्स्टिट्युटच्या वतीने येणार आहे. केंद्र शासनाच्या वतीने येणार आहे की, जागतिक बँकेच्या ज्या काही योजना आहेत त्यांच्या वतीने येणार आहे. त्याची सविस्तर टिपणी याच्यामध्ये नाही आहे. ती टिपणी येते वेळी याच्यात असा खुलासा झाला नाही की, ज्यावेळी आपल्या महापालिकेचे अठ्ठेचाळीस लाख रूपये खर्च करतो. त्यावेळी सात लाख लोकांना त्याचा फायदा होणार आहे. तर ती जी कोणती येणारी स्किम आहे. त्या स्किमने कोणाच्यावतीने किती कोटी रूपये आणखी आपले खर्च होणार आहे. म्हणजे आपला त्याच्यामध्ये १/१० भाग आहे. १/५ भाग आहे, १/४ भाग आहे याचा या टिपणीत कुठेही खुलासा झालेला नाही. जर आपण निवेदन आणखी सुस्पष्ट केले तर सभागृहाला माहिती होईल की, दुसरा प्रकल्प येत आहे. त्याच्यातून आपण जी सभागृहात मंजूरी देतो आधी आपण घनकचऱ्याला दिली, ह्याला दिली, त्याला दिली अशा वेगवेगळया आपण मंजुऱ्या देतो. तर ह्या प्रकल्पाला आपण मंजुरी देऊ या. आता आयुक्त साहेब बोलले की, हा पगाराचा खर्च आहे. पगाराचा खर्च ४८ लाख जेव्हा वार्षिक करतो. तेव्हा ती वास्तु कशी उभी राहणार आहे? त्याचे स्वरूप काय आहे?

**डॉ. बावस्कर :-**

मा. महापौर महोदय, आर.सी.एच. फेज-२ हा प्रकल्प केंद्र शासनाच्या अनुदानातुन महाराष्ट्र शासनामार्फत आपल्याला मिळणार आहे आणि याच्यावर नियमितपणे नियंत्रण महाराष्ट्र शासन ठेवणार आहे. केंद्र शासनाकडून येणारा पैसा महाराष्ट्र शासनाकडे येतो आणि तो महाराष्ट्र शासन महानगरपालिकेला देणार आहे. त्यामुळे हा राज्य शासनाच्या अखत्यारित आहे आणि अनुदान केंद्र शासनाकडून मिळणार आहे. या फेजमध्ये आपण दहा नवीन आरोग्य केंद्र प्रस्तावित केलेली आहेत. आणि हे प्रस्तावित करताना आपण असाच विचार केलेला आहे की, आपण जी काही आरोग्य केंद्र सुरू केलेली आहेत. यातील काही स्टाफचा पगार महानगरपालिकेला यावर बोजा न पडता या प्रकल्पातून आपल्याला भागविता येईल आणि ॲडीशनल काही आरोग्य केंद्र लागतील तर ते आपण आपल्या या प्रकल्पाच्या खर्चातून सुरू करणार आहोत. यासाठी लागणाऱ्या इमारतीची दुरूस्ती किंवा रिन्युव्हेशन हे या प्रकल्पामध्ये समाविष्ट आहे. या प्रकल्पामध्ये असणाऱ्या कर्मचारी वर्गाचा पुर्ण पगार यामध्ये समाविष्ट आहे. फक्त तीन माता बाल रूग्णालये जी आहेत त्याबद्दल शासनाचे म्हणणे आहे की, फक्त माता बाल रुग्णालयाच्या पगारावर होणारा खर्च महानगरपालिकेने करावा. आरोग्य केंद्रावरच्या कर्मचाऱ्यांना पगार या प्रकल्पामध्ये आहे तो शासनाकडून केला जाईल. त्यासाठी लागणारी उपकरणे शासनाकडून खर्च केली जातील, लागणाऱ्या औषधावरचा संपूर्ण खर्च शासनाकडून केला जाईल. असा हा एकूण पाच वर्षाचा प्रकल्प आहे. यामध्ये तीन माता व बाल रुग्णालयाच्या पगाराचा खर्च वगळता संपूर्ण खर्च इलेक्ट्रीसीटी बिल, टेलिफोन बिल, औषधे, उपकरणे आणि कर्मचाऱ्यांचे पगार यावरचा संपूर्ण खर्च या प्रकल्पाच्या खर्चातून भागविला जाणार आहे आणि तशा दृष्टिने आपण हा प्रकल्प अहवाल तयार केलेला आहे. महासभेची मंजुरी मिळाल्यानंतर तो शासनाकडे पाठविला जाईल. यामध्ये जर विवरण पाहिजे असेल तर सन २००४ साली आपण ज्या प्रकल्पामध्ये शासनाचे अनुदान एक कोटी

अठ्ठेचाळीस लाख नऊ हजार ऐंशी रूपये, २००५ साली आठ कोटी त्र्याहत्तर लाख नऊ हजार नऊशे रूपये, २००६ साली नऊ कोटी त्र्याऐंशी लाख, २००७ साली आठ कोटी सत्तावन्न लाख आणि २००८ साठी नऊ कोटी सत्तावन्न लाख अनुदान आपण यामध्ये प्रस्तावित केलेले आहे आणि पाच वर्षाच्या कालावधीसाठी एकूण शासनाकडून मिळणारे अनुदान या प्रकल्प अहवालामध्ये पाच कोटी सोळा लाख चौसष्ट हजार एवढे प्रस्तावित केलेले आहे आणि यामध्ये फक्त माता बाल रूग्णालयाची तीन आपल्याला काढायची आहेत. त्याच्यात फक्त स्टाफच्या पगाराचा समावेश नाही आहे. त्यासाठी लागणारी औषधे, उपकरणे या रुग्णालयाच्या संपुर्ण केंद्र शासनाच्या अनुदानातून महाराष्ट्र शासनामार्फत आपल्याला मिळणार आहे.

**रोहिदास पाटील :-**

डॉक्टर साहेब, माझ्या प्रश्नावर अजुन मला उत्तर मिळालेले नाही आहे की, जसे आपण हा प्रोजेक्ट रिपोर्ट बनवते वेळी ४८ लाखाला या वर्षाची मंजूरी आहे. पुढच्या वर्षी पगारामध्ये याच्यात काय वाढ होण्याचे कारण नाही. हा एवढा स्टाफ काम करेल. पण ते चालू करते वेळी जेव्हा आपण ४८ लाखातील वार्षिक खर्चाला बारा दुणे चोवीस, आपण ह्याच्यामध्ये चाळीस हजार रूपयाचा खर्च करतो. चाळीस हजार रूपये वार्षिक करतो. त्यांचे इन्फ्रास्ट्रक्चर म्हणून उभा करतेवेळी त्यांचे पाच तास प्रोजेक्ट आपल्याकडे येणार आहे. आधी आपल्याकडे काय येणार आहे. तो जो केंद्र शासनाचा विषय आहे. एका सत्ताधारी पक्षाचा तो प्रोजेक्ट होता की, सर्वसामान्य असा आहे. जसे अनेक योजना आता आपण बघतो. याच्यावर मला हा विषय कुठे न्यायचा नाही. अनेक योजना ज्या आधी होत्या त्या बंद होतात. ही योजना बंद होणारी योजना आहे की, चालू राहणारी योजना आहे. पुढचे सरकार चालू ठेवणार आहे की, काय करणार आहे? मी उगाच विचारीत नाही. साहेब, उत्तर देऊ दे. आम्ही तुम्हाला त्या खुर्चीत पुष्कळ वेळा बसवतो.

**डॉ. बावस्कर :-**

महापौर महोदय, या योजना कल्याणकारी योजनामधुन घेतलेल्या असतात. या केंद्र शासनाकडे यासाठी जागतीक आरोग्य संघटना, वर्ल्ड बँक यांच्याकडून पैसा आलेला असतो. आलेले प्रकल्प अजून बंद झालेले नाहीत. हा प्रकल्प पाच वर्षासाठी आहे आणि पाच वर्षासाठीच या प्रकल्पाला मंजुरी मिळालेली आहे. केंद्र शासनाकडून पाच वर्षाच्या अनुदानाला मंजुरी मिळालेली आहे.

**मा. आयुक्त :-**

केंद्र शासनाकडून पाच वर्षासाठी आधीच मंजुरी मिळालेली आहे. म्हणजे आपल्या ठरावानंतर ती आपल्याला लागू होईल. म्हणजे पाच वर्षाच्या आत बंद पडण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. पाच वर्षानंतर जर कन्टिन्युएशन नाही मिळाले तर काय करायचे ? हा वेगळा प्रश्न आहे. मला वाटते या मुद्याचा मी खुलासा केलेला आहे. ही योजनाच पाच वर्षासाठी असल्यामुळे या पाच वर्षाच्याच योजनेला केंद्र सरकारने मंजुरी दिलेली आहे. ती आपल्याला लागू झाल्यानंतर पाच वर्षाच्यामध्ये बंद करणे हा प्रश्नच उद्‌भवत नाही. ती पाच वर्षासाठी मंजुरीच आहे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, आपण मंजुरी आर्थिक मंजुरी देतो. तशीच मंजुरी देतो. आज आपण पैसे देत नाही. मला हे उत्तर मिळाले नाही की, ही योजना येते वेळी केंद्र सरकार किंवा राज्य सरकारकडून आपल्या महापालिकेच्या ताब्यात जसे बिल्डींग बनवायची त्यासाठी फन्ड महापालिकेला येईल की, सरकार करेल हा खुलासा कुठे होत नाही.

**मा. आयुक्त :-**

तो खुलासा केलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

स्टेशनरी, मशिनरी जे काही येईल. जे काही इक्विप्मेंन्ट येईल ते आधी येईल.

**मा. आयुक्त :-**

केंद्र सरकार राज्याच्या आरोग्य विभागाकडे निधी हस्तांतरीत करील आणि राज्याचा आरोग्य विभाग हा आपल्याला तो निधी हस्तांतरीत करेल.

**रोहिदास पाटील :-**

आपण जशी आधी पण एक मंजुरी दिली की, उत्तनचे आरोग्य केंद्र, टेम्बाचे आरोग्य केंद्र ह्याला हस्तांतरच्या वेळी सगळया मंजुऱ्या दिल्या. हस्तांतरचा एक ठराव दिला. त्याच्यात आपण मंजुरी दिली त्यावेळी तिकडचा कर्मचारी आपल्याकडे मर्ज करणार अशीही आपण मंजुरी दिली.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील तो वेगळा विषय आहे. हा वेगळा विषय आहे. ही केंद्र सरकारची योजना आहे. त्याच्याबद्दल तुम्ही मंजुरी देत आहात.

**रोहिदास पाटील :-**

नवीन रिक्युटमेंट होईल का?

**मा. आयुक्त :-**

नक्कीच हा विषय वेगळा आहे. आपली सध्याची जी आरोग्य केंद्र आहेत. त्यांचे जे डॉक्टर, नर्सेस आपण सध्या एम्प्लॉय केलेले आहेत, त्याच्या वेतनावरचा खर्च देखील आपल्याला याच्यातून भरून काढता येईल आणि जे ॲडीशनल केंद्र असतील आणि ही तीन माता बाल संगोपन केंद्र आहेत, त्याच्यासाठी आपल्याला वेगळी तरतुद करावी लागेल.

**प्रकरण क्र. ९ :-**

महानगरपालिका क्षेत्रात केंद्र शासनाचे आर्थिक साह्याने आर.सी.एच. फेज-२ प्रकल्प सुरु करणेसाठी प्रकल्प अहवाल शासनास मंजुरीसाठी पाठविणेबाबत.

**ठराव क्र. ११ :-**

जागतिक बँक, जागतिक आरोग्य संघटना, युनिसेट, यु.एन.एफ.पी.ए., युरोपियन कमिशन इत्यादीसारख्या आंतरराष्ट्रीय व केंद्रशासनाचे आर्थिक आरोग्य विषयक प्रकल्प नियमितपणे राबविण्यात येतात.

केंद्र शासनाच्या आर्थिक अनुदानातून सध्या देशातील विविध ठिकाणी प्रजनन व बाल आरोग्य (आर.सी.एच.) फेज-१ कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. या कार्यक्रमाचे फेज-२ अंतर्गत विविध ठिकाणी प्रकल्प राबविला जाणार आहेत. प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमात माता व बालकांसाठी विविध आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या प्रकल्पा अंतर्गत गरोदर माता, अंगावर पाजणाऱ्या माता व बालकांसाठी विविध वैद्यकिय सुविधा उपलब्ध करून देणे, नागरीकांची व विशेषतः महिलांना आरोग्य शिक्षणाद्वारे आरोग्य विषयक जागृती निर्माण करणे, माता मृत्यु एक वर्षाचे आतील बालकांचा मृत्यु दर कमी करणे, प्रजनन दर कमी करणे इ. उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. झोपडपट्टी व कमकुवत किंवा तत्सम घटक असलेल्या विभागातील नागरीकांचे आरोग्याचा स्तर उंचावणे यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. आर.सी.एच. फेज-२ प्रकल्पा अंतर्गत महापालिका क्षेत्रात नवीन १० आरोग्य केंद्रे व भाईंदर पश्चिम, भाईंदर पुर्व, मिरा रोड, घोडबंदर भागात प्रत्येकी एक याप्रमाणे ३ माता व बाल रूग्णालये या वैद्यकिय सुविधा तसेच महिला सक्षमीकरण, किशोर वयीन मुले व मुली यांना प्रजनन आरोग्य शिक्षण, महिला व मुलांचे आरोग्य याचा स्तर उंचावणे, आरोग्य कार्यक्रम राबविणे व आरोग्य शिक्षण यासाठी व नागरीकांस आरोग्य विषयक जाणीव निर्माण करणे इ. समावेश आहे. आर.सी.एच. फेज-२ अंतर्गत सुरू करावयाचे माता व बाल रुग्णालयासाठी आवश्यक कर्मचाऱ्यांचे वेतनावरील वार्षिक खर्च अंदाजे ४८,०९,६००/- महानगरपालिकेस करावा लागणार आहे. प्रकल्प संपुष्टात आल्यानंतर १० आरोग्य केंद्रे व ३ माता बाल रुग्णालये पुढे चालू ठेवायचे असल्यास वार्षिक अंदाजे १ कोटी ५० लाख खर्च अपेक्षित आहे.

केंद्र शासनाचे अनुदानातून राबवावयाचे प्रकल्पासाठी एकूण रु. ५ कोटी १६ लाख खर्चाचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला आहे. हा संपुर्ण प्रकल्प खर्च ५ वर्षाच्या कालावधीसाठी आहे. प्रकल्पांचा संपुर्ण खर्च शासनाकडून अनुदान म्हणून मिळणार आहे. महानगरपालिकेने फक्त माता व बाल रूग्णालयाचे कर्मचारी यांचे वेतनावरील खर्च वार्षिक रु. ४८,०९,६००/- करावयाचा आहे.

तरी प्रजनन व बाल आरोग्य फेज-२ महानगरपालिका क्षेत्रात राबविणेसाठी शासनाकडे प्रकल्प अहवाल मंजुरीसाठी पाठविणेस तसेच प्रकल्प कालावधी संपुष्टात आल्यानंतर सदरच्या प्रकल्पातील आरोग्य केंद्रे, माता बाल रुग्णालयातील सुविधा पुढे चालू ठेवणेस व त्यासाठी येणाऱ्या आवश्यक त्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यांत येत आहे.

**सुचक :- सौ. निर्मला बाबुराव सावळे. अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**मा. महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १० चे वाचन केले )

**रविंद्र माळी :-**

प्रकरण क्र. १० विषय महानगरपालिकेचा आरोग्य केंद्रासाठी करार पद्धतीने नेमण्यात आलेल्या कर्मचारी वर्गास मुदतवाढ देण्याबाबत महासभा विषय क्र. ५ ठराव क्र. ५.

(ठरावाचे वाचन केले)

**प्रेमनाथ पाटील :-**

विषय क्र. १० ला माझे अनुमोदन आहे.

**शशिकांत भोईर :-**

पीठासीन अधिकारी यांच्या परवानगीने बोलतो, करार पद्धतीने जे तात्पुरत्या स्वरूपात कर्मचारी आपण घेतलेले आहे. त्यांचे रोस्टर तयार करता येते का? हा माझा पहिला प्रश्न आहे. सदर कर्मचारी हे त्यांना मुदतवाढ देण्यापुर्वी चार ते पाच दिवसाचा खंड द्यावा. नाहीतर त्यांना पुढचा कार्यकाल वाढवून देण्यासाठी पाच महिन्यासाठी तरी मुदत द्यावी. नाहीतर मग ते २४० दिवस संलग्न होऊन ते कोर्टात जाऊन स्टे घेतील याची जरा जातीने दक्षता घ्यावी. सदर स्टाफची भरती शासनाकडून पोस्ट मंजुर करून घेऊन एम्प्लॉयमेंट एक्सचेंज तर्फे ठरविण्यात याव्या. वृत्तपत्रात जाहिरात द्याव्यात. सदर भरतीमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे बोलले जाते. तरी सबंधीत कर्मचाऱ्यांना चार दिवस ब्रेक देऊनच पाच महिन्याची मुदतवाढ द्यावी. सदर कर्मचारी कोर्टात गेल्यास सर्व जबाबदारी प्रशासनाची राहिल याची नोंद घ्यावी. आपल्या महानगरपालिकेने सुरू केलेले आरोग्य केंद्र शनिवार, रविवार या दिवशीही सुरू असतात का? याबाबत प्रशासनाने माहिती पुरवावी.

**डॉ. बावस्कर :-**

मा. महापौर महोदय, आपण जे आरोग्य केंद्र सुरू केलेले आहे. ते शनिवारी चालू असतात. रविवारी फक्त आठवडयाची सुट्टी म्हणून बंद असतात आणि जर दोन सलग सुट्टया लागून आल्या तर त्या दोन्ही सुट्टीच्या दिवशी आरोग्य केंद्र चालू रहात नाही. आपण फक्त एक दिवशी सुट्टी घेतो. परंतु कुठल्याही परिस्थितीत आरोग्य केंद्र दोन दिवस बंद ठेवत नाही. आठवड्यातून फक्त एक दिवस ठेवतो. दोन सुट्टया आल्या तरी फक्त एकच सुट्टी घेतली जाते. दुसऱ्या सुट्टीच्या दिवशी आरोग्य केद्र चालू असते. शनिवारी चालू असते. फक्त रविवारची सुट्टी असते.

**शशिकांत भोईर :-**

माझा अगोदर प्रश्न होता. करार पद्धतीने तात्पुरत्या स्वरूपाचे घेताना रोस्टर केले जाते का?

**डॉ. बावस्कर :-**

सदरची पदे महापालिकेने मंजुर केलेली आहेत. ती शासनाकडे मंजुरीसाठी पाठविलेली आहेत. आणि जी पदे महापालिकेच्या मंजुरीने आणि शासनाकडे ह्याच्यासाठी पाठविलेली याचे रोस्टर तयार करता येते.

**शशिकांत भोईर :-**

नक्की तयार करता येते ना? त्यासंबधीच माझा प्रश्न होता की, आपण आता जे बोललात आठवड्याची एक सुट्टी देता, जेव्हा आपण ठेका पद्धतीने कचरा साफसफाई करतो. त्या लोकांकडून पुर्ण ३० दिवस काम करून घेतो. आता ही आरोग्याची अत्यावश्यक सेवा आहे. अत्यावश्यक सेवा असल्या कारणाने नागरीकांना ती सुविधा पुरविणे गरजेचे आहे. मग ती एक दिवसाची सुट्टी देता ती का देता? लोकांना आरोग्याची सुविधा नाको आहे का?

**मा. आयुक्त :-**

त्यांना सुट्टी देऊन रोटेशन पद्धतीने आपण ॲडजेस्ट करून घेतो, हॉस्पिटलच्या बाबतीत एक दिवस सुट्टी देतो.

**डॉ. बावस्कर :-**

पण तुमचे आरोग्य केंद्र चालू असते का?

**मा. आयुक्त :-**

हॉस्पीटल एक दिवस सुट्टी असते सरकारी दवाखान्याला पण एक दिवस सुट्टी असते.

**शशिकांत भोईर :-**

त्याबद्दल त्यांना सुट्टी असते का?

**मा. आयुक्त :-**

हो.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. वरील सर्व आरोग्य केन्द्रामध्ये काम करणारे सर्व कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देण्यांत यावी असे मी सुचित करतो. तसेच मिरा भाईंदर विभागामध्ये असणाऱ्या सर्व स्थानिक उमेदवारांना प्राधान्य द्यावे अशी मी एक मागणी करतो. कारण आज ह्या पुर्ण यादीमध्ये असे दिसुन येते की, ४१ कर्मचारी आहेत. चांगल्या प्रकारे काम चाललेले आहे. त्याबद्दल वाद नाही. त्याच्यामध्ये २३ हे मिरा भाईंदर विभागाच्या हद्दीच्या बाहेरचे आहेत. पण ज्यावेळेला अशा पद्धतीने या आरोग्य केन्द्रामध्ये खरोखरच जेव्हा भरती चालु होईल. तेव्हा मिरा भाईंदर हद्दीतील भुमिपुत्रांना प्राधान्य द्यावे अशी मी प्रशासनाकडे विनंती करतो.

**प्रकरण क्र. १० :-**

महानगरपालिका क्षेत्रात सुरु करण्यांत आलेल्या आरोग्य केंद्रासाठी करार पद्धतीने नियुक्त करण्यांत आलेल्या कर्मचारी वर्गास मुदतवाढ मिळणेबाबत.

**ठराव क्र. १२ :-**

मा. महासभा विषय क्र. ०५ ठराव क्र. ०५ दि. १९/४/२००३ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात

| | |
|---|---|
| भाईंदर पूर्व | २ |
| भाईादर पश्चिम | २ |
| उत्तन | १ |
| मिरारोड | १ |
| काशी मिरा | १ |

व एक फिरता दवाखाना सुरु करणेसाठी व त्यासाठी लागणाऱ्या कर्मचारी वर्गाची करारपध्दतीने नेमणूक करणेसाठी मंजूरी देण्यात आलेली आहे. यात वैद्यकिय अधिकारी-८, परिचारीका (एन.एम.)-८, प्रसविका (ए.एन.एम.)-२१, फार्मासिस्ट कम लिपिक-८ या पदांचा समावेश आहे. सदर पदावर नेमणुकीसाठी वृत्तपत्रात जाहिरात देऊन पात्र इच्छुक उमेदवारांना थेट मुलाखतीसाठी बोलविण्यात आले होते. सदर उमेदवारांच्या मुलाखती खालीलप्रमाणे गठीत केलेल्या निवड समितीकडून घेण्यात आल्या

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. आर.डी.शिंदे | महापालिका आयुक्त | अध्यक्ष |
| २ | श्री. कल्याण केळकर | महापालिका उपआयुक्त (मुख्यालय) | सदस्य |
| ३ | श्री. शिवमुर्ती नाईक | महापालिका उपआयुक्त | सदस्य |
| ४ | श्री. डॉ. बी.एस.बावस्कर | विशेष कार्यअधिकारी विभागप्रमुख आरोग्य | सदस्य |
| ५ | श्री. नाकाडी | मुख्य लेखापरीक्षक | सदस्य |
| ६ | श्री. राजकुमार कांबळे | मागासवर्गी प्रतिनिधी अधिकारी | सदस्य |

वरील समितीकडुन घेण्यात व शिफारस करण्यात आलेल्या उमेदवाराचे करारपध्दतीने नेमणुकीस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये मंजूरी घेऊन ६ महिन्याचे कालावधीसाठी मंजूरी घेण्यात आलेली आहे. यापैकी बऱ्याच कर्मचाऱ्यांची ६ महिन्याची मुदत जुलै महिन्यात संपते. महानगरपालिका क्षेत्रात आतापर्यंत
महानगरपालिका जुने कार्यालय,
जय अंबे नगर, गणेश देवल नगर,
नवघर शाळा इमारत,
बंदरवाडी शाळा इमारत,
नयानगर,
पेणकरपाडा,
काशीगाव व घोडबंदर, या विभागात फिरता दवाखाना सुरु करण्यात आलेला असून उत्तन विभागात लवकरच आरोग्य केंद्र सुरु करण्यात येईल. महानगरपालिकेने सुरु केलेल्या आरोग्य केंद्रात रोज सरासरी ५०० रुग्ण तपासून त्यांना औषोधोपचार करण्यात येतो. महानगरपालिकेने सुरु केलेल्या आरोग्य केंद्रात नेमलेल्या कर्मचाऱ्यांची सवर्गानुसार नावे, त्यांचा हजर दिनांक व ६ महिने पूर्ण होण्याची तारीख खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

एकूण - ४१ कर्मचारी

| नाव | हजर दिनांक | ६ महिन संपल्याचे मुदत दिनांक |
|---|---|---|
| डॉ. आनंद सोनटक्के | १२/१/२००४ | ११/७/२००४ |
| डॉ. चंद्रशेखर कांबळे | २८/१/२००४ | २७/७/२००४ |
| डॉ. हेमंत सुर्यवंशी | २९/१/२००४ | २८/७/२००४ |
| डॉ. प्रमोद पडवळ | ९/२/२००४ | ८/८/२००४ |
| डॉ. अंजली पाटील | १९/१/२००४ | १८/७/२००४ |
| डॉ. रत्नप्रभा पिसाळ | १६/२/२००४ | १५/८/२००४ |
| डॉ. नंद किशोर लहाने | २२/१/२००४ | २१/७/२००४ |
| डॉ. वंदना पाटील | १७/३/२००४ | १६/९/२००४ |
| **एन. एम.** | | |
| श्रीमती लिटा कारवालो | २८/१/२००४ | २७/७/२००४ |
| श्रीमती ज्योती सातवे | १९/१/२००४ | १८/७/२००४ |
| श्रीमती रसिका दळवी | १९/१/२००४ | १८/७८२००४ |
| श्रीमती मीना तेरडे | १२/१/२००४ | ११/७/२००४ |
| श्रीमती मेघना चुरी | ९/२/२००४ | ८/८/२००४ |
| श्रीमती शकुंतला देवळेकर | १९/१/२००४ | १८/७/२००४ |
| श्रीमती जागृती वेताळे | १/३/२००४ | ३१/८/२००४ |
| श्रीमती रुचिता संखे | १५/३/२००४ | १४/९/२००४ |
| **फार्मासिस्ट कम लिपिक** | | |
| श्री. राहुल भोईर | १२/१/२००४ | ११/७/२००४ |
| श्री. सचिन करंडे | १०/२/२००४ | ९/८/२००४ |
| श्रीमती रुपाली करंडे | १९/१/२००४ | १८/७/२००४ |
| श्रीमती कामिनी चौधरी | १९/१/२००४ | १८/७/२००४ |
| श्री. संजीव धुमाळे | १९/१/२००४ | १८/७/२००४ |
| श्रीमती वैशाली मोरे | २८/४/२००४ | २७/१०/२००४ |
| श्री. प्रकाश थोरात | १५/३/२००४ | १४/६/२००४ |
| श्री. सुधीर पावले | १६/४/२००४ | १५/१०/२००४ |
| **ए. एन. एम.** | | |
| श्रीमती रेश्मा शेट्टी | १९/१/२००४ | १८/७/२००४ |
| श्रीमती रुपाली दरेकर | २०/१/२००४ | १९/७/२००४ |
| श्रीमती भोंगाडे पदमा | १९/१/२००४ | १८/७/२००४ |
| श्रीमती परिदा पठाण | १९/१/२००४ | १८/७/२००४ |
| श्रीमती मनिषा हिंदळेकर | २०/१/२००४ | १९/७/२००४ |
| श्रीमती संध्या शिंगाडे | २७/१/२००४ | २६/७/२००४ |
| श्रीमती प्रिया पागधरे | १९/१/२००४ | १८/७/२००४ |
| श्रीमती शितल पवार | १९/१/२००४ | १८/७/२००४ |
| श्रीमती सरिता ठाणकर | १९/१/२००४ | १८/७/२००४ |
| श्रीमती प्रमिला देसाई | १९/१/२००४ | १८/७/२००४ |
| श्रीमती सिमा चव्हाण | १९/१/२००४ | १८/७/२००४ |
| श्रीमती जयश्री सावंत | २५/३/२००४ | २४/९/२००४ |
| श्रीमती निलीमा मोकल | १६/३/२००४ | १५/९/२००४ |
| श्रीमती जॉयसी हेन्ड्रीक्स | ८/३/२००४ | ७/९/२००४ |
| श्रीमती प्रतिक्षा संखे | १७/३/२००४ | १६/९/२००४ |
| श्रीमती अश्विनी पोतदार | ५/३/२००४ | ४/९/२००४ |
| श्रीमती संदेना पवार | १२/३/२००४ | ११/९/२००४ |

एकूण ४१ कर्मचारी, वरील सर्व कर्मचाऱ्यांचे काम समाधानकारक असून मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ५३ अन्वये सदर कर्मचाऱ्यांचे करारपध्दतीने नेमणुकीस प्रत्येक कर्मचाऱ्यांची ६ महिन्याची मुदत संपल्यानंतर सदर कर्मचाऱ्यांची सेवा खंडीत करुन पुन्हा नव्याने ठेका पद्धतीने ६ महिन्यासाठी नेमणूक करावी असा ठराव ही महासभा मंजूर करीत आहे.

**सुचक :- श्री. रविंद्र माळी. अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**मा. महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ११ चे वाचन केले.)

**हॅरल बोर्जिस :-**

विषय क्र. ११ महानगरपालिकेच्या आरोग्य केन्द्रात मानसेवी तज्ञामार्फत विशेष सेवा उपलब्ध करणेबाबत महानगरपालिका ठराव क्र. ५ दिनांक १९/०४/२००३ अन्वये महापालिका क्षेत्रात खालीलप्रमाणे आरोग्य केन्द्र सुरु करण्यास मंजुरी दिलेली आहे.

(ठरावाचे वाचन केले.)

**शानू गोहिल :-**

मी त्याला अनुमोदन देत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अध्यक्ष महाशय, हा जो प्रस्ताव आलेला आहे तो चांगला आहे. पण त्याच्यामध्ये जी रक्कम आपण डॉक्टरांनी पाचशे आणि दोनशे रुपये मानधन देणार आहोत. माझा अनुभव आहे. आधी केशवसृष्टीमध्ये अन्य ठिकाणी अशी सेवा सुरु केली होती. किती मेडिकल असोसिएशनवाले किंवा किती डॉक्टर बोलले की, आम्ही तुम्हाला सेवा देऊ. कारण त्यांना एक पेशन्ट बघितल्यावर पाचशे रुपये ऑन दी स्पॉट मिळतात आणि त्यांच्याकडे आठवड्यातुन दोनदा आणि महिन्यातून कमीत कमी आठ दिवस, दोन तास हे शक्य होणार नाही म्हणून जी रक्कम पाचशे, दोनशे रुपये आहे. त्याच्यामध्ये वाढ करावी. ज्यामुळे ते सेवा देऊ शकतात. आपण ती घेऊ शकतो. नाहीतर ती सेवा सेवाच राहणार आहे. त्याच्यामध्ये आपल्याला काहीही उपयोग होणार नाही. तर याच्यामध्ये रकमेत थोडी वाढ करावी आणि ह्या प्रस्तावास माझी सुचना स्वीकारावी.

**प्रकरण क्र. ११ :-**

महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रात मानसेवी तज्ञामार्फत विशेष सेवा उपलब्ध करणे बाबत.

**ठराव क्र. १३ :-**

महानगरपालिका ठराव क्र. ०५ दि. १९/४/२००३ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात खालील प्रमाणे आरोग्य केंद्रे सुरु करण्यासाठी मंजूरी दिलेली आहे.

| **विभागाचे नाव** | **आरोग्य केंद्राची संख्या** |
|---|---|
| भाईंदर पूर्व | २ |
| भाईादर पश्चिम | २ |
| उत्तन | १ |
| मिरारोड | १ |
| काशी मिरा | १ |
| फिरता दवाखाना | १ |

मा. महासभेच्या ठरावानुसार महानगरपालिका क्षेत्रात खालील ठिकाणी आरोग्य केंद्रे सुरु करण्यात आलेली आहे.

- महानगरपालिका जुने कार्यालय,
- जय अंबे नगर, गणेश देवल नगर,
- नवघर शाळा इमारत,
- बंदरवाडी शाळा इमारत,
- नयानगर,

- पेणकरपाडा,
- कशीगाव व घोडबंदर, फिरता दवाखाना.

उत्तन विभागातील आरोग्य केंद्रात लवकरच आरोग्य केंद्र सुरु करण्यात येणार आहे. सद्या आरोग्य केंद्रात रोज सरासरी ५०० रुग्ण तपासून औषोधोपचार करण्यात येतो. आरोग्य केंद्रात येणाऱ्या या रुग्णांना विशेष वैद्यकिय सेवासाठी उपरोक्त ठिकाणी उपलब्ध असलेल्या आपल्याकडील डॉक्टरांकडूनच सदर वैद्यकिय सेवा उपलब्ध करुन द्यावी. म्हणून महापालिकेचे स्वतःचे नवीन हॉस्पीटल सुरु झाल्यानंतरच नवीन तज्ञ डॉक्टरांच्या सेवेचा विचार करण्यांत यावा असा ठराव ही महासभा मंजूर करीत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस. अनुमोदन :- सौ. शानू गोहील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १२ चे वाचन केले.)

**ज्युडी डिसोझा :-**

विषय क्र. १२, संगणक विभागासाठी पदनिर्मिती मंजुरीबाबत

(ठरावाचे वाचन केले.)

**गीता जैन :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकाश दुबोले :-**

संगणक विभागासाठी पदनिर्मिती प्रस्ताव मिरा भाईंदर महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर अनेक विभागामध्ये कर्मचारी वर्ग कमी आहे आणि हा पदनिर्मितीचा प्रस्ताव फक्त संगणक विभागापुरता मर्यादित आणलेला आहे. तर आरोग्य खाते, पाणी खाते आणि जे इतर विभाग आहेत त्यामध्ये पदांची आवश्यकता असेल तर ती देखील पाहणी करुन यांच्याबरोबर पदनिर्मितीचा प्रस्ताव पाठवुन द्यावा. म्हणजे शासनाकडुन मंजुरी करुन आणताना सर्व पदे मंजुर करुन आणता येतील.

**मा. आयुक्त :-**

आरोग्य खात्याचा प्रस्ताव झालेला आहे.

**प्रकाश दुबोले :-**

आरोग्य खात्याचा झालेला आहे. बाकीचे पाणीपुरवठा वगैरेची मंजुरी मिळालेली आहे का?

**मा. आयुक्त :-**

अजुन मिळालेली नाही.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, यामध्ये सिस्टिम मॅनेजर म्हणुन पद आहे. त्यामध्ये जी वयोमर्यादा दाखविलेली आहे. ती वयोमर्यादा ४५ वर्षे म्हटलेले आहे आणि पुढे म्हटले आहे. अनुभवी उमेदवारांच्या बाबतीत शिथिलता मग अनुभवी उमेदवारांच्या बाबतीत शिथिलता असेल तर वयोमर्यादा ३० किंवा ३५ दाखवाउ कारण वय ४५ पुन्हा अनुभव असल्यास शिथिलता म्हटले तर तो ५०-५५ वर्षाचा होईल. मग ५०-५५ वर्षाचा व्यक्ती आला तर मग अडचण होईल.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे. जेवढा त्या क्षेत्रातील ज्येष्ठ अधिकारी असेल तेवढा त्याच्या अनुभवाचा आपल्याला फायदा होईल. त्याची जर पेन्शनेबल सर्व्हिस असेल तर त्याला पेन्शन मिळेल. पेन्शनेबल सर्व्हिस नाही झाली तर त्याला पेन्शन मिळणार नाही.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, वयाची अट शासनाने कशी केलेली आहे की, रिटायरमेन्टचे वय ५८ ते ६० केलेले आहे. आणि आपण ४५ वर्षे अगोदरच देतो आणि पुन्हा त्यात वर्षाची शिथिलता म्हणजे ५५ वर्षाची व्यक्ती आली तर तीन वर्षेच काम करणार.

**मा. आयुक्त :-**

डिपार्टमेन्ट एस्टॅब्लिश करण्याच्या दृष्टिने आपल्या विभागाला अनुभवीच माणसाची आवश्यकता आहे. सिनिअर मोस्ट पोस्ट आहे.

**प्रकाश दुबोले :-**

ठिक आहे. वयोमर्यादा ३५ दाखवुन त्यामध्ये शिथिलता दिली तर मग ४० वर्षे ४५ वर्षाची व्यक्ती आली तर मग चालेल. पण ४५ वर्षात पुन्हा वयाची शिथिलता म्हटले तर ५५-६० वर्षाची व्यक्ती आली तर ती काय काम करणार?

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य प्रकाश दुबोलेजी आपण आता जो ठराव केलेला आहे. जो प्रशासनाने ठराव झाला. त्या पद्धतीने आपण ठराव केलेला आहे. त्याच्यामध्ये जे सेवा नियम आहेत ते याला लागु होणार आहेत. मा. प्रशासनाने ठराव केला त्या पद्धतीने आपण ठराव केलेला आहे.

**प्रकाश दुबोले :-**

त्यांनी आपल्याला लिस्ट दिलेली आहे. साहेब, संगणक विभाग पदे पोस्टींग कशी मंजुर करायची. त्याची शैक्षणिक पात्रता काय असेल? हे सर्व डिटेल दिलेले आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

साहेब, ग्रॅज्युएट असला पाहिजे अशी तुम्ही मागणी केलेली आहे आणि त्याला विद्यापिठाची माहिती असलेला पाहिजे. आता आपल्याकडे या ठिकाणी हा विषय घेताना विद्यापीठाचे किती शासकीय अधिकारी महानगरपालिकेत असतील? अशाचे आम्ही विचारायचे कारण नाही. ही पळवाट आहे. मला तर असे वाटते की, या विभागातील या मिरा भाईंदर क्षेत्रातील एकही उमेदवार नाही का? आपल्याकडे जी मुले बारावीपर्यंत शिकलेली आहेत. ते काय ते करु शकत नाहीत का? पण आपण हा मुद्दा कसा घेता? मग या भागातील नागरिकांना या विषयावर काहीच प्राधान्य मिळणार नाही. आपल्या मिरा भाईंदरचा का नसावा? आपण अशी अट घातलेली आहे तो पदवीधर असावा.

**चंद्रकांत वैती :-**

मा. पीठासीन अधिकारी साहेब आणि आयुक्ता साहेब प्रथम हा ठराव जेव्हा मांडला गेला तेव्हा आमच्या सन्मा. सदस्यांकडून व्यवस्थित ऐकला गेला नाही. आपल्यला ज्या पद्धतीचा ठराव दिला आहे. त्याच्यामध्ये आपण एकुण २५ पदे घेण्याचा प्रयत्न होता. परंतु, ज्या पद्धतीने ठराव केला त्या ठरावामध्ये याच्यापुर्वी एक शासकीय ठराव केलेला आहे. तो २९/०४/२००३ चा ठराव क्र. ७१ आहे. त्याच्यामध्ये आपल्याला फक्त दोनच पदे घ्यायची होती आणि ती दोन पदेच आपण सध्या शासनाकडुन मागवुन घेत आहोत आणि तेवढाच आकृतीबंध आपल्याला पाठवायचा आहे. त्याच्यामुळे आपल्या या गोषवाऱ्यामध्ये २५ जागा आपण संगणक चालकांसाठी दिलेल्या आहेत तर त्या घेत आहोत. तर आपण दोनच पदे घेत आहोत. उगीच त्याच्यामध्ये सदस्यांनी ठराव होताना लक्ष दिले असते तर हा गोंधळ उडाला नसता. धन्यवाद.

**प्रभात पाटील :-**

किती पदांना मंजुरी घेता? दोनच पदांना मंजुरी घेता जी अगोदर घेतलेली आहेत. मग एवढे विवरण कशाला दिले? या सभागृहाची दिशाभुल केली जाऊ नये.

**चंद्रकांत वैती :-**

आपल्याकडे कॉन्ट्रक्ट बेसीसवर आपले कर्मचारी आहेतच.

**प्रभात पाटील :-**

त्याच्यामध्ये तुम्ही म्हणता की, ते तज्ञ नाही आहेत. आयुक्त साहेब, तुम्ही यावर स्पष्टिकरण करा की, यांना काय म्हणायचे आहे.

**मा. आयुक्त :--**

मी जे विवरण दिलेले आहे या विवरणाप्रमाणेच पदनिर्मितीचा प्रस्ताव आहे. एकुण वेगवेगळ्या वर्गाची पदे आहेत. सिस्टिम मॅनेजरचे एक पद आहे. सिस्टिम ॲनालिसिस्टचे एक पद आहे. ॲडमिनिस्ट्रेशनचे एक पद आहे. प्रोग्रॅमरची दोन पदे आहेत. सी.एफ.सी. सुप्रिडेन्टची पाच पदे आहेत. आणि संगणक यंत्रचालकाची पंधरा पदे आहेत. आपल्याला दिलेलेच आहे.

**अनंत पाटील :-**

पीठासीन अधिकारी साहेब, आपल्याला विनंती करतो, पुर्वीपासुन म्हणजेच आपल्या या ग्रामपंचायतीपासुन काही लोक आपल्या या नगरपालिकेत काम करीत आहेत आणि हे काम करीत असतानाच पदोन्नतीचा जो प्रश्न आहे.

**परशुराम पाटील :-**

विषय क्र. १३ वर आपल्याला पत्रव्यवहार केलेला आहे.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य तुळशीदास म्हात्रे साहेबांनी जी आता चर्चा केली. अतिशय महत्त्वाचा विषय आहे आणि सुरुवातीपासुनच आम्ही या विषयावर बोलत आहोत. आपल्या पालिकेतील कर्मचारी आपण ट्रेनिंगसाठी पाठविले. कॉम्प्युटरचे शिक्षण देण्यासाठी पाठविले. ते काय अजुन याच्यासाठी तयार झाले नाहीत का?

**मा. आयुक्त :-**

ही जी पदनिर्मिती आहे. याच्यासाठी आपल्या महापालिकेतील जे पात्र कर्मचारी असतील त्यांना प्रथम समाविष्ट करुन घेण्याचा आम्ही प्रयत्न करु.

**जयंत पाटील :-**

साहेब, आतापर्यंत पालिकेमध्ये भरत्या झाल्या, आरोग्याचा याच्या अगोदरचा विषय आपण पाहिला. किती जण भाईंदर मधील आहेत. आरोग्याचा म्हणजे आता तुमची जी पदनिर्मिती अगोदरची झालेली आहे. भाईंदरमध्ये असले शिक्षण घेतलेले कुणी नाही का?

**मा. आयुक्त :-**

पुष्कळसे स्थानिक त्याच्यामध्ये आहेत.

**जयंत पाटील :-**

मग ही भरती कुठून झाली?

**मा. आयुक्त :-**

आरोग्याच्या ह्याच्यामध्ये भरपूर स्थानिक आहेत.

**जयंत पाटील :-**

किती जण आहेत?

**मा. आयुक्त :-**

डॉक्टर्स आहेत, नर्सेस आहेत. ओपन जाहिरात देऊन आपण ही भरती केलली आहे.

**जयंत पाटील :-**

आता ह्या विषयावर पण मी तेच बोलतो की, आपण शक्य होत असेल तर मिरा भाईंदर शहरामध्ये सुशिक्षित व बेकार तरुण आहेत आणि हे जे या पदासाठी लायक आहेत. त्यांना आपण घ्यावे अशी आमची विनंती आहे. नाहीतर या शहरातील तरुण कुठे जातील? त्यांना प्राधान्य द्यावे.

**आसिफ शेख :-**

आता जो ठराव सन्मा. सदस्या ज्युडी डिसोझा यांनी मांडलेला आहे आणि त्या ठरावास सन्मा. सदस्या गीता जैन यांनी अनुमोदन दिलेले आहे. मला वाटते ठरावामध्ये स्पष्ट असे म्हटलेले आहे की, जो प्रशासकीय काळात ठराव झाला. म्हणजे प्रशासकीय काळ कोणता? जेव्हा आपली महानगरपालिका स्थापन झाली आणि प्रभारी आयुक्त म्हणुन शिवमुर्ती नाईक ह्यांच्यामध्ये चार्ज होता. तेव्हा प्रशासकीय ठराव झालेला होता आणि तो प्रशासकीय ठराव क्र. ७१ दिनांक २९/०४/२००२ यामध्ये आपण संपुर्ण मिरा भाईंदर महानगरपालिका नवीन कर्मचरी आकृतीबंध मंजुरी प्रस्ताव हा तयार केला होता. त्या प्रस्तावामध्ये अनुक्रमांक २७ मध्ये सिस्टिम मॅनेजर म्हटले आहे आणि ती वेतनश्रेणी रु. ६५००/- ते रु. १०,५००/- दिलेली आहे आणि अनुक्रमांक २९ यामध्ये सिस्टिम ॲनालिसिस रु. ६५००/- ते रु. १०,५००/- ही दोनच पदे त्यावेळी प्रशासकीय काळात होती आणि या दोनच पदांना आज ही सभा मंजुरी देण्याचा ठराव पास झालेला आहे आणि आपण जेव्हा नव्याने भरती करू तेव्हा निश्चितपणे आपल्या मिरा भाईंदर परिसरातील स्थानिक लोकांना प्राधान्य देण्यांत येईल.

**प्रभात पाटील :-**

याच्यामध्ये काहीतरी गडबड होत आहे. कमिशनर साहेबांना बोलु द्या. इथे आणताना किती आणता?

**शशिकांत भोईर :-**

भरतीच्या निविदा काढता येतात का? आपण रुलिंग दिली भरतीच्या निविदा काढता येतात का? पीठासीन अधिकाऱ्यांना माझी विनंती आहे, संगणक विभागासाठी पदनिर्मिती प्रस्ताव मंजुरीबाबत जे आपण सिस्टिम मॅनेजमेंट पद, सिस्टिम ॲनालिस्ट पद ह्याचा प्रशासकीय ठराव ७१ झालेला आहे. २९/०४/२००० अन्वये मंजुर झालेला आहे. हा विषय इथे आणायला नको होता. कारण आपण अगोदर मंजुरी दिलेली आहे. तर पुन्हा पुन्हा देण्याची गरज नव्हती आणि सिस्टिम मॅनेजमेंट हे दोन वर्गाचे पद

असुन सदर पदाकरीता शैक्षणिक पात्रता बी.इ. कॉम्प्युटर असावा. मी जे बोलत आहे त्याचा उल्लेख करावा. विज्ञान शाखेचा अथवा कॉम्प्युटर शाखेचा पदवीधर असावा. तसेच वयोमर्यादा पस्तीस वर्षे असावी. कारण जर त्याला पंचेचाळीस वर्षाचे पद नियुक्तीमध्ये दिले तर तो माणुस वयाने जास्त झालेला असेल आणि काम करण्यास सक्षम असेल असे आपण सांगु शकत नाही. त्यामुळे आपण ती वयोमर्यादा पस्तीस वर्षे ठेवावी. आता संबंधित अधिकाऱ्यांनी स्वतःच्या भरतीकरीता सेवानियम तयार केलेला आहे हे लक्षात घ्यावे. नेटवर्क ॲडमिनिस्ट्रेटर व प्रोग्रॅम या खालच्या पदाकरीता डिग्री इंजिनिअर ही पात्रता असावी. परंतु, वरच्या पदाकरीता सोयीनुसार पात्रता ठरविलेली आहे. याचा सभागृहाने विचार करावा. कारण आपापल्या सोयीसाठी प्रत्येकाने पदनिर्मिती केली. सेवा नियम बनविलेले आहेत आणि आपल्या कर्मचाऱ्यांनी कॉम्प्युटरचे जे प्रशिक्षण घेतलेले आहे. ते खालच्या दर्जाचे आहे का? त्यांना आणखी प्रशिक्षण घेऊन त्यांची पदोन्नती होऊ शकत नाही का? कृपया याचा प्रशासनाने मला खुलासा करावा. मला सभागृहामध्ये स्पष्टीकरण पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

आपण ज्या प्रशासकीय ठरावाचा उल्लेख केलेला आहे. त्याच्यामध्ये सिस्टिम मॅनेजर आणि सिस्टिम ॲनालिसीस्ट त्याचप्रमाणे लिपिक या पदाचा समावेश होता. शासनाने जी मंजुरी दिलेली आहे. त्या मंजुरीमध्ये सिस्टिम ॲनालिस्ट आणि हे जे दुसरे सिस्टिम मॅनेजरचे पद आहे. ही पदे वगळून बाकीच्या पदांना मंजुरी दिलेली आहे. लिपिकाला मंजुरी दिलेली आहे. फक्त आपण जो संगणक यंत्रचालकाचा प्रस्ताव मांडलेला आहे. ती पदे पंधरा पदे आपण प्रथमच प्रपोज करीत आहोत. ही पंधरा पदे आपण जरी आता मंजुर करुन घेतली तरी याचा अर्थ आपण आता बाहेरुन ही पदे भरणार आहोत असे नाही. आपल्याकडे जे पात्र लोक असतील. सफाई कामगारांमध्ये, ड्रायव्हरमध्ये असतील किंवा आणखी कुठे असतील. तर त्याच्यातुन सुद्धा पात्र उमेदवारांना आपल्याला पदोन्नती देण्यासाठी ही पदे उपयोगाला येतील आणि प्रत्येकाला कॉम्प्युटरचे ट्रेनिंग या ठिकाणी देण्याचा आमचा प्रयत्न आहे. लिपिक वर्गाला जवळजवळ झालेले आहे. एम.एस.सी.आय.टी.ची परीक्षादेखील जवळजवळ ९०-९५ टक्के लोक पास झालेले आहेत. त्यांनादेखील ते पात्र असतील त्या पद्धतीने त्यांना या पदावर समाविष्ट करुन घेण्याचा आमचा प्लॅन आहे.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही आता जो या ठिकाणी प्रस्ताव दिला. तर आपण बाहेरुनच भरती करणार असे नाही. आपले हे जेवढे कर्मचारी आहेत, त्यांनासुद्धा आपण पदावर वर्ग करु शकता. मग हे स्पष्टीकरण करा. नाहीतर चालले आहे की, आता सन्मा. सदस्य आसिफ शेख नोकर भरतीचे निविदा काढणार होते.

**आसिफ शेख :-**

भरती करताना स्थानिक उमेदवारांना प्राधान्य द्यावे असे मी बोललो. निविदा काढण्याबद्दल आम्ही बोलत नाही. ते निविदा काढायला टेन्डर नाही.

**परशुराम पाटील :-**

मागच्या वेळीसुद्धा मी सभेत सांगितलेले की, आता १२० लोक जेव्हा भरली गेली. त्यावेळेला आयुक्त साहेबांनी मला सांगितले होते की, याच्यापुढे आम्ही स्थानिक लोकांचा विचार करुन तसा पत्रव्यवहार करुन आम्ही भरती करुन घेऊ. साहेब, बरोबर आहे ना. मला वाटते की, मला फक्त आश्वासन दिले होते. लेखी दिले नव्हते.

**मा. आयुक्त :-**

आश्वासन दिले होते. लेखी कळविले नव्हते का?

**परशुराम पाटील :-**

नाही. तसे नव्हते. म्हणुन आता हा प्रश्न उपस्थित राहिलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

मघासपासुन चर्चा सुरु आहे. आधी आपण ठराव क्र. ७१ च्याने दोन पदासाठी दिले होते. महापालिकेचे कामकाज वाढत आहे. कारभार वाढत आहे. नागरिकांचा किंवा त्या परिसराचा महापालिकेकडे बघण्याचा दृष्टिकोन आता सध्या बदलत चाललेला आहे. महापालिकेत लोकांना सोय मिळावी या दृष्टिकोनातुन संगणक कक्ष हा एक विभाग आपण सुरु करीत आहोत आणि माझ्या मते त्या विभागात लागलेली जी रिक्वायरमेन्ट आहे. त्याच्या रिक्रुटमेन्टसाठी प्रस्ताव आलेला आहे. दोन किंवा एका पदाचा हा विषय नाही आणि मघापासुन असे चालले आहे की, ही शैक्षणिक पात्रता आणि ह्याच्यासाठी शासनाचे पण निर्देश आहेत की, कोणत्या पदासाठी कोण कशा वयाचा असावा आणि शैक्षणिक पात्रता किती असावी? हा फार मोठा चर्चेचा विषय होऊ शकत नाही. यामध्ये एकच विषय

होऊ शकतो या ठरावाला पद निर्मितीसाठी आपण जेव्हा देतो. तर सभागृहाच्या ज्या आजच्या भावना आहेत. या सभागृहात जे सर्व नगरसेवक आहेत. त्यांना एक मनात धाकधुक वाटते की, कोणीतरी बाहेरचा माणुस याच्यावर इंपोज होईल का? सभागृहाचे याच्यामध्ये स्पष्ट मत राहिल, अपेक्षा राहिल की, जी आपल्या महापालिकेमध्ये जे कर्मचारी काम करीत आहेत. त्यांच्या वयानुसार त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार किंवा त्यांना शैक्षणिक पात्रतेची संधी देऊन एखादा कर्मचारी आपल्याकडे अनेक वर्षे काम करीत आहे आणि तो त्या क्वालिफाईडमध्ये डिग्री झालेला नाही. जसे महाविद्यालयामध्ये एम.ए. पास झाल्यानंतर तो सिनियरसाठी शिकवू शकतो. पण त्याला कन्डिशन आहे की, दोन वर्षे तरी नेटसेट केले पाहिजे. तसे आपल्या महापालिकेच्या ठरावामध्ये प्रोव्हिजन करा की, महापालिकेत जो कर्मचारी काम करीत आहे, त्याला अनुभव आहे, त्याचे त्याच्यामध्ये वय बसते, शैक्षणिक पात्रता बसते, पण नवीन पदवी मिळत नाही. तर त्याला पदवी घेण्याची संधी देऊन कृपया त्याला प्राधान्य द्यावे. ही त्याच्यात दुरुस्ती असावी. काही कर्मचारी जे अनेक वर्षे काम करतात. त्यांना ती संधी मिळेल आणि कुणावर अन्याय झाला असे होणार नाही. मघासपासुन जे चालले आहे ते स्वाभाविक आहे. महापालिका वाढल्यानंतर महापालिकेत राहणाऱ्या नागरिकांची एक अपेक्षा आहे की, या महापालिकेमध्ये आमच्या मुलांना नोकरी मिळावी. पण तसे होत नाही. मागच्या वेळी भरती झाली आणि त्यावेळी एक प्रक्षोभ दिसुन येत होता. पण इलाज नव्हता. सरकारचा आदेश होता की, जे मागासवर्गीय आहेत, एस.सी., एस.टी. सीट तेवढ्या भरायच्या होत्या आणि तेवढ्या एस्.सी., एस्.टी. सीट बद्दल एक तर मी अपेक्षा करतो की, जेव्हा अशा सीट येतात. जेव्हा आपण अशी भरती करतो. त्याची सभागृहाला माहिती द्या. ज्यांना याच्यात रूचि आहे. ते मेहनत करतील. काही जणांची समाजकल्याण कार्डची नोंदणी होत नाही. आजही आयुक्त साहेबांकडे तशी निवेदने आली असतील. अनेकांची मुले या ठिकाणी पदवीधर झालेली आहेत. पण त्यांनी ती नोंदणी केलेली नाही. समाजकल्याणकडून त्यांना कॉल आला नाही. एन्ट्रीचा कॉल आला नाही. त्यामुळे तुम्ही घेऊ शकले नाहीत. ज्यांना आले होते त्यांच्या आपण शिफारशी केल्या. मलाही थोडेसे असे वाटते. सांगायला हरकत नाही की, ज्यांनी ज्यांनी आपल्याकडे शिफारशी केल्या त्यांना त्या कमिटीने संधी देण्याचा प्रयत्न केला. पण जी भरती होणारच आहे. याची पुर्ण जाणीव जर आधी झाली असती तर आणखी लोकांना आपण संधी देऊ शकलो असतो. याच्यापुढे हे संगणक कक्ष असू दे किंवा अन्य विभाग असू दे. याच्यामध्ये होणारी भरती या सभागृहाला वाचन करून दाखवायला पाहिजे अशी आमची अपेक्षा नाही. पण साधारणतः नगरसेवकांना या कामकाजाशी संबंधीत असलेल्या लोकांना माहिती व्हावी. या महापालिकेत आता शासनाचा आदेश झालेला आहे की, ओपनमधील भरती व्हायची आहे आणि होतेवेळी जसा मागे प्रक्षोभ झाला होता की, आमच्या मुलांना संधी मिळाली नाही. आता ओपनमध्ये भरती होईल. आपण भरती कधी करणार? काय करणार? आपली आता रिक्वायरमेंट किती आहे? याची थोडी जाणीव दिली तर बरे होईल. धन्यवाद!

**प्रकरण क्र. १२ :-**

संगणक विभागासाठी पदनिर्मिती प्रस्ताव मंजुरी बाबत.

**ठराव क्र. १४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे विविध प्रशासकीय विभाग असुन त्यात मुख्यत्वे पाणी पट्टी, मालमत्ता कर, जन्म मृत्यु, आवक जावक, आरोग्य, आस्थापना, सचिव विभाग, सार्व. बांधकाम, लेखा विभाग इत्यादी विभाग आहेत. पाणीपट्टी व मालमत्ता कर हे महानगरपालिकेचे मुख्य उत्पन्नाचे साधन असुन सदर विभागाचा संबंध हा सर्वसाधारणपणे नागरिकांशी प्रत्यक्षपणे येतो. अशा वेळी महानगरपालिकेच्या विविध प्रभाग कार्यालयात तसेच विभागीय कार्यालयात येणाऱ्या नागरीकांना त्यांच्या कराची व अन्य रक्कम भरणा करणे संगणकीकरणामुळे सुलभ होईल. एका प्रभागामधील माहीती अन्य प्रभागात सुद्धा एखाद्या नागरिकांना उपलब्ध करुन देणे संगणकीकरणामुळे शक्य होवू शकते. त्यामुळे नागरी समस्यांचे निराकरण त्वरीत करणे शक्य होईल. तसेच संगणकीकरणामुळे महानगरपालिकेच्या कामात सुरळीतपणा/सोपेपणा येवून त्यामुळे महानगरपालिकेच्या सर्व विभागात समन्वय राखणे सोयीचे होईल. संगणकीकरणामुळे मनुष्यबळाचा कमी वापर होऊन अचुक व तत्परतेने कामे उरकणे शक्य होईल. त्यामुळे महानगरपालिकेच्या प्रशासकीय खर्चातही बचत होईल. तसेच महानगरपालिकेचे संणकीकरण करण्याबाबत शासनाचे सुद्धा स्पष्ट निर्देश असल्याने महानगरपालिकेचे संपूर्ण संगणकीकरण करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. परंतु भविष्यात संगणकीकरण केल्यावर संगणक चाविण्याकरीता संगणक विषयक तांत्रिक ज्ञान अवगत असलेला कर्मचारी वर्ग आस्थापनेवर कार्यरत असणे आवश्यक आहे. महानगरपालिकेचे संपूर्ण संगणकीकरण करण्याच्या दृष्टीने संगणक विभाग अद्यावत सुरु करण्यासाठी प्रशासकीय ठराव क्र. ७१, दि. २९/०४/२००२ प्रमाणे व सध्या महापालिका

सेवेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांमधून संगणक विषयी आवश्यक तांत्रिक ज्ञान धारण करीत असलेला कर्मचारी वर्ग नेमणुक करणे आवश्यक आहे. त्यानुसार कर्मचारी आकृतीबंध मा. सचिव सो., नगरविकास विभाग, मुंबई यांचेजवळ पाठविणेस मंजुरी देण्यांत येत असून पद मंजूरी मुळे येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूर देण्यांत येते.

**सुचक :- श्रीम. ज्युडी डिसोजा.** **अनुमोदन :- श्रीम. गीता जैन.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १३ चे वाचन केले )

**परशुराम पाटील :-**

विषय क्र. १३ चे मी निवेदन दिले होते ते जरा आपण वाचून दाखवावे.

**शानु गोहिल :-**

विषय क्र. १३ और विषय क्र. १४ की टिपणी नही है।

**रोहित सुवर्णा :-**

१३ आणि १४ नंबरचे आमच्याकडे पान नसल्यामुळे आपण हा विषय पुढच्या सभेत घ्यावा.

**मॉरस रॉड्रिक्स :-**

यांच्यासाठी लेखी काही नव्हते. हा विषय आपल्या सभागृहामध्ये आहे. ह्या पाणपट्टेबद्दल आपण आपला हा विषय या ठिकाणी मंजुर करून सचिवालयात पाठवित आहोत. तिकडून मंजुरी होणार आहे. उल्हासनगर सभागृहामध्ये हा विषय पास झालेला आहे आणि त्यांची पदोन्नती झालेली आहे. ओपनमध्ये त्यांना पदोन्नती होते तशी आपण आपल्या सभागृह नेत्यांना पदोन्नती शिफारस करावी. टिपणीची जरूर नाही. फक्त आपण त्यांना द्यायचे इथे आपल्यासाठी पाहिजे. ओपन मध्ये मिळू शकते.

**रतन पाटील :-**

साहेब, टिपणीच दिली नाही असे काय करता? प्रत्येक ह्याची देता. मग ह्याच विषयाची टिपणी का दिली गेली नाही. काहीही असो, बायोडेटा असो, असला तरीसुद्धा चालू शकते. काहीही दिलेले नाही.

**रोहित सुवर्णा :-**

विषय नही दिया गया।

**परशुराम पाटील :-**

पत्र जरा वाचून दाखवा .

(सन्मा. सदस्य श्री. चंद्रकांत वैती यांनी ठरावाचे वाचन केले )

**हॅरल गोविंद :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रोहित सुवर्णा :-**

महापौर साहेब १३ नंबर आणि १४ नंबरचे प्रकरण आमच्या समोर नाही आहे. साहेब आम्ही निर्णय घेण्याकरिता निषेध करतो. तुम्ही वाचून काय दाखवता? आम्हाला सात दिवसाच्या आधी टिपणी द्यायला पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सात दिवसाच्या आधी टिपणी दिली पाहिजे. टिपणी पण दिली नाही. हा विषय तुम्ही कशाला घेता?

**रोहित सुवर्णा :-**

अशा पद्धतीचे काम चालणार नाही.

**मा. महापौर :-**

सभासदांनी आपसात बोलू नये. प्रत्येक सभासदाला बोलण्याची संधी आहे. प्रत्येक सभासदाला बोलता येते.

**मिलन म्हात्रे :-**

महापौर साहेब, याच्यात तुम्ही रितसर टिपणी पाठवा आणि मग निर्णयला ठेवा. आम्हाला जी माहिती नाही त्याचा निर्णय आमच्याकडे कशाला मागता? तुम्ही परस्पर पास करून घ्या. विरोधी पक्ष नेते तुम्ही बोलू नका तुम्ही आमचे नेते आहात. तुमच्याकडे कॉपी आहे?

**मा. महापौर :-**

सन्मा सदस्य परशुराम पाटील साहेब, सभासदांनी आपसात बोलू नये.

**मिलन म्हात्रे :-**

जे पत्रव्यवहार आम्हाला सात दिवसाच्या अगोदर कळविले गेले नाहीत. नियमानुसार त्याचा विचार या ठिकाणी होणार नाही. आमचे पत्र तुम्ही घेणार का? त्या पत्रावर तुम्ही विचार कराल का? त्याच्यावरचे नियम वाचून दाखवता तुम्ही. बोलता, ठराविक वेळेवर पत्र न मिळाल्यामुळे विचारात घेता येणार नाही. त्यांचे फेटाळता तुम्ही? फेटाळले का? हे चालणार नाही. हे दोन्ही विषय तुम्ही पुढच्या सभेला ठेवा. याची टिपणी दिलेली नाही. आमच्या पत्राचा विचार केला जात नाही. हा विषय लेट घ्यायचा. आमचा विरोध नोंदवून घ्या. या टेक्निकल पॉईंटचा आमचा विरोध नोंदवून घ्या आणि तुमचे सभागृह तुम्ही चालवा. तुमचे पीठासीन अधिकारी बोलू देत नाहीत. महापौरांनी कोणाला बोलू दिले पाहिजे की नाही.

**मा. महापौर :-**

विरोधी पक्षनेत्यांच्या पत्राचे वाचन करावे.

(प्र. सचिवांनी पत्राचे वाचन केले )

**रोहित सुवर्णा :-**

आम्हाला माहिती पाहिजे तुम्ही काय पत्र दिले? हा विषय पुढे घ्यावा.

**मिलन म्हात्रे:-**

विरोधी पक्ष नेत्यांनी या सभागृहात सभागृहनेत्यांना विश्वासात घेतले पाहिजे. मघाशी प्र. सचिवांनी जे पत्र वाचून दाखविले हे पत्र आमच्याकडे नाही आहे. आपण त्याची झेरॉक्स आम्हांला दिली का? याबद्दल आम्हांला काहीच माहिती नाही आणि तुम्ही जर ती माहिती दिली असती तर हा विषय आला नसता आणि मघाशी त्यांनी तो विषय वाचून दाखविला. जे पत्र आमच्याकडे नाही आहे. ही पद्धती चुकीची आहे. आम्हांला रितसर सात दिवस अगोदर द्या. आम्हांला काही कळू द्या आणि ज्या अधिकाऱ्यांबद्दल बोलतो आणि ज्या नगरपालिकेचा इकडे तुम्ही हवाला दिलेला आहे, आज महापौर साहेब मी तुम्हांला सांगतो त्या-त्या महानगरपालिकेचे दाखले तुमच्याकडे आहेत का? त्या अधिकाऱ्यांनी तिकडे चांगली कामे केलेली आहेत म्हणून. त्या तिकडच्या महानगरपालिकेचा कॉन्फीडेन्शिअल रिपोर्ट तुम्ही मागितला का? तुम्ही जर ठाणे महानगरपालिकेचा किंवा उल्हासनगर महानगरपालिकेचा हवाला या ठिकाणी देता तर त्या महानगरपालिकेचे कॉन्फीडेन्शिअल रिपोर्ट तुम्ही मागवा. ते सर्व्हिस पेपर आणि कॉन्फीडेन्शिअल रिपोर्ट न वाचता जर निर्णय घ्याल तर ते चुकीचे आहेत. मला माहिती आहे, कॉन्फीडेन्शिअल रिपोर्ट काय आहेत ते. तुम्ही सगळा साधकबाधक विचार करा आणि नंतर निर्णय घ्या. ठराव ठेवला, लगेच मंजुर झाला असे चालणार नाही. आज एक अधिकारी पाच महिने या ठिकाणी बिनपगारी आहे. मला सांगा, आपण जर आस्थापनेवर पगार दिला नाही तर तो अधिकारी राहिला नाही पाहिजे.

**मा. महापौर :-**

तुमचा विरोध नोंदविण्यात आला आहे.

**रोहित सुवर्णा :-**

विरोध देखील आहे आणि निषेध देखील आहे.

**मिलन म्हात्रे :-**

माणूस बिनपगारी आपल्या नगरपालिकेत काम करीत आहे. एक शिपाई पण काम करू शकत नाही आणि त्याकरीता जर नगरपालिका आणि आस्थापनाने पगार द्यायला बंद केले म्हणजे त्या अधिकाऱ्यांची नोकरी संपली.

**परशुराम पाटील :-**

साहेब, हे जे वाचन केले त्यावर आपण काय निर्णय देणार?

**मा. महापौर :-**

तुमचे पत्र वाचून झाले. त्यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

**परशुराम पाटील :-**

टिपणी आली नव्हती.

**मा. महापौर :-**

ठराव झालेला आहे. अनुमोदन झालेले आहे.

**रोहित सुवर्णा :-**

ते तर ठिक आहे. पण कामाची पध्दत आहे का? कॉन्फिडिन्शीअल रिपोर्ट मागवा. सर्व्हिस रेकॉर्ड मागवा.

**मा. महापौर :-**

आपल्या माहिती करीता सांगतो. ठराव झालेला आहे. त्यामध्ये असे सांगितले आहे. सभागृहाची मान्यता घेतल्यानंतर हा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात येणार आहे आणि शासन कोणत्याही प्रकारची मंजूरी देण्याआधी ही सर्व गोष्ट व्यवस्थित रितीने पाहणार आहे. आपण महाराष्ट्र शासनापेक्षा मोठे नाही आहोत.

**रोहित सुवर्णा :-**

अनेक सर्क्युलर आहेत. ३ फेब्रुवारी १९८८ चे सर्क्युलर आपण लक्षात घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अशा पद्धतीने जर तुम्ही निर्णय देणार आहात आणि विषयपत्रिका मिळाल्यानंतर टिपणी मिळत नाही तर असे चालणार नाही. ही सभागृहामध्ये दादागिरी झाली.

**मा. महापौर :-**

आपण वापरलेले शब्द कृपया मागे घ्या.

**(सभागृहात गोंधळ)**

**रोहिदास पाटील :-**

पीठासीन अधिकाऱ्यांना विनंती आहे, एखाद्या अधिकाऱ्यांची आपण कायम स्वरूपी नेमणूक करतो. सभागृहात त्याला कोण विरोध करेल. नाही करणार हा एक वेगळा विषय आहे. त्यांची पात्रता, अपात्रता, त्याची शैक्षणिक पात्रता, त्यांची गुणवत्ता हा एक वेगळा विषय आहे. मी फक्त एवढ्यासाठीच बोलतो आता की, त्या सभागृहाच्या कामकाजाच्या पध्दतीसाठी एकतर विरोधी पक्षनेता म्हणून सभागृहातील सन्मा. सदस्य परशुराम पाटील यांनी तुम्हाला पत्र दिलेले आहे. सभागृह नेता काय बघतात? ते मला समजत नाही. तिकडेही बघतात, इकडेही बघतात. ही जी कामाची पध्दत आहे की, जेव्हा सभागृहात सन्मा. सदस्य सांगत आहेत की, कोणताही ठराव बहुमताने पास करू शकता तुम्हाला, जाहिर मतदान करण्याची वेळ येत नाही. हे ही आम्हाला माहित आहे. पण जेव्हा कामकाज करता त्या कामकाजाची जेव्हा सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांना त्यांचा बायोडेटा पाठ आहे, असू शकेल. त्याबद्दल काही तक्रार नाही. पण कामकाजाची पध्दती म्हणून सभागृह नेते बोलणार नाहीत. पीठासीन अधिकारी म्हणून आपण बोलणार नाहीत. विरोधी पक्ष नेते बोलणार नाहीत. म्हणून सभागृहाचे कामकाज अशाच पध्दतीने चालणार असे आम्ही समजायचे की, तुम्ही ठराव मंजूर केला म्हणून पुढे काम चालवणार मग आम्ही आमचा निर्णय घेतो.

**मा. महापौर :-**

काम पुढे चालवणार.

**रोहिदास पाटील :-**

पुढे काम चालवणार तर मग आम्ही सभात्याग करणार. ही कामाची पद्धतच नाही. तुम्ही सभागृहासमोर आणलेले कागदपत्र, ती सिस्टिम, महापालिकेच्या कामकाजाला तुम्ही ब्रेक करता आणि म्हणून भारतीय जनता पार्टी, शिवसेना आणि आमच्या सोबत येतील ते आम्ही सभागृहाच्या बाहेर जातो. तुम्ही कामकाज प्रेमाने चालवावे. आम्ही कुठल्याही व्यक्तीला विरोध करीत नाही.

**रोहित सुवर्णा :-**

आम्ही सकाळी पत्रकारांना इश्यु करणार तेव्हा तुम्ही बोलणार की, आम्ही नंतर निर्णय घेऊ. तेरा आणि चौदा नंबरच्या विषयाला आम्ही सभागृहामध्ये येत नाही. १५ नंबरच्या विषयाला आम्ही येऊ. तुम्ही आम्हाला माहिती द्या. तुम्ही सिस्टिम बदलता आणि तुम्ही सिस्टिम इम्लिमेन्ट पण करीत नाहीत हे चुकीचे आहे.

**(भारतीय जनता पार्टी, शिवसेना, व जनता दलच्या सदस्यांनी सभात्याग केला.)**

**प्रकरण क्र. १३ :-**

डॉ. एस. एस. पानपट्टे, उपआयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना लोकसेवा हितार्थ कायम स्वरुपी उपआयुक्त पदी महानगरपालिकेत समाविष्ट करुन घेणे बाबत.

**ठराव क्र. १५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर एकूण तीन उपआयुक्त पदे मंजूर आहेत. सद्या तीनही पदावर शासनाकडून प्रतिनियुक्तीने उपआयुक्त काम करीत आहेत. प्रतिनियुक्तीने आलेले उपआयुक्त सतत बदलत असतात तेव्हां एखादा कायमस्वरुपी उपआयुक्त असल्यास त्यास प्रशासनाच्या कामकाजाची माहिती असते व त्यामुळे प्रशासन सुरळीत चालण्यास मदत होत असते.

डॉ. एस्. एस्. पानपट्टे यांनी यापूर्वी उल्हासनगर महानगरपालिकेत उपआयुक्त या पदावर अडीच वर्षे काम केलेले आहे व त्यांनी अतिक्रमण विभाग व आरोग्य विभागाची जबाबदारी चांगल्या प्रकारे पार पाडलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेत सुवर्ण जयंती रोजगार योजनेचे सन २००३-२००४ चे उद्दीष्टाच्या २०० ते ३००% ने अधिक उद्दीष्ट साध्य केले आहे व १७ वी पंचवार्षिक पशुगणना २००३ हे काम मिरा भाईंदर महानगरपालिकेने सर्वात प्रथम केले आहे. त्याबद्दल मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे ह्यांचे अभिनंदन पत्र दिलेले आहे.

डॉ. एस्. एस्. पानपट्टे हे स्वतः पशूवैद्यक असल्यामुळे पशूसंवर्धन विषयक सर्व कामे उदा. कत्तलखाना उभारणे, मांस विक्री परवाना देणे, मोकाट कुत्र्यांची संख्या नियंत्रीत करणे इत्यादी कामे हाती घेतलेली आहेत. डॉ. एस्. एस्. पानपट्टे यांनी उपआयुक्त पदावर महानगरपालिकेत कायम स्वरुपी समाविष्ट करुन घेण्याबद्दल संमती पत्र दिले आहे.

त्याकरिता डॉ. एस्. एस्. पानपट्टे यांना उपआयुक्तपदी लोक सेवा हितार्थ मिरा भाईंदर महानगरपालिकेत कायम स्वरुपी समाविष्ट करुन घेण्यांस ही मा. सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्रीम. हेलन गोविंद.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

विषय क्र. १४ वा घेण्यात यावा.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १४ चे वाचन केले.)

**जेन्वी आल्मेडा :-**

विषय क्र. १४ गोषवारा नसल्याने आपल्या कर्मचाऱ्यांची माहिती आणून पुढील सभेत सदर विषय घ्यावा असा ठराव मी मांडत आहे.

**गिता जैन :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. १४ :-**

महानगरपालिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत.

**ठराव क्र. १६ :-**

सदरचा गोषवारा उपलब्ध नसल्याने व सदर ठरावाबाबत योग्य ती माहिती उपलब्ध नसल्याने सदरचा विषय पुढील सभेत घेण्यांत यावा.

**सुचक :- श्रीम. जेन्वी अल्मेडा.** **अनुमोदन :- श्रीम. गिता जैन.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(जनता दलचे सदस्य पुन्हा सभागृहात आले.)**

(प्र. सचिवांनी विषय क्र. १५ चे वाचन केले.)

**रविंद्र माळी :-**

प्रकरण १५ वर तात्पुरता स्वरूपाची मुदतवाढ पाच महिने देण्यात यावी असा मी ठराव मांडीत आहे.

**सुरेखा गायकवाड :-**

मी त्याला अनुमोदन देत आहे.

**शशिकांत भोईर :-**

पीठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीने बोलतो आपण आजपर्यंत शासनाकडे आरोग्य अधिकारी पदासाठी किती पत्रव्यवहार केला? आणि त्यांनी त्याची किती उत्तरे दिली? हा माझा प्रश्न आहे. जे आरोग्य अधिकारी आपल्याला पद भरायचे आहे. त्यासाठी किती पत्रव्यवहार केला? आणि त्याची उत्तरे आपल्याला काय मिळाली? आपण किती पत्रव्यवहार केलेला आहे त्याबद्दल कारवाई काय आहे. हे पद आहे की, ते अधिकारी मिळत नाहीत याबद्दल खुलासा करावा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ नुसार मुख्य वैद्यकिय व आरोग्य अधिकारी हे पद मंजुरीसाठी आपण प्रस्ताव पाठविलेला होता. राज्य शासनाने त्यामध्ये मुख्य वैद्यकिय अधिकारी या पदाची पद स्थापना न करता आरोग्य अधिकारी असा त्यामध्ये उल्लेख केला आहे. त्यामुळे तो प्रस्ताव दुरुस्तीसाठी आपण शासनाकडे फेर पाठविला आहे आणि त्याची दुरुस्ती आल्यानंतर लगेच पद भरण्याची कारवाई करण्यांत येईल.

**शशिकांत भोईर :-**

पिठासिन अधिकारी साहेब, त्या संदर्भात आरोग्य अधिकारी हे पद मंजुर होऊन आले तर आपण वैद्यकिय आरोग्य अधिकारी असा बदल का करण्यात आला? तसेच त्याचे सेवानियमसुद्धा प्रशासनाकडून सादर केलेले नाहीत.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

आरोग्य अधिकारी म्हणून त्यामध्ये मुख्य वैद्यकिय व आरोग्य अधिकारी असे ४५ सेक्शनखाली पद आहे. त्यामध्ये तसा दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव आपण शासनाकडे पाठविलेला आहे आणि ती दुरुस्ती शासनाकडून मान्य झाल्यानंतर लगेच ती पदे भरण्याची कारवाई केली जाईल.

**शशिकांत भोईर :-**

आणखी दुसरे म्हणजे डॉ. बावस्कर यांना आपण घनकचरा व्यवस्थापन करण्यासाठी नियुक्ती केली होती हे आपण सर्वप्रथम प्रशासनाने लक्षात घ्यावे. मी दोनदा पत्रव्यवहार केला की, प्रदुषणाबाबतचा जो पर्यावरण अहवाल आहे. गेल्या मागील दोन वर्षाचा मागितलेला. पण अद्याप सादर केला नाही. आता पुन्हा एक नवीन पत्र दिले तरी त्या प्रस्तावाची प्रत मला मिळाली नाही की, त्या पर्यावरण अहवालाचे काय झाले आहे?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब, या ३१ जुलै अगोदर पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल सभागृहासमोर सादर केला जाईल आणि तो ३१ जुलैपुर्वी सादर करावयाचा आहे.

**शशिकांत भोईर :-**

मागील दोन वर्षाचा अहवाल कुठे आहे? तो आपण सादर केलाच नाही. का केला नाही? याचे मला उत्तर द्यावे. कारण काय होते?

**रोहित सुवर्णा :-**

कलम ६७(अ) हा कलम जरा आपण वाचून घ्या.

**शशिकांत भोईर :-**

आपण मागील दोन वर्षाचा दिला नाही. त्याचा जरा आपण खुलासा करा. आतापर्यंन्त का केला नाही? हे माहितीच्या अधिकाराखाली मी विचारले होते तरीपण त्यांनी सांगितले नाही.

**मा. महापौर :-**

प्रशासनाला आदेश देतो की, सन्मा. सदस्य शशिकांत भोईर आणि सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा यांनी मागितलेली माहिती त्वरीत त्यांना लेखी स्वरुपात देण्यांत यावी.

**परशुराम पाटील :-**

पिठासिन अधिकारी साहेब, आपल्या परवानगीने बोलतो की, आता सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी आता जो प्रश्न उपस्थित केला, आम्ही जो पत्रव्यवहार करतो त्याचे आम्हांला काही उत्तर मिळत नाही. अशी मी विरोधी पक्षनेता म्हणून कितीतरी पत्र दिलेली आहेत. म्हणून त्यांनी जो आजचा

प्रश्न केलेला आहे. तो अक्षरशः खरा असून आणि आज कितीतरी निवेदने दिलेली आहे. त्याच्यामध्ये या प्रशासनाने मला आतापर्यंन्त उत्तर दिलेले नाही. आता या प्रशासनावर आम्ही कोर्टात कारवाई करावी का? हे चुकीचे आहे की नाही. तुम्ही जरी पत्र दिले तरी लोक लोकप्रतिनिधी म्हणून येतात. काही नगरसेवक आमच्याकडे येतात. नगरसेवकांचीसुद्धा कामे केली जात नाहीत. अधिकारी करीत नाहीत.

**मा. महापौर :-**

आयुक्त साहेबांना आणि संपूर्ण प्रशासनाला सुचना आहे, ही अतिशय गंभीर बाब आहे. ज्या अर्थी सदस्य पत्र देतात, प्रश्न विचारतात, फक्त सर्वसाधारण सभेमध्ये नाही तर अन्यत्रसुध्दा त्यांच्या पत्राला उत्तर दिले जात नाही, झालेल्या कारवाईचा अहवाल त्यांना सांगण्यात येत नाही, मागितलेले कागदपत्र त्यांना देण्यात येत नाहीत, ही बाब कुठेतरी थांबली पाहिजे आणि सदस्यांनी मागितलेले सहकार्य आणि माहिती त्वरित त्यांना देण्यात यावी याची प्रशासनाने नोंद घ्यावी.

**मिलन म्हात्रे :-**

विषय क्र. १५ मध्ये फक्त प्लस पॉइन्ट की, काय चांगले झाले? एवढेच दाखविले गेले. पण एखादा अधिकारी नियुक्त केल्यानंतर अपयश कुठे आले? ते कुठेही बोलले नाही. विरोधी पक्ष नेत्यांनी पत्र दिले. आज सगळ्यात मोठा विनोद झालेला आहे. त्यांच्या पत्राच्या विरोधात आपण ठराव पास केला. त्यांना तुम्ही चीट केले. त्यांना ते कळले नाही. पण तुम्ही हुशार आहात. त्यांच्या पत्राच्या विरोधात बरोबर तुम्ही ठराव पास केला. आज आपल्या संपूर्ण शहराच्या विभागामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी औषधांची गोडाऊन आज रिक्त आहेत. पावसाळा जवळ आलेला आहे. स्थायी समितीला आपण सर्व सदस्यांना पुरेशी औषधे घेण्याकरिता लाखो करोडो रुपयाच्या पैशाच्या निधी आपण उपलब्ध ठेवलेला आहे. परंतु अजूनपर्यंत ती गोडाऊन रिक्त आहेत. तुमची कुठलीही सिस्टिम ग्राउन्ड लेव्हलला काम करीत नाहीत. आपले जे दवाखाने काढलेले आहेत, बाह्य रुग्ण विभाग किंवा आपले जे आरोग्य केंद्र काढलेले आहेत तिकडेसुध्दा लोकांचा चांगला रिस्पॉन्स आहे. म्हणावी तशी त्यांना सोय मिळत नाही. आपल्या इकडचे आरोग्य अधिकारी औषधे या ठिकाणी का आणू शकत नाही? याचे कोण उत्तर देईल का? कारण आपण लगेच ठराव मंजूर कराल माझ्या प्रभागामध्ये जो त्रास आहे तो सर्व नगरसेवकाच्या प्रभागामध्ये आहे. आपल्या इकडे गटारामध्ये मच्छराचे औषध नाही, माशांचे औषध नाही. आता जे रोग प्रतिकार औषध पावडर वगैरे मारतो त्याचीसुध्दा आपल्याकडे कुठलीही पूर्तता झालेली नाही. हे औषध हजाराच्या कॉंटीटी मध्ये मागवणार आहात आणि आज जवळ जवळ चाळीस हजार, पन्नास हजार वस्तीसाठी औषध मागवता. तसे हे गणित आपल्याला बसते का? आपण जसे ठरावामध्ये जे जे तुम्ही चांगले मुद्दे दिले. तसे या तारखेला आम्ही उपायुक्त या नात्याने गोडाऊन चेक करून आलो. तिकडे ही औषधे नाहीत. अवजारे नाहीत हे पण मेन्शन करा त्याच्यामध्ये. अधिकाऱ्यांनी काय केले? आपण जरी ठराव मंजूर केला तरी आरोग्याच्या दृष्टीकोनातून जे काय हानीकारक आहे ते सगळयांना होणार आहे. एखादया साथीचा प्रादुर्भाव झाला तर त्याच्यामध्ये तुमच्यामधील देखील असणार आणि आमच्यामधील देखील असणार आहेत. तर याकरिता आपल्या गोडाऊनची जी परिस्थिती झालेली आहे, त्याला जबाबदार कोण आहे? आणि मी मघाशी महापौर साहेब मी तुम्हाला म्हणालो की, पाच महिने पगार का दिला गेला नाही? हा सगळा महत्वाचा मुद्दा आहे आणि ऑडिटला तो त्रासदायक ठरणार आहे. याच्यावर पहिला निर्णय घ्या. पाच महिने जर पगार दिला नाही. तर ती व्यक्ती कामावर राहू शकते का? पगार दिला नाही तर का दिला नाही? जर त्यांची नियुक्ती योग्य होती, तर पगार का दिला गेला नाही. त्यांचा पाच महिन्यांचा पगार मिळाला पाहिजे आणि जर चुकीचे असेल जर मग तुम्ही पगार देऊ शकत नाही आणि ती व्यक्ती राहू शकत नाही. या गोष्टीचा आपण या सभेमध्ये निर्णय दिला पाहिजे. साहेब आपण पीठासीन अधिकारी आहात. त्यामुळे आपण नुसती सुचना करू शकत नाही. आपण निर्णय द्यायचा आहे आणि सर्क्युलर नंबर गव्हर्नमेन्ट ऑफ महाराष्ट्र यु.डी. सर्क्युलर नंबर एम.सी.ओ.२०८७/२३८९/सी.आर.२५१/यु.डी.१४, दिनांक ०३/०२/१९८८ याचा आपण जरा थोडा साकल्याने विचार करा. घाईघाईने ठराव पास करू नका. कोण एखादी व्यक्ती बोलते आणि आपण पटापट ठराव पास करतो. ही चुकीची पध्दत आहे आणि आम्ही उद्या अडचणीत येण्याची शक्यता आहे. कारण आतापर्यंत तेच अधिकारी बोलतात. अहो, मला पगार मिळाला नाही. पाच महिने झाले मी बँकेचे लोन काढलेले आहे. त्यांना मुक्त तरी करून टाका. कशाला ठेवले आहे? कोणतरी दुसरा व्यवस्थित आपल्या आस्थापनेवर आणा हे ही पद मंजूर करण्याकरिता किंवा पत्रव्यवहार करण्याकरिता मा. आयुक्तांना मी पत्र दिलेले आहे. त्याचे उत्तर अजून आलेले नाही. साहेब, आपण मला निर्णय द्या.

**मा. महापौर :-**

ठराव झालेला आहे तुमचे म्हणणे त्यामध्ये नोंद करून घेतलेले आहे.

**रोहित सुवर्णा :-**

साहेब, सिस्टीमच्या बद्दल आपण काहीच बोलत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव झालेला आहे ठिक आहे. आपल्याकडे निधी उपलब्ध आहे. पण आपली गोडाऊन रिक्त आहेत.

**मा. महापौर :-**

आपण मांडलेली सुचना, तक्रार हे सगळे नोंद करून घेतलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सगळे मान्य आहे. पण औषधे कधी येणार?

**मा. महापौर :-**

तुम्ही जे बोलणार त्याची नोंद घ्यावी लागेल. तुम्ही खरे बोलणार किंवा चुकीचे बोलणार जे काही तुम्ही बोलणार त्या सगळ्याची या ठिकाणी नोंद घ्यायला लागेल.

**मिलन म्हात्रे :-**

पण या शहरामध्ये औषधे कधी येणार? साहेब याचे उत्तर द्या. आता पावसाळा जवळ आलेला आहे. सगळी गोडाऊन खाली आहेत. त्या अधिकाऱ्यांना विचारा.

**प्रकरण क्र. १५ :-**

विशेष मुख्य आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांना मुदतवाढ देणेबाबत.

**ठराव क्र. १७ :-**

विशेष मुख्य आरोग्य वैद्यकिय अधिकारी डॉ. बावस्कर यांना तात्पुरत्या स्वरुपाची मुदतवाढ (५ महिने) देण्यांत यावी, असा ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. रविंद्र माळी.** **अनुमोदन :- श्रीम. सुरेखा गायकवाड.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मोहन पाटील :-**

सन्मा. महापौर साहेब, आपल्या राज्याचे माजी मंत्री श्रीकांत जिचकर यांना अपघाती निधन आलेले आहे. त्याचप्रमाणे आपल्या शहराचे आदरणीय नेते गिल्बर्ट शेठ व आदरणीय महापौर मॅडम मायरा मेंन्डोसाजी यांच्या सासुबाई, स्टिवन मेंन्डोंसा यांच्या मातोश्री व सन्मा. सदस्या ग्रिटा फॅरो यांच्या मातोश्री टेरेसा जॉन मेन्डोसा यांचे वृध्दापकाळाने निधन झाले आहे. त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे. त्याचबरोबर आपल्या सन्मा. सदस्या रिटा शाह यांच्या मातोश्रीचे देखील निधन झालेले आहे. या सर्वांचा शोकप्रस्ताव मी या ठिकाणी मांडत आहे. त्याचप्रमाणे माजी ग्रामपंचायत सदस्या सौ. सत्यवती शुक्ल, अच्युत तावडे, ज्येष्ठ शिवसैनिक व संघटक कै. भास्कर सिताराम सावंत या सर्वांचा शोकप्रस्ताव मी या ठिकाणी मांडत आहे.

**दुःखवटा ठराव क्र. १८ :-**

महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री श्रीकांत जिचकर यांना अपघाती निधन आलेले आहे. त्याचप्रमाणे मिरा भाईंदर शहराचे आदरणीय नेते श्री. गिल्बर्ट जॉन मेंन्डोंन्सा व आदरणीय महापौर मॅडम मायरा मेंन्डोसाजी यांच्या सासुबाई, सन्मा. सदस्य श्री. स्टिवन मेंन्डोसा व सन्मा. सदस्या ग्रिटा फॅरो यांच्या मातोश्री टेरेसा जॉन मेन्डोसा यांचे वृध्दापकाळाने निधन झाले आहे. तसेच सन्मा. सदस्या रिटा शाह यांच्या मातोश्रीं श्रीम. वसंतबेन मगनलाल आचार्य यांचे निधन झालेले आहे. त्याचप्रमाणे माजी ग्रामपंचायत सदस्या सौ. सत्यवती शुक्ल, विनायक मंदिर देवस्थानचे ट्रस्टी अच्युत तावडे, ज्येष्ठ शिवसैनिक व संघटक कै. भास्कर सिताराम सावंत यांचे दुःखध निधन झाले आहे. त्यामुळे ही सर्वसाधारण सभा दुःख व्यक्त करीत असून मृतात्म्यास चिरशांती लाभो अशी प्रार्थना करीत आहोत.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. रतन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सभेस उपस्थित असलेले मा. उपमहापौर, मा. आयुक्त, मा. प्र. सचिव, अधिकारी वर्ग तसेच पत्रकार बंधू आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली असून सभा संपल्याचे मी जाहिर करीत आहे.

**सभा संपल्याची वेळ**
**सायं. ०४.२० वाजता**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगर सचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपलिका**